# माणूस

शनिवार । ७ ऑगस्ट १९७६ । साठ पैसे

'मला महापुरुष व्हायचे नाही. मात्र चांगला माणूस व्हावयाचे आहे.'
बंगालचे त्रिपुरारी चक्रवर्ती भेटायला आले तेव्हा कॉ. एम्. एन्. रॉय त्यांना म्हणाले.
इंदुमती पारीख यांनी रॉय यांचे अखेरचे दिवस वर्णन करताना ही आठवण लिहिली आहे....

## माणूस : एम्. एन्. रॉय विशेषांक

**या विशेषांकाचे प्रमुख लेखक**

- ☐ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
- ☐ व. भ. कर्णिक
- ☐ द्वा. भ. कर्णिक
- ☐ गोवर्धन पारीख
- ☐ मे. पुं. रेगे
- ☐ मा. पं. शिखरे
- ☐ बा. रं. सुंठणकर
- ☐ न्यायमूर्ती वि. अ. नाईक
- ☐ प्रभाकर पाध्ये
- ☐ अ. भि. शहा
- ☐ बॅ. तारकुंडे

## इतर तपशील

- ☐ या विशेषांकाची किंमत : सुमारे चार ते पाच रुपये
- ☐ प्रसिद्धी : १५ ऑगस्ट
- ☐ पृष्ठसंख्या : सुमारे शंभर ते सव्वाशे

या रॉय विशेषांकाच्या मोजक्याच प्रती निघणार आहेत.
विचारप्रेमी वाचकांनी विक्रेत्यांकडे त्वरित मागणी नोंदवावी.
वर्गणीदारांना हा विशेषांक नेहमीच्या वार्षिक वर्गणीतच पाठविला जाणार आहे.
ज्यांना रजि. पोस्टाने अंक हवा असेल त्यांनी दोन रुपये म. ऑ. ने पाठवावेत.

## साप्ताहिक माणूस

वर्ष सोळावे – अंक नववा

७ ऑगस्ट १९७६

मूल्य : साठ पैसे

संपादक –
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

¤

दूरध्वनी : ४३४५९

¤


# अण्णा दाते – एक स्वातंत्र्य सैनिक

प्रा. राम बिवलकर

पंधरा फेब्रुवारी एकोणीसशे दोन या दिवशी कुलाबा जिल्ह्यातील पेण नामक गावी दाते नामक एका कोकणस्थ ब्राह्मण कुळात एका मुलाचा जन्म झाला. नाव पर्शराम ठेवले. घरीदारी पेढे वाटले. घर सुखवस्तू होते. किराणा मालाचा आणि मिठाचा व्यापार करीत होते. पोरगा वाढू लागला. शाळेत जाऊ लागला. त्याची शिक्षणात फारशी गती दिसत नव्हती. बुद्धी सामान्य होती. शिकला तर शिकू दे, नाहीतर घरचा व्यापार त्याच्या पोटापाण्याला काही कमी पडू देणार नाही, ही घराची वृत्ती होती. प्राथमिक शिक्षण पेणला उरकले. इंग्रजी शिक्षणासाठी मुंबई दिसली. तिथे गिरगावातल्या आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कूलातून रडतखडत मॅट्रिकचा मांडव दिसला. पण पैलतीर हाती आले नाही ! मुलगा पेणला परतला. गूळ, मिरची, साखर, तेल, च्याची बुकटी आणि मिठाच्या गोणी विकू लागला.

चार चौघासारखे लग्न झाले. कुण्या घरंदाजाच्या मुलीने त्याची सौभाग्यवती बनून आपली चूलबोळकी त्याच्या घरात मांडली. संसार सुरू झाला. सुनमुख बघून कृतार्थ झालेल्या आईला नातवाच्या दर्शनाचे डोहाळे लागले.

आणि तरण्याताठ्या, कर्त्यासवरत्या या मुलाला कुणीतरी झपाटले ! पोराचे लक्ष घरातून उडाले. मीठ-मिरची, च्याची बुकी, मिठाच्या गोणी विकण्यातला रस संपला. तो रात्री-बेरात्री बाहेर भटकू लागला. सभा–बैठकांना हजर राहू लागला. सत्याग्रहाची भाषा बोलू लागला. खादी वापरू लागला. मायबाप इंग्रज सरकारला येता–जाता शिव्या घालू लागला. खेडोपाडी हिंडून जनतेचा उठाव झाला पाहिजे असे बोलू लागला.

घर भीतीने कानकोंडे झाले. कुठले नसते वेड पोराने उराशी कवटाळले असं त्याला वाटू लागले. पेणेतून दिसणाऱ्या, उंच सुळक्याच्या कर्नाळ्यावरील फडक्याच्या भुतानेच पोराला झपाटले असे वाटू लागले ! अंगारे-धुपारे, मंत्र-तंत्र झाले पण ते वाया गेले. पोराचा पाय ऊठसूट बाहेर होता.

१९३० सालची महात्मा गांधींची दांडीयात्रा गरजू लागली आणि पर्शरामाच्या अंगातल्या भुताने जोर केला. घर त्याला आवरू शकले नाही आणि एक दिवस घरंदाज दात्यांच्या कुळातले हे विद्रे पोर पकडले गेले आणि तुरुंगाच्या गजाआड डांबले गेले ! दात्यांच्या घरंदाज घरावर जणू विजेचा लोळ कोसळला. आईबापानी हाय खाल्ली. पत्नी आपल्या नशिबाला बोल देत बसली !

परवशतेची चीड ज्यांच्या डोक्यात भिनली, स्वातंत्र्याची कुंडलिनी ज्यांची जागृत झाली, चळवळीची नशा ज्यांना चढली अशी लाखो माणसे महात्माजींच्या देशव्यापी चळवळीने चेतून उठली. ' वन्ही तो

'चेतवारे' चे ते वारे. त्याने ती आग देशभर पसरत नेली. स्वातंत्र्य चळवळीचे एक महान् यज्ञकुंड धगधगू लागले आणि अण्णांसारखे अनेक तरुण त्या यज्ञकुंडातील समिधा व्हायला आसुसले. सामान्यांच्या जीवनाला तो जणू 'परतत्त्वस्पर्श' होता. सामान्य जीवनें उजळून टाकणारा तो जणू परीस होता. त्यामुळे एका तुरुंगवासाने ती आग विझली नाही. १९३० सालापासूनच्या प्रत्येक काँग्रेसप्रणीत चळवळीत पेणचा अण्णा दाते नामक तरुण अग्रभागी राहिला. त्यापायी अनेक तुरुंगवास भोगीत राहिला. हालअपेष्टा सहन करीत राहिला.

अण्णा दात्याजवळ स्पष्टवक्तेपणा होता. निधडी छाती होती. बेडरवृत्ती होती. पण एकांतिक आततायीपणा त्याला मान्य नव्हता. तो समन्वयवादी होता.

१९४२ साल म्हणजे भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या यज्ञातील पूर्णाहुतीचा काळ. ८ ऑगस्टच्या रात्री मुंबईच्या गवालिया टँक मैदानावरील भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनात महात्माजींनी 'चले जाव – छोडो हिंदुस्थान' असे ब्रिटिश सत्तेला बजावले; आणि अखिल भारतात ब्रिटिशांनी जबरदस्त धरपकड केली. काँग्रेसचे सर्व नेते गजाआड गेले. पण तरुण कार्यकर्ते भूमिगत झाले आणि त्यांनी स्वातंत्र्य चळवळीला 'घातपाती' स्वरूप देऊन क्रांतीच्या मार्गाने देश स्वतंत्र करायचा पवित्रा घेतला. पूल उडवले जाऊ लागले. रेल्वेचे अपघात घडविले जाऊ लागले. टेलिफोन्स–टेलिग्रॉफच्या तारा कापल्या जाऊ लागल्या. गाड्या लुटल्या जाऊ लागल्या. गुप्तपत्रके निघू लागली. गुप्त रेडिओ केंद्रे काम करू लागली.

इतर अनेकांबरोबर अण्णा दातेही पकडले गेले. येरवड्याच्या तुरुंगात जमा झाले. तिथे काका गाडगीळांची सोबत होती. छन्नूसिंग चंदेले, किसनवीर यांसारख्या ज्वलज्जहालांची संगत होती. किसनवीर छन्नूसिंगांच्या नेतृत्वाखाली काहीजणांनी तुरुंगातून पसार व्हायचे बेत आखले. गजाआड खितपत पडण्यापेक्षा बाहेर भूमिगत राहून स्वातंत्र्य जवळ आणावे, प्रत्येकाने आपापला भाग दहशतवादी चळवळीने स्वतंत्र करावा अशी त्यांची विचारधारा होती. अण्णा त्यात सामील झाले नाहीत. महात्माजींच्या सत्याग्रह, असहकार या तत्त्वांचा त्यांच्यावर विशेष पगडा होता. 'जे जाणून बुजून केले–त्यांची जिमेदारी आपण पत्करलीच पाहिजे. कायदा मग तो कुणाचा का असेना, आपण तोडला तर त्याची शिक्षा भोगायला आपण तयार असले पाहिजे. कायदेभंग याचा अर्थ बेबंदशाही नव्हे' असे ते मानीत.

एका रात्री छन्नूसिंग चंदेले, किसनवीर आणि इतर दोघे असे चौघे येरवड्याच्या तुरुंगातून पळाले. कैदी पळाले; ही बातमी कळल्यावर जेल सुपरिंटेंडेंटच्या अंगाची लाहीलाही झाली. तो तणतणत कैद्यांच्या बराकींच्या भागात आला. त्याने साऱ्या कैद्यांना 'गिनती'साठी पटांगणात रांग लावायला फर्मावले. भाषा अत्यंत घाणेरडी वापरली. कैदी चिडले. ते सारेच तुरुंग फोडायची भाषा करू लागले. कुणी बराकींच्या कौलावर चढून कौले काढू लागले. परिस्थिती चिघळत चालली. श्री. काकासाहेब गाडगीळांचेही कुणी ऐकेनात. सुपरिंटेंडेंट बेभान झाला. त्याने पुणे शहरातून ५० हत्यारी पोलिसांची तुकडी बोलावून आणली. पाच मिनिटात मैदानात सारे जमले नाहीत, तर गोळीबार करण्याची धमकी त्याने कैद्यांना दिली. इतक्यात अण्णा दाते आपल्या बराकीच्या व्हरांड्यांत आले. म्हणाले 'सुपरिंटेंडेंटसाहेब हा काय तमाशा तुम्ही इथे चालवला आहे? बंदुका दाखवून तुम्ही आम्हाला भीती दाखवता का? त्या तुमच्या फुकण्याना आम्ही कुणीच भीक घालीत नाही हे ठाऊक आहे ना? मागे घ्या त्या फुकण्या...तुम्ही अपशब्द वापरलेत म्हणून ही मंडळी चिडली.' हा खणखणीत आवाज ऐकून जेलसुपरिंटेंडेंटही चमकला. बरॅक लीडर म्हणून अण्णांनी आपल्या सर्व सहकाऱ्यांना गिनती करता रांगेत उभे राहायचे आवाहन केले. त्यांनी ते मानले आणि येरवड्याच्या तुरुंगातले एक हत्याकांड घडले नाही.

अण्णा मोठ्या अभिमानाने हा प्रसंग सांगत असत. ते चळवळचे होते, पण क्रांतिकारक नव्हते. बेडर होते, पण आततायी नव्हते. अन्यायाची त्याना चीड होती पण त्याच्या परिमार्जनार्थ जबरदस्ती त्याना मान्य नव्हती. त्याना सत्याची चाड होती म्हणूनच सत्तेची हाव नव्हती.

१९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्य चळवळीतल्या अनेकांच्या जीवनात एक आगळी पोकळी निर्माण झाली. त्यामुळे कित्येकजण निष्क्रीय बनले. कित्येकजण निराश झाले. स्वातंत्र्योत्तर काळातील सत्तेची खुर्ची मिळविण्याच्या स्पर्धेत एक तर ते मागे पडले; बाजूला फेकले गेले किंवा त्यांना सत्तेचा अभिलाषच नव्हता. सत्तेच्या राजकारणात स्वातंत्र्य चळवळीत आपले संसार आणि जीवने उधळून देणाऱ्यांची बूज राखली जात नव्हती. त्यामुळेही हजारो लाखो माणसे कानकोंडी झाली.

स्वातंत्र्योत्तरकाळात अण्णांच्या जिल्ह्यातले अनेक सहकारी आमदार–खासदार झाले. अण्णा, स्पर्धेत बाजूला फेकले गेले. पण म्हणून निष्क्रीय बनणारा तो पिंड नव्हता. अण्णांच्या कार्याने आता विधायक रूप घेतले. कधी कुलाबा जिल्हा काँग्रेसचे सभासद म्हणून, कधी प्रांतिकचे सभासद म्हणून, कधी कुलाबा जिल्हा काँग्रेसचे चिटणीस म्हणून, कधी पेणचे नगराध्यक्ष म्हणून हा माणूस खेडोपाडी हिंडत राहिला. जनतेचे प्रश्न समजून घेऊन त्यांची उकल करीत राहिला. खेड्यापाड्यात शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून पेण तालुका प्राथमिक शिक्षण मंडळ स्थापून ६० खेड्यांतून व्हॉलंटरी शाळा काढण्याचा विक्रम त्याने केला. महात्माजींची स्मृति म्हणून 'पेणेत महात्मा गांधी स्मृति मंदिर त्याने उभारले. स्वातंत्र्यानंतर येऊ घातलेला कुळकायदा सामान्य शेतकऱ्याला समजावीत जिल्हाभर तो पायपीट करीत राहिला. शेतकऱ्यांना, कसता त्या जमिनींचे तुम्हीच खरे मालक आहात असे सांगत फिरणारा अण्णा खोता–सावकारांचा वैरी झाला. शेतकऱ्यांच्या सभांमधून तो जेव्हा खोता–ब्राह्मणांवर आणि सावकारांवर आग ओकीत असे तेव्हा ब्राह्मण मंडळींना तो कुऱ्हाडीचा गोतास काळ ठरलेला दांडा वाटे. अण्णा या ऐतखाऊ समाजाची आपल्या भाषणांतून खूपच रेवडी उडवीत.

कूळकायदा आल्यावर कसेल त्याची जमीन ठरल्यावर अण्णानी खोता–जमिनदारांच्या अनेक हिकमती हाणून पाडून गरीब शेतकऱ्यांना जमिनी मिळवून दिल्या. सावकारांच्या कचाट्यातून कर्जबाजारी शेतकऱ्यांना सोडवणारे अण्णा त्यांचे वकील होते. १९४६ सालापासून डेट अॅडजस्टमेंट बोर्डात शेतकऱ्यांची वकिली करण्याची सनद खरोखरच त्यानी मिळवली होती. पेणेतले अण्णांचे घर म्हणजे पेण तालुक्यातील आणि कुलाबा जिल्ह्यातील गोरगरीब जनतेचे

आश्रयस्थान होते. आपल्या विधायक कार्याने, सामान्य गरीब, पददलित माणसाचा विलक्षण विश्वास त्यानी पैदा केला होता. अण्णांच्या घरी दुबळी, ठाकूर, कातकरी, धनगर, आजारी शेतकरी अशा मंडळींची नेहमीच रीघ लागलेली असे. चांदे पट्टीतला एखादा धनगर एखाद्या रामपारी अण्णांच्या दारी उभा राही.

'अन्ना हो–हाय का घरात.'

'अरे, धान्या का ? ये ये आत.'

'अन्ना, एक काम हाय बघा.'

'बोल–काय भानगड आहे.'

'आपल्या घोंगडीच्या खोळीतून आणलेल्या कितीतरी चुरगळलेल्या नोटांची रास अण्णांपुढे ओतीत तो म्हणे,

'पैका न्हवं का हा. दे बरं मेजून किती हाय त्यो.'

'हीच का तुझी भानगड. धान्या, अरे, तुम्हीसुद्धा आता शिकलं पायजे मेजायला.'

मग अण्णा आपली सर्व कामे बाजूला ठेवून त्या धान्याच्या नोटा मोजत बसत.

कधी छत्तिशीतले अगर खारेपाटणातले कुणी आगरी नाही तर मराठे कुणबी आपली घरगुती भांडणे अण्णांच्या ओटीवर घेऊन येत. कुणाचा भाऊ, बाइलीच्या हट्टामुळे इस्टेटीची वाटणी मागत असे. वाडवडिलांपासून चालत आलेल्या इस्टेटीची फाळणी होऊ नये म्हणून वडील भाऊ त्याच्या विनवण्या करीत असे. घरी न मिटलेले हे भांडण अण्णांच्या ओटीवर मिटे.कारण अण्णा धाकल्याला म्हणत, 'धाकल्या, काय म्हणतोय धोंडबा.'

'मना नाय पटत.'

'अरे, काय पटत नाही ? जमीन अन् घरदार तू कमावलंस का?'

'त्येनी तरी कुठे कमावलंय ?'

'तू पण नाही आणि त्याने पण नाही–खरे ना ?'

'हो.'

'मग जे तुम्ही दोघांनीही कमावले नाही ते मोडायचा, तोडायचा तुम्हा कुणाला अधिकार पोचतो का ? बोल ना ?'

'तसे कसे ?'

'मग वाडवडिलांची इस्टेट कुणी, कशी तोडायची ?'

'हे बरुबर.'

'फार तर काही जमीन तू कशीत जा. काही धोंडबा कशील. गावठाणातल्या घरात तू राहा. शेतावरल्या घरात धोंडबा राहील. मग बाईमाणसांची पण कचकच व्हायची नाही. काय धोंडबा–'

'अन्ना, तुम्ही म्हनाल तसे.'

'काय धाकल्या'

'बरुबरच हाय की–'

'मग जा बरं आता–ठरवा आपसात. जमीन कसण्यात श्रमविभागणी करा. पीक एका खळघात झोडा. निम्मेनिम वाटून घ्या–अं–'.

अण्णांनी किती योग्य न्याय केला म्हणून दोघेही आनंदात घरी परतत.

झाडावरून, माडावरून, बांधावरून खेडुतांची किती म्हणून किती प्रकारची भांडणे अण्णांच्या चावडीवर रुजू होत आणि सलोख्याने सुटत. अण्णा देतील तो न्याय उभयपक्षाला मान्य असे. 'दादला नांदवीत नाही' म्हणून तक्रार घेऊन एखादी दुर्दैवी स्त्री अण्णाच्या दारी हजर झाली की, तिच्यापाठोपाठ तिचा नवरा आपली कैफियत घेऊन हजर होई. दोघांचे ऐकून घेऊन या नाजुक गुंताड्याचा निकाल अण्णा इतक्या हळुवारपणे करीत की, दिलजमाई होऊन ते जोडपे घरी परते.

या असल्या भांडणाचे मूळ पुष्कळदा दारूत असे. ही गोष्ट हेरून आपल्या खेडोपाडीच्या पायपिटीत अण्णा दारूबंदीचा प्रचार करू लागले. मुंबई सरकारने १९५० साली प्रांतात संपूर्ण दारूबंदी घोषित केली होती. पण बंदीमुळे दारूचे व्यसन सरसहा वाढत होते. दारूची दुकाने, ताडीमाडीची टपरे नाहीशी झाल्याने हातभट्टीची 'कॉटेज इंडस्ट्री' भरमसाठ वेगाने वाढत होती. खेडोपाडी घरीच दारू पाडण्याचा उद्योग सुरू झाल्याने, बायामाणसेही दारू पिऊ लागली होती. शेतमजुराला मजुरी द्यायची ती दारूच्या बाटलीच्या मापाने. ही प्रथा सर्रास पडत चालली होती.

'भाग्या पाऊस डोईवर आला–भाजावळ करायची आहे. आवसा बांधायचा आहे. शेतावरची टपरी पण शाकारायची आहे. चार माणसे घेऊन केव्हा येतोस कामाला ?'

'आज आठा दिसा येतु की–'

'आणखी चार गडी हवेत हो.'

'मिळतील की. तेव्हढा गूळ आणि नवसागर जास्त लागल.'

'कितीसा ?'

'मागच्या दुप्पट हवा की.'

'दुप्पट ?'

'नाय तर धा बाटल्या पडायच्या नाय. घुगऱ्या त्येशिवाय हां.'

'कबूल.'

कोकणात खेडोपाडी असे संवाद ऐकू येत. दारूमुळे शेतकरी अंग मोडून शेतावर राबायलाच तयार नव्हते. कसेल त्याची जमीन झाल्याने जमिनी मिळाल्या तरी पीक अर्धेही येत नव्हते. दारू हवा तेवढा पैसा देत असताना शेतात घाम कोण गाळणार ? अण्णांना हे सारे जाणवले आणि ते स्वयंप्रेरणेने दारूबंदी प्रचारक बनले.नशाबंदी महामंडळाची पगारी माणसे जिल्ह्यात काम करीत होती. पण डायरीला दाखवायचे काम आणि एखाद्या व्रती माणसाने अंगिकारलेले काम यात अंतर पडणारच. शिवाय खेडोपाडीच्या शेतकऱ्यांचा, मागासलेल्या जमातींचा अण्णावर विश्वास होता. 'दारू सोडा' हे आवाहन त्यामुळे 'आतवर' पोचे. अण्णा गावोगावच्या आपल्या भाषणातून दारूच्या विळख्याने माणसे जगातून कशी उठतात याचे हृदयद्रावक वर्णन करीत. अनेक सत्यकथा सांगत. प्रचारापेक्षा ते 'मनोगत' होते. ते हवे तिथे भिडे. माणसे अण्णांच्या पायावर हात मारून शपथा घेत. पण हे करताना, नशाबंदी महामंडळाच्या कार्यकर्त्यांच्या कार्याला आपले काम पूरक–प्रेरक ठरेल याची काळजी अण्णा घेत. त्यामुळे श्री. बाबुराव रानड्यांसारखा नशाबंदी मंडळाचा जिल्हासंघटक अण्णांचा मित्र झाला. दारूबंदीचा पुरस्कार हे अण्णांनी आपले जीवितकार्य मानले होते.

दारूबंदीचा पुरस्कार, शेतकऱ्यांच्या चळवळी, कर्जमुक्ती, यांसारख्या कार्यानिमित्त कुलाबा जिल्ह्याच्या दक्षिण भागात–महाड,

पोलादपूर तालुक्यात, खेडोपाडी फिरताना, अण्णांनी मराठी पातशाहीच्या राजधानीचा–दुर्ग रायगडाचा, परिसर पुरेपूर धांडोळला. इतिहासाचा विलक्षण अभिमान. लहानपणापासून मनी रुजलेला. शिवप्रभूंच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या भागात पदयात्रा चाललेली. त्यामुळे गावोगाव फिरताना अण्णांचे लक्ष त्या दुर्गदुर्गेश्वरावर केंद्रित झालेले असे. कोंझर, पाचाड, सांदोशी, वाळण, वारंगी, डबिराचे कांवळे, जिते, बिरवाडी, सावरट ह्या घेरे रायगडचा भाग त्यांनी अनेकवार पायातळी घातला. हे करीत असताना अण्णा जुन्या आठवणी सांगणाऱ्या वृद्धांना भेटत. त्यांच्या तोंडून दंतकथा ऐकत. कागदपत्रे जमवीत. जुन्या वास्तू, पुराण्या वस्तू, देवळे, गुहा, ऐतिहासिक महत्त्वाची ठिकाणे आवर्जून पाहत. त्यानुरोधाने नवी ठिकाणे हुडकून काढीत. लोककथा जमवीत. त्यांतून इतिहासाच्या आवडीने वेडाचे स्वरूप धारण केले. ऐतिहासिक संदर्भ गोळा होऊ लागले. जुनी दुर्मिळ पुस्तके खोलीतल्या रॅकवर जमू लागली. भारत इतिहास संशोधक मंडळाचे सभासदत्व मिळवून तिथली दप्तरे धुंडाळून कागदपत्रे पाहून अण्णा शिवकालीन इतिहासाचे गाढे अभ्यासक बनले. उत्तरायुष्यातील २०–२५ वर्षे या छंदाने व्यापली. त्यातून 'महाराष्ट्राची राजकीय पंढरी–रायगड', 'कान्होजी आंग्रे कथामाला', 'कुडे–मांदाळ येथील गिरिगुंह्य', 'प्रतापगड', 'नरवीर तानाजी मालुसरे', 'सरखेल कान्होजी आंग्रे', 'बहिर्जी नाईक', 'भरारली शिवशाही, बुडाली चंदरराई', 'राजमाता जिजाबाई', 'कविंद्र परमानंद आणि शिवभारत', 'बाळाजी आवजी चिटणीस' अशी कितीतरी पुस्तके लिहून त्यांनी प्रसिद्ध केली. अलीकडे घारापुरीच्या लेण्यांना ते आकार देत होते. छत्रपती संभाजी एक आगळे रूप घेऊन प्रकाशात येणार होता.

अण्णा इतिहासाभ्यासक होते. इतिहास संशोधक मात्र नव्हते. संशोधकाला अभ्यासविषयाबद्दल सत्यान्वेषी जी अलिप्त दृष्टी हवी ती त्यांनी शिवप्रेमापोटी हरवली होती ! रायगड त्यांना माहेरघर वाटे. महाडकडला कुणी भेटीला गेला, तर अण्णांचा पहिला प्रश्न असे–

'या महाडकर. आमचा रायगड बरा आहे ना ?' एखाद्या सासुरवाशिणीने माहेराकडले कुणी भेटले म्हणजे तिकडची विचारपूस आत्मीयतेने करावी ती आत्मीयता या प्रश्नात ओथंबलेली असे. रायगडावर अण्णांचे विलक्षण प्रेम होते. शिवप्रभूंचा विलक्षण अभिमान त्यांना वाटे. काही वर्षांपूर्वी रायगडावरील शिवरायांच्या समाधीच्या खरेपणाविषयी आशंका व्यक्त करणारा लेख साहित्यसम्राट कै. न. चिं. केळकर यांच्या चिरंजीवांनी–श्री. य. न. केळकर यांनी–प्रकाशित केला. अण्णांच्या पाहण्यात तो लेख जेव्हा आला तेव्हा लागोपाठ तीन लेखांक लिहून त्यांनी केळकरांची तर्कदुष्टता सप्रमाण त्यांच्या पदरात बांधली. पुराव्याचे संदर्भ देऊनच अण्णांचे समाधान झाले नाही. त्यांनी केळकरांना आपल्या लेखात म्हणे असा सवाल टाकला होता की, 'तुम्ही साहित्यसम्राटांचे चिरंजीव आहात हे सप्रमाण सिद्ध करून दाखवा, असे कुणी शहाणा तुम्हाला म्हणाला तर, ते सिद्ध करणे तुम्हाला शक्य होईल का ?' एवढी तिरमिरीची भाषा. विलक्षण शिवप्रेमापोटीच अण्णांची लेखणी ओकली होती !

पण असे काही प्रसंग सोडले तर, अण्णांनी आपल्या राजकीय विरोधकांशीही मित्रत्वाचे नाते तुटेल अशी भाषा कधी वापरली नाही की, लेखणीच्या आसुडाने कुणाला रक्तबंबाळ केले नाही. 'कुलाबा समाचार'चे संस्थापक कै. रामभाऊ मंडलीक यांच्याशी अण्णांचा राजकीय मतभेदी उभा दावा होता. त्याकाळी राजकीय मतभेद वैयक्तिक मैत्रीत कधी अंतराय निर्माण करीत नसत. तरीही मतभिन्नतेमुळे एकमेकांची पुरी हुर्रेवडी उडवायला एकमेक टपलेले असत. रामभाऊंनी अण्णांच्या कार्यावर टीका करणारा खरमरीत लेख लिहिला की, अण्णांच्या घरावरून प्रेसकडे जाताना अण्णांना मोठ्याने हाका मारून रामभाऊ म्हणायचे–

'अण्णा, आजच्या लेखात वाच तुझी कशी हजामत केलीय् ती ! उत्तर द्यायला दुसरा जन्म घ्यावा लागेल तुला.'

रामभाऊंचे वक्तव्य ऐकून अण्णा स्नानगृहात असले तरी, तिथून ओरडायचे,

'रामभाऊ, तुझे बालिश तर्कट सकाळीच चाळले मी. पुढल्या जन्मी कशाला, दुपारीच त्याचे उत्तर पाठवून देतो. पुढल्या अंकी छाप मात्र.'

पण तरीही दोघांत स्नेहभाव होता. रामभाऊ अण्णांच्या घरी आले की, अण्णांच्या चिरंजीवाला म्हणायचे– 'मोरेश्वरा, बाबा कसाही हो. पण अण्णासारखा होऊ नको.' आणि अण्णाही म्हणायचे,

'होय रे होय. तू त्याला सांगितलेस म्हणून बरे. नाही तर तो पटकन् आपल्या बापाच्या वळणावर जायचा !' रामभाऊ गेल्याला १७ वर्षे झाली. या १७ वर्षांत, प्रतिवर्षी ३० ऑगस्टला 'कुलाबा-समाचार'तर्फे साजरा होणारा त्यांचा पुण्यतिथी समारंभ अण्णांनी कधी चुकवला नाही. समारंभाला आवर्जून हजर राहून ते रामभाऊंच्या आणि त्यांच्या मतभेदांच्या, भांडणांचा आणि विरोधी प्रेमाच्या आठवणी श्रोत्यांना ऐकवायचे.

१९७२ साली १५ ऑगस्टला भारतीय स्वातंत्र्याचा रौप्य महोत्सव दिल्लीमध्ये मोठ्या थाटामाटाने साजरा झाला. त्यावेळी देशातील निवडक स्वातंत्र्यसैनिकांना, त्यांच्या कार्याचा गौरव करून राष्ट्रपतींच्या हस्ते ताम्रपट देण्यात आले. या समारंभात भाग घेण्यासाठी कुलाबा जिल्ह्यातून दोन स्वातंत्र्यसैनिकांना दिल्लीत पाचारिले गेले. त्यांतले पहिले नाव होते प. रा. तथा अण्णाराव दाते ! महाराष्ट्र सरकारच्या 'स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश' या ग्रंथाच्या ठाणे, कुलाबा व रत्नागिरी विभागाच्या स्वातंत्र्य सैनिकांची माहिती मिळविणे, तिचे संकलन करणे, प्रत्येक सैनिकाच्या कार्याचा गोषवारा तयार करणे हे काम शासनाने अण्णांवर सोपविले होते. अगदी परवा परवापर्यंत अण्णा त्यासाठी ठिकठिकाणी जात होते. माहिती गोळा करीत होते. ती पडताळून पाहत होते.

वय झाले होते. शरीर थकले होते, तरी कामाचा उत्साह मोठा दांडगा होता. माझा अन् अण्णांचा परिचय गेल्या पाचसहा वर्षांतला. माझे लेखन त्यांच्या वाचनात आल्यामुळे झालेला. चारदोन वेळा एकाच व्यासपीठावर वक्तव्य करण्याचा योग आल्याने वाढलेला. '७४ साली माझे 'क्रांतिवीर नाना पुरोहित' हे पुस्तक प्रकाशित झाले. ते पुस्तक आवर्जून वाचून अण्णांनी माझी पाठ थोपटली.

'आम्हीही लिहितो. पण तुमच्या भाषेचा ओघ आणि रसाळपणा त्यात उतरत नाही. ही तुमची स्तुती नाही. शाबासकी.'

अण्णांकडे पेणला गेले की, चहा मिळायचाच– पण भोजनाकरता मी राहावे म्हणून अण्णांचा आग्रह असायचा. अनेक विषयांवर वयातले अंतर विसरून ते मोकळेपणाने माझ्याशी बोलत. लोक त्यांच्या-

पृष्ठ २४ वर

# सोलकढी

## □ परवीन बाबी : माझी जवळची मैत्रीण

आयुष्यात कधी धनाशी मैत्री जमली नाही; पण मैत्रीचे धन मात्र अमाप जमवले. (शैली) (विनोदी लेखकांच्या लेखनात आणि भाषणवृत्तातात मधून मधून हशा आणि टाळ्या असे शब्द सुटे वा जुडीने कंसात दिलेले असतात. कंसाआधी आलेल्या शब्दसंहतीच्या अपेक्षित वा अनपेक्षित परिणामाचा दृश्यश्राव्य आविष्कार त्यातून सूचित होतो. जशा काही शब्दसंहती हशाच्या आणि टाळ्यांच्या असतात तशा काही शब्दसंहती शैलीच्या असतात, असे मी एक पाहून ठेवले आहे. या स्फुटाच्या सुरुवातीला आलेले वाक्य शैलीचे वाक्य आहे, हे कोणताही कुलवंत मराठी वाचक मान्य करील. वाक्यापुढे मुद्दाम कंसात लिहिलेला 'शैली' हा शब्द तेच सूचित करतो. अनंतरावांकडून सहजी लिहिल्या जाणाऱ्या अशा शैलीच्या वाक्यांपुढे कंसात शैली असा उल्लेख यापुढे करायचा आमचा विचार आहे. असे करणारे मराठीत आम्ही पहिलेच असू. असो.) वास्तविक मी अनुस्वाराएवढा लहान; पण माझे मित्र ॐकाराएवढे मोठे आहेत. (शैली.) हे कसे काय झाले ते गगनीच्या सूर्य-चंद्राला ठावकी. माझे काही मित्र मंत्री–राजदूत आहेत; काही व्यापारी आहेत; काही शेतकरी आहेत; काही साहित्यिक आहेत; काही संपादक आहेत; काही डॉक्टर्स आहेत; काही नट आहेत.

नटांमध्ये नट्या अर्थात आल्याच. देवयानी चौबळांची, धर्मेंद्र, राजेश खन्ना (काळा मांजा), देव आनंद, अमिताभ बच्चन, राजकपूर, किशोरकुमार इत्यादी नटांशी जितकी दोस्ती आहे त्यापेक्षा काकणभर अधिकच, माझी, वैजयंतीमाला (माजी हिंदी–चित्रपटाईत अभिनेत्री), हेमा मालिनी, शर्मिला टागोर, मुमताझ (सौ. वाध्वानी), राखी, रेखा, योगिता बाली, नीतू सिंग, झीनीबेबी, मौसमी चतर्जी, विद्या सिन्हा, सौ. अनुराधा बांदोडकर इत्यादी नटयांशी दिल देके देखो–दोस्ती आहे. त्यांना मी आवडतो; मला त्या आवडतात. माझी सुखदुःखे मी त्यांना सांगतो; त्यांची सुखदुःखे त्या मला सांगतात. मी त्यांची आठवण काढली की त्यांना उचकी लागते; त्यांनी माझी आठवण काढली की मला उचकी लागते. त्यांच्या घरी मी केव्हाही जातो; माझ्या घरी त्या केव्हाही येतात.

जशी परवा परवीन बाबी आली होती. (तिचे नाव इथे येणार असल्यामुळे वरच्या यादीत कोंबलेले नाही हे लक्षात आल्यावर वाचक मनातल्या मनात अनंतरावांचे कौतुक करू लागतात; आणि मग वाक्यापुढे शैलीदार कंस देऊन टाकतात.) सकाळची अनवट वेळ होती. सूर्याचे तोंड धुणे चालले होते. मंद मंद मंद उकडत होते. पंखा चालू होता. चहाचा कप भरलेला होता. वर्तमानपत्रे नुकतीच येऊन समोर अविस्कटित पडली होती. पाववाला अजून यायचा होता. एकूण मैत्रीचे धन अमाप जमवलेल्या माणसाला कोणतीही सकाळ जितपत प्रप्रसन्न वाटते तितपत ती सकाळ होती. शिरा खाताना अकस्मात वेलदोड्याचा सुगंधी कण दाताखाली यावा तशी परवीन बाबीची याद आली. (शैली : मी 'याद' हाच शब्द इथे का वापरला; आणि 'आठवण' किंवा 'स्मृती' हा एखाद्या फुळकवणी लेखकाने वापरला असता असा शब्द का वापरला नाही, याचा बारीक विचार वाचक करू लागतील तर त्यांना असे साक्षात्कारेल की परवीन बाबीची म्हणून ती 'याद'; सरला येवलेकरची असती तर तिची 'आठवण' झाली असती; आणि शांता शारंगपाणीचा यात काही संबंध असता तर 'स्मृती'च म्हणावे लागले असते. लेखक निःशब्दाकडून शब्दाकडे जातो; वाचकाने शब्दाकडून निःशब्दाकडे जायचे असते! शैली.) इतक्यात उचकी लागावी तशी दरवाजावरची घंटी वाजली. (शैली). दार मीच उघडले. दारात परवीन बाबी उभी होती : तांबूसगोरा पहाटवर्ण; मोकळे काळेनिळे केस; कृष्णकमळांसारखे डोळे; आणि ओठागालावर खास माझ्यासाठी असलेले झुळझुळु हसू... एकटी होती.

दारातच तिने मला वाकून नमस्कार केला. एवढ्या सकाळी ती कशाकरता आली असेल याचा विचार करत असतानाच तिने माझ्या तोंडात एक भलामोठ्ठा पेढा घातला आणि दुसरा तिच्या तोंडात घालण्यासाठी, माझ्या हातात ठेवला. तो मी यथाकाल तिच्या ओठात सरकवला– दर वाढदिवसाला सरकवतो तसा. (हां, हे एक गुपित सांगून टाकले पाहिजे. तुम्हाला या निमित्ताने. माझ्या पेढ्याशिवाय परवीन बाबीचा वाढदिवस 'साजरा' नाही होऊ शकत.) अशा रीतीने, आम्हा उभयतांची तोंडे, स्वतंत्रपणे, गोड होत असतानाच परवीनने आपली कमनीय काया झोकवून माझ्या पायांवर काहीतरी ठेवले. मग मी आपले पारोसे शरीर वाकवून पायावर ठेवलेले ते काहीतरी उचलले.

१९ जुलै १९७६ चा 'टाईम' साप्ताहिकाचा अंक होता तो : त्याच्या मुखपृष्ठावर परवीनचे घायाळ करणारे छायाचित्र झळकत होते. मला बुवा कमाल वाटली. 'टाईम'च्या मुखपृष्ठावर मी बायका पाहिल्या नव्हत्या असे नाही. ('टाईम' म्हणजे 'माणूस' नव्हे, हे का मला समजत नाही?) शर्ले मॅक्लेन, लिव्ह उलमान यांच्यासारख्या नट्यासुद्धा पहिल्या होत्या. पण तरीही, 'टाईम'च्या लालकाळ्या मुखपृष्ठावर जगातल्या कुठल्यातरी राष्ट्रप्रमुखाचा सहेतुक चेहरा पाहयची सवय माझ्या मनाला लागलेली आहे. आणि या, मी उचलण्यापूर्वी माझ्या पायांवर ठेवण्यात आलेल्या, 'टाईम'च्या अंकावर कोणी राष्ट्रप्रमुख नव्हता, कोणी तिकडची भुर्भुर नटी नव्हती; तर चक्क माझ्याकडे वेळीअवेळी येऊन कंदाहारी कढी, चेरापुंजी सूप, चलो दिल्ली बिर्याणी, मटणमाटुंगम चापणारी, तिचे चित्रपट मी पाहत नाही म्हणून गुस्सा करणारी, देशपरदेशाहून चित्रविचित्र पत्रे पाठवणारी, 'सोलकढी'तली गुर्गुटीगंमत समजावून घेऊन मोतीचूर हसणारी, आमच्या अहमद अब्दुल कादिर अन्सारी नावाच्या मित्राची दूरची भाची आणि आमची जवळची मैत्रीण परवीन बाबी होती!

नाही म्हटले तरी मी अगदी थर्रारून गेलो. 'टाईम'चा खप माहिताय तुम्हाला?

नाही ना? मग? मला पण माहीत नाही. पण डाव्या बाजूला दोनचार आकडे लिहून त्यांच्यापुढे न मोजता येतील इतकी शून्ये, दमेपर्यंत लिहीत राहिलात की, 'टाईम 'च्या अदमासे खपाचा आकडा होईल. म्हणजे केवढी ऑलिंपिक प्रसिद्धी : आणि चित्रपटासारख्या व्यापारी क्षेत्रात प्रसिद्धी हीच सिद्धी. (शैली). आता निदान प्रसिद्धीच्या बाबतीत तरी परवीनला माझ्या आधाराची गरज भासू नये.

सुरुवातीलाच मी तुम्हाला सांगितले होते की, मी लहान-लिलिपुट असलो तरी, माझे मित्र आणि मैत्रिणी ग्रेट–गलिव्हर आहेत. असे होते तरी, आतापर्यंत त्यांच्यापैकी कोणीही 'टाईम 'च्या मुखपृष्ठावर आपली मुद्रा उमटवली नव्हती.

परवीन बाबीने ते अद्भुत केले होते.

म्हणून त्या दिवशी जे पेढे खाल्ले ते मला मोजता आले नाहीत. (शैली.)

□

## □ आमच्या मित्राचे गणित

माँट्रियलचा ऑलिंपिक क्रीडासोहळा संपला. आपल्यासाठी तो आधीच संपला होता. हॉकीचे जे व्हायचे असते, ते एकदा झाले म्हणजे, आपल्यासाठी ऑलिंपिक-ज्योत विझते. चार वर्षांनी ती पुन्हा पाजळते. माँट्रियलमध्ये मात्र ती अशी निपटून विझली आहे की, ती आपल्यासाठी पुन्हा लौकरच पाजळेल असा विश्वास नाही धरता येत.

तीस चाळीस वर्षे आपण हॉकीतले जगज्जेतेपद भोगले. महात्मा गांधी, जगदीशचंद्र बोस, सी. व्ही. रामन्, रवीन्द्रनाथ टागोर, पं. जवाहरलाल नेहरू आणि डॉ. इंदिरा गांधी यांनी सांभाळलेली भारतीय लोकशाही, योगविद्या, पांढरे वाघ, खादी-हातमागाचे कापड, टपालतिकिटे, भारतीय कढी, बाबा आमटे, तेनसिंग नोर्के, लता मंगेशकर, सुनील गावस्कर, बेसुमार लोकसंख्या आणि ढंगदार हॉकी या, गेल्या पन्नास वर्षातल्या आपल्या कर्तुत्वाच्या जागतिक पातळीवरच्या निशाण्या. हॉकीपुरतेच बोलायचे तर गेल्या चार-पाच वर्षात आपली घांदल व्हायला लागली होती. अर्जेंटिना, हॉलंड, पश्चिम जर्मनी, ऑस्ट्रेलिया आणि अर्थात पाकिस्तान हे संघ खोडचा करायला लागले होते. तथापि आपण दादा आहोत हे आपण दाखवत राहिलो. दादागिरी चालू राहिली गेल्या वर्षीच तर आपण विश्वचषक जिंकला. त्यामुळे, विजयासाठी झुंजावे लागले तरी विजय निश्चित मिळेल, असा आशावाद माँट्रियलला निघताना कर्णधार अजितपालसिंगला सहज फेकता आला.

त्याचे आज करायचे काय, असे त्याला होऊन गेले आहे. कारण हॉलंड आणि ऑस्ट्रेलियाने आपली हॉकीची दांडकी थोडी कमी करून आपल्याला भारतामध्ये परत पाठवून दिले आहे. ती दांडकी निघतानाच थोडी कमी होती की, खरोखर परततानाच कमी झाली आहेत. कोणी म्हणतात, कृत्रिम हिरवळीचे काही खरे नाही, कोणी म्हणतात, निवडसमिती चुकली, कोणी म्हणतात, बरोब्बर ऑलिंपिकचे ते दिवस हॉकी-संघाला धार्जिणे नव्हते. कोणी म्हणतात, उत्तर भारतीय अजितपालसिंगऐवजी एखादा दक्षिण भारतीय कर्णधार असता, तर असे झाले नसते. कोणी म्हणतात, गोविंदा नव्हता म्हणून आपला 'गोविंदा' झाला. कोणी म्हणतात, जादा आत्मविश्वास नडला. कोणी म्हणतात, आत्मविश्वास नसल्यावर दुसरे काय होणार? कोणी म्हणतात, यंदा इथे पाऊस बरा पडल्यामुळे तिथे घोटाळा झाला. कोणी म्हणतात, तिथले खाणे भारतीय हॉकीतंत्राला मारक होते. कोणी म्हणतात, व्हायकिंगची करणी आहे ही. कोणी स्वदेशखिल्लीउडवक तर इतक्या टोकाला जातात की, ते म्हणतात, हॉलंड आणि ऑस्ट्रेलियाचे हॉकीपटू भारतीय हॉकीपटूंपेक्षा अधिक चांगले खेळले म्हणून त्यांचा विजय आणि भारताचा पराजय झाला. (हुडुत–हुडुत–हुडुत–हुडुत–हुडुत)

आमच्या एका फुरसतीच्या मित्राला, मुळात इतकी वर्षे हॉकी या खेळात आपण अद्वितीय राहिलोच कसे, याचाच अचंबा वाटत आलेला आहे. त्याचे म्हणणे असे की, बाकीचे सूर कळकट लावणारा एखादा गवय्या एखादाच सूर तेजःपुंज कसा काय लावू शकेल? दर्जेदार खेळाडू असे यदृच्छया अवतार घेत नसतात. त्यासाठी सगळ्या राष्ट्रात खरे खेळकर वातावरण तयार व्हावे लागते. खेळाला कामाची प्रतिष्ठा यायला लागते. खेळ ही फावल्या वेळात उरकायची गोष्ट आहे असे न मानता, ती एक जीवनदृष्टी आहे असा साक्षात्कार व्हावा लागतो. खेळ खेळणारे असले तरी, खिलाडूपणा सर्वांनी जोपासावा लागतो.

अरेच्चारे बापरे! हे आमच्या मित्राचे गणित भलतेच अवघड दिसते. हे गणित सोडवून ती ज्योत पाजळायची म्हणजे नवे शतक उगवायची वाट पाहायला हवी. त्यापेक्षा वाळू रगडून तेल काढणे सोपे जाईल, म्हणतो मी. शिवाय त्या तेलाने ज्योतसुद्धा पाजळता येईल.

–अनंतराव



# कम्युनिस्ट जगत्

## नव्या–जुन्या भूमिकांचा मेळ

वा. दा. रानडे

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीची आणि पॉलिटब्यूरोची बैठक कलकत्त्यास नुकतीच झाली. युरोपातील कम्युनिस्ट पक्षांच्या बर्लिन परिषदेचे निर्णयावर पक्षाने आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. मार्क्सवाद–लेनिनवाद ही एखाद्या बड्या कम्युनिस्ट पक्षाची किंवा नेत्याची मक्तेदारी नव्हे. आपल्या देशाच्या विशिष्ट परिस्थितीनुसार त्याचा स्वतंत्रपणे अर्थ लावून धोरण आखण्याचा प्रत्येक कम्युनिस्ट पक्षाला अधिकार आहे या इटली, फ्रान्स, स्पेनच्या कम्युनिस्ट पक्षांनी घेतलेल्या भूमिकेचे मार्क्सवाद–लेलिनवादाचा अर्थ रशिया व चीनच्या नेत्यांनीच लावायचा आणि बाकीच्या कम्युनिस्ट पक्षांनी या दोघांपैकी कोणाच्या तरी गटात सामील व्हावयाचे ही भूमिका त्यांना मान्य नाही. मार्क्सवादीपक्षाने घेतलेली ही भूमिका तत्त्वतः बरोबर आहे. आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीचा इतिहास पाहिला तर असे दिसते की, रशिया–चीनच्या नेत्यांचे धोरण नेहमीच बरोबर होते असे नाही. त्यांच्या हातूनही चुका झालेल्या आहेत आणि त्याची झळ इतर देशातल्या कम्युनिस्ट पक्षांनाही भोगावी लागली आहे. रशिया–चीन शिवाय तिसरा एखादा कम्युनिस्टपक्षही परिस्थितीचे अधिक अचूक विश्लेषण करून धोरणाची आखणी करू शकेल ही शक्यता मान्य केली पाहिजे.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने आणखी दोन महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत. त्यांपैकी एक मुद्दा म्हणजे सत्तारूढ कम्युनिस्ट पक्ष आणि सत्तेवर नसलेले कम्युनिस्ट पक्ष यांचे संबंध सत्तारूढ कम्युनिस्टपक्षाने आपल्या परराष्ट्रीय धोरणाची उद्दिष्टे साधण्यास मदत व्हावीत अशाच धोरणास सत्तेवर नसलेल्या कम्युनिस्ट पक्षांना बांधून घेतले. त्या पक्षांना स्वतःच्या देशातील विशिष्ट परिस्थितीनुसार धोरण आखण्याची मोकळीक दिली नाही. अशी टीका मार्क्सवादीपक्षाने सत्तारूढ कम्युनिस्ट पक्षांवर म्हणजेच मुख्यतः रशिया व चीनवर केली आहे.

रशिया व चीनच्या प्रश्नावर त्यांची दुसरी टीका अशी की, भांडवलदार राष्ट्रांशी आणि स्वतःला समाजवादी म्हणवणाऱ्या पण वस्तुतः कम्युनिस्टविरोधी असलेल्या पक्षांशी ते मैत्रीचे संबंध प्रस्थापित करतात. त्यांची भूमिका मान्य नसलेल्या कम्युनिस्ट पक्षांपेक्षाही हे भांडवलदारी पक्ष व राष्ट्रे त्यांना अधिक जवळची वाटतात. मार्क्सवाद्यांची टीका बरोबर आहे. पण हे असे का घडते याची अधिक सखोल मीमांसा व्हावयास हवी. माझ्या मते, आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळ खऱ्या अर्थाने उभी राहिलीच नाही. 'कॉमिन्टर्न' आणि 'कॉमिन्फॉर्म' या आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन झाल्या पण रशियाच्या परराष्ट्र धोरणामागे इतर कम्युनिस्ट पक्षांचे बंड उभे करणे हाच त्यांचा उद्देश होता. राष्ट्रवादाने आंतरराष्ट्रवादावर मात केली. रशिया व चीनमध्ये क्रांती झाली पण राष्ट्रवादी प्रवृत्तींचा प्रभाव कम्युनिस्टही दूर सारू शकले नाहीत. या देशांच्या धोरणांची आखणीही राष्ट्रीय हितसंबंधांनुसारच होऊ लागली. रशिया–चीन संघर्षाच्या अनेक कारणांमध्ये राष्ट्रीय हितसंबंधांतील विरोध हे महत्त्वाचे कारण आहे. टिटो–स्टॅलिन संघर्षामागेही हेच मुख्य कारण होते.

मग आंतरराष्ट्रवाद हे स्वप्नच म्हणावयाचे काय? कम्युनिस्ट चळवळीच्या विकासासाठी आंतरराष्ट्रवादाची काही आवश्यकता नाही काय? की त्याचे स्वरूप बदलायला हवे? राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रवाद या प्रवृत्ती परस्परविरोधीच आहेत काय? त्यांच्यात काही समन्वय साधता येणार नाही का? हे प्रश्न उपस्थित होतात. कम्युनिस्ट चळवळीला एक आंतरराष्ट्रीय केंद्र असण्याची आता आवश्यकता नाही. प्रत्येक कम्युनिस्ट पक्षाने आपल्या देशातील परिस्थितीचा स्वतंत्र, वस्तुनिष्ट अभ्यास करून धोरणाची आखणी करावी, असे मार्क्सवादी पक्षाला वाटते. आंतरराष्ट्रीय केंद्र नको याचा अर्थ विचारविनिमयही नको, अनुभवांची देवाणघेवाण नको असे नाही. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षालाही ते अभिप्रेत नाही. 'कामगारवर्गाची सर्वाधिकारशाही' या मार्क्सवादाच्या महत्त्वाच्या सिद्धान्ताचा फ्रान्स, इटली जपानच्या कम्युनिस्ट पक्षांनी त्याग केला. जपानने तर त्याच्याही पुढे जाऊन 'मार्क्सवाद–लेनिनवाद' या शब्दांचाही त्याग केला. मार्क्सवादी कम्युनिस्टांना ही भूमिका मान्य नाही पण एकदम या पक्षांवर 'सुधारणावादी प्रतिक्रांतिवादी, भांडवलदारांचे हस्तक' असे शिक्के न मारता त्यांची भूमिका समजून घेण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. त्यांची सविस्तर निवेदने त्यांनी मागितली आहेत. आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीत अशी वैचारिक देवघेव चालू राहिलीच पाहिजे. त्यातूनच एकमेकांच्या चुका सुधारल्या जातील.

आंतरराष्ट्रवाद आता संपला असे मानण्याचेही कारण नाही. राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रवाद परस्पर विरोधी मानून कम्युनिस्ट चळवळीने नेहमी आंतरराष्ट्रवादाचा पुरस्कार केला. पण हा आंतरराष्ट्रवाद खरा नव्हता. रशियाच्या परराष्ट्र धोरणाशी तो जखडलेला होता. त्यातून मुक्त होताना तो आपले अस्तित्वच गमावून बसत नाही ना याची दक्षता घेतली पाहिजे. मार्क्सवादाचे शाश्वत सिद्धान्त हा या नव्या आंतरराष्ट्रवादाचा पाया असला पाहिजे. मार्क्सवादाच्या वैचारिक बैठकीत शाश्वत काय आणि बदलणारे काय याचा अधिक सखोल विचार होणे आवश्यक आहे. कामगारवर्गाची सर्वाधिकारशाही मार्क्सला त्याच्या काळच्या विशिष्ट परिस्थितीत आवश्यक वाटली असेल पण ती काही काळापुरतीच राहील व अखेर मानवसमाजाचा एवढा विकास होईल की, त्याला राज्यसंस्थेची आवश्यकताच भासणार नाही हे मार्क्सचे स्वप्न होते. पण कम्युनिस्ट क्रांत्यांचा अनुभव असे सांगतो की, एकदा आलेली हुकूमशाही किंवा सर्वाधिकारशाही तात्पुरत्या काळापुरती न राहता चिरस्थायी होते. कामगारवर्गाच्या सर्वाधिकारशाहीचे रूपांतर कम्युनिस्ट पक्षाच्या व काही वेळा एका व्यक्तीच्या हुकूमशाहीत होते. जेथे लोकशाहीची परंपरा आहे तेथे लोकशाहीच्या मार्गाने समाजवाद आणण्याचा प्रयत्न का करू नये? फ्रान्स–इटलींचे कम्युनिस्ट पक्ष आज याच निष्कर्षाला आले आहेत. समाजवादी क्रांती आणि हिंसा यांची सांगड ही अभेद्य नाही. विशिष्ट मार्ग किंवा विशिष्ट साधनांबद्दलच आग्रह धरण्याचे कारण नाही. येथे फक्त काही प्रश्न मी विचारासाठी नमूद केले आहेत. त्यांचा विचार होऊन जास्तीत जास्त समावेशक पण तत्त्वनिष्ठ भूमिका आखण्याचे प्रयत्न होणे आवश्यक आहे.

त्यासाठी विचारांच्या खुल्या देवघेवीस सर्वांत अधिक महत्त्व दिले पाहिजे. पण कम्युनिस्ट पक्षांची अजून या गोष्टीस तयारी नाही. युरोपियन कम्युनिस्ट पक्षांच्या परिषदेत फ्रान्स व इटलीच्या कम्युनिस्ट नेत्यांनी जी भाषणे केली ती गाळून किंवा अगदी संक्षिप्त करून त्या परिषदेचा वृत्तान्त रशियन पत्रात देण्यात आला. सर्वांत मोठ्या कम्युनिस्ट पक्षाची ही स्थिती तर कम्युनिस्ट चळवळीत खुल्या विचारविनिमयाचे वारे येणार कसे? पण समाजवाद व लोकशाही यांची सांगड घालण्यासाठी या दोन्ही मूल्यांवर श्रद्धा असणारांना खडतर प्रवास करावा लागणार आहे. [ ]

पुणे येथे १९६७ पासून ' फ्रान्स मित्र मंडळ ' ही संस्था काम करते आहे. भारत आणि फ्रान्स या दोन देशांमध्ये सर्वसामान्य स्तरावर परस्पर परिचय व्हावा, सामाजिक प्रश्नांवर विचारविनिमय व्हावा हा या संस्थेचा उद्देश. पॅरिसमध्ये ' परस्पेक्टिव्ह आझिये ' ( एशियन परस्पेक्टिव्ह ) ही संस्था ' फ्रान्स मित्र मंडळा 'बरोबर काम करते. या दोन्ही संस्थांतर्फे आतापर्यंत सुमारे सहाशे फ्रेंच मंडळींनी पुण्यात आणि सुमारे दोनशे भारतीय मंडळींनी फ्रान्समध्ये एक महिना वास्तव्याचा अनुभव घेतला. दरवर्षी मे आणि ऑगस्टमधील सुट्ट्यांमध्ये हा प्रवास आयोजित केला जातो. ऑगस्ट १९७६ मध्ये चाळीस फ्रेंच मंडळी पुणे, नासिक, कोल्हापूर, भावनगर येथे राहण्यासाठी येत आहेत.

मे १९७६ ते ऑगस्ट १९७६ मध्ये अठरा भारतीयांचा एक गट फ्रान्समध्ये जावून आला. या गटाबरोबर ' माणूस 'चे लेखक श्री. शांताराम पारपिल्लेवार हे गेले होते. ' माणूस 'च्या वाचकांसाठी त्यांचे अनुभव लिहीत असताना ते म्हणतात, " मला प्रवासवर्णन लिहावयाचे नाही. वास्तूंपेक्षा व्यक्तींवर मी भर दिला आहे.

' पॅरिस, आय लव्ह यू ' ही या वेगळ्याच दृष्टिकोनातून लिहिलेली लेखमाला माणूसमधून क्रमशः सुरू होत आहे. दुसरा लेख मात्र २१ ऑगस्टच्या अंकात येईल. कारण १४ ऑगस्ट अंक ' एम्. एन्. रॉय विशेषांक ' म्हणून प्रसिद्ध होत आहे.

# पॅरिस, आय लव्ह यू

**शांताराम पारपिल्लेवार**

पॅरिसमधला आमचा मुक्काम संपत आला होता. जवळजवळ महिना होत आला, आम्ही फ्रान्समध्ये हिंडत आहोत. बारा गावचं पाणी नव्हे तर, बारा गावची वाईन पीत आहोत. जायच्या आधी पॅरिसच्या मित्र-मैत्रिणींनी एक समारोपाचा सोहळा ठेवला आहे. भारतीय मित्रमैत्रिणी ज्या कुटुंबांतून पाहुणे म्हणून राहिलेत त्या कुटुंबाचे प्रतिनिधी हजर आहेत. आंवर्जून फ्रेंच मैत्रिणींनी साड्या नेसल्या आहेत. हातांत बांगड्या आहेत. कपाळाला काहींनी कुंकूही लावलं आहे. मी प्रत्येकाला माझ्याजवळची भारतातील महत्त्वाची ठिकाणं दर्शवणारी पोस्ट-कार्डस् दिलीत. कुणाला ताजमहाल, कुणाला अंजठ्याचा पद्मपाणी, कुणाला खजुराहोचं काममग्न शिल्प, कुणाला काश्मीरच्या बर्फाचा रग ओढून पडलेले गिरीवर. आणखी कितीतरी. चंदनाचा एक हत्ती मारीथेरेसला दिला. तिनं व्यक्तिशः माझ्यासाठी खूप वेळ अन् पैसा खर्च केलाय्. ला मामात डिनर, ला कपोलात आईसस्क्रीम, कारनं पॅरिस बाय नाईट. मिस् मारीव्होत्र सिगरेटस् खूप प्यायची. तिला मी आठवणीनं काश्मीरची सिगरेट-केस दिली. ती दिवसभर आमच्यासोबत असायची. पॅरिसचं एक एक ठिकाण दाखवायची. नोत्र दाम, व्हिक्टर ह्यूगोचं घर, इन्व्हॅलिडस्–नेपोलियनचं थडगं, लूव्हर् गॅलरी, आगस्ट रोदँच्या शिल्पांचं प्रदर्शन, सीन नदीतून बोटींग. मिस रिपर्टही आली होती. तिला मी एक प्लॅस्टर ऑफ पॅरिसमध्ये केलेलं शिल्प दिलं. मिथुन. ती म्हणाली, ' हाऊ लव्हली ! ' तिनं मला खूप मार्टिनी पाजली होती. तिला नुकताच फोटोग्राफीचा शौक लागला होता. रोदँचं ' किस् ' तिनं मला दिलं.

समारोप खरंच मोठा भावनिक सोहळा असतो. हे कुठले ? आम्ही कुठून आलो ? नियतीच्या कोणत्या अशा अदृश्य धाग्यानं बांधले गेलो ? गाठी इतक्या पक्क्या झाल्यात की, जन्मभर सुटायच्या नाहीत.

मिस् मारीव्होत्र सूतोवाच करते, ' आशा आहे, साऱ्या मित्रांना इथलं वास्तव्य आवडलं असावं. तरी फ्रेंच फॅमिली आणि फ्रेंच संस्कृती अगदी वेगळी पडते. काहींना काही गोष्टी आवडल्या नसतीलही. काहींना इथले काही प्रकार पाहून धक्काही बसला असेल. काहींना खूप काही आवडलं असणार. आपल्यापैकी प्रत्येकानंच काय आवडलं, काय नाही आवडलं, इथलं भारतीय मित्रांचं वास्तव्य अधिक सुखकर अन् चांगलं कसं करता येईल. ह्यासंबंधी थोडक्या शब्दांत सांगितलं, तर आमच्या असोसिएशनला त्याचा विचार करता येईल. '

असोशिएशन म्हणजे ' पर्स्पेक्टिव्ह एसिएन्. ' हे मंडळ गेले दहा वर्षं अस्तित्वात आहे. ह्यांच्याद्वारे जवळजवळ सहाशे फ्रेंच मित्र भारतात येऊन वेगवेगळ्या कुटुंबात राहून गेलेत. भारतीय मित्रही फ्रान्सला जाऊन आलेत.

प्रत्येकाला आपलं मत नोंदवायला तीन मिनिटं दिली आहेत. मी फादर मिचेल डिलाहुथकडे राहतो आहे. त्यांना म्हणतो, ' तीन मिनिटांत कसं सांगता येईल ? ' स्टील-फ्रेमच्या चष्म्यातून त्याचे डोळे हसतात. त्यांनी ओठावर पाईप दाबलाय्. हातात घेऊन म्हणतात, ' सगळेच बोलणार नाहीत, त्यांचा वेळ तू घे. ' मी एखाद्या धबधब्यासारखा भरून आलोय. वाटतं, मला खूप काही बोलायचं आहे. माझ्यापर्यंत मंडळी पटापट चांगलं-वाईट सांगतात. माझ्याशेजारी आपटेबाई बसल्या आहेत. त्यांना इंग्रजीत बोलायची सवय नाही. मी म्हणतो, तुम्ही

मराठीत सांगा. मी इंटरप्रीट करतो. त्याही गद्गद् झाल्यात. फ्रेंच माणसाची आतिथ्यशीलता विसरता येणार नाही म्हणतात. मग माझी पाळी.

खूप बोलावंसं वाटतानाच एकदम आपण मूक कसे झालोत ह्याचं आश्चर्य वाटतं. खूप अभ्यास करून परीक्षेला बसावं अन् नेमकं पेपर लिहिताना सारं विसरल्यासारखं व्हावं तसं झालंय्. घशाला कोरड पडलीय्. मारी थेरेस तेवढ्यात कॅमेऱ्याचा फ्लॅश मारते.

मारीव्होन्न म्हणते, ही हॅज ए लॉट टू टेल.

मी सुरुवात करतो–आय थँक असोसिएशन अँड दी फ्रेंच फ्रेंड्स् हू मेड अवर स्टे इन् फ्रान्स प्लेझंट अँड कम्फर्टेबल. आय् रिग्रेट आय् मे नॉट बी इन् ए पोझिशन टू कम्युनिकेट ऑल दॅट आय विश् टू एक्सप्रेस ...शब्द कसे अपापच येत आहेत. जसा कुणीतरी दुसराच बोलतो आहे. अन् माझ्या तोंडाचा त्यानं माईक म्हणून उपयोग केला आहे. पुढे चालूच आहे...असं वाटतं, पॅरिसमधे मी ह्या आधीही येऊन गेलोय्. सेन नदीच्या पुलावर, लूव्हर आर्ट गॅलरीत; रोदँच्या शिल्पालयात मी पहिल्यांदा गेलो. तरी वाटतं, ह्या गोष्टी मला नव्या नाहीत. ह्या आधीही मी इथं आलोय्. केव्हा? कसा? सांगता येणार नाही. शक्य आहे, कदाचित एखाद्या मागच्या जन्मात. लॅटीन क्वार्टरमधे मध्यरात्री फिरताना, शेक्सपिअर बुक कंपनीच्या पुढं तर वाटायला लागलं, जसं ही ठिकाणं मी पुन्हा पाहतोय. आभार मी हेमिंग्वेचं मानतो. त्यानं मला पॅरिस आधीच दाखवलंय्. पॅरिसला तो 'मूव्हेबल फिस्ट' म्हणतो. जिथे जाल तिथे पॅरिस तुमच्यासोबत येईल म्हणतोय. अन् मी तर पॅरिस घेऊनच पॅरिसला आलो आहे. मला कसं नवीन काही वाटतच नाही. म्युझिअम ऑफ इंप्रेशनिस्ट पाहताना तर वाटलं, मी व्हॅनगो, तुलूस लोट्रॅक, मॉने, मॅने, पिसॅरो ह्यांना प्रत्यक्षच भेटतो आहे. त्यांची चित्रं पाहताना त्यांचे दुःखाचे दिवस डोळ्यांसमोर येतात. वाटतं, ते मीच अनुभवतो आहे. लूव्हमधली लिओनार्दो या व्हिंसीची मोना लिसा माझ्याचकडे पाहून हसते आहे, अनामिक कलावंतानं अमर केलेली हात तुटलेली व्हीनस माझ्याचसाठी दोन हजार तीनशे वर्षांपासून उभी आहे...खूपच भावनिक वातावरणात नियतीनं मला आणून टाकलंय्. माझ्या आतं एक शहरच्या शहर, इथले लेखक, कलावंत हिंडत आहेत. पण नाही. हे शहर आता ते नाही. ही माणसं आता ती नाहीत. बीयरच्या एका प्याल्यासाठी व्हॅनगोला आता त्याचं चित्र ओलीस ठेवावं लागत नाही. ला कपोलात मॉडियोग्लिनीची बायको त्याला आता शोधत नाही. आता मोलिन रूज मोलिन रूज राहिलं नाही. ला कपोलात कफल्लक कलावंत बसून चहा पिऊ शकत नाही. आता हे सारं श्रीमंतांचं झालं आहे. पॅरिस शहर गरिबांचं राहिलं नाही. मी जे पॅरिस सोबत आणलं होतं ते हे नाही. ठिकाणं तीच असली तरी, आता माणसं ती नाहीत. वातावरण ते नाही. हेमिंग्वेच्या खिशात पैसे नव्हते तरी, तो पॅरिसमधे राहू शकत होता. आज पैशाशिवाय इथं श्वासही घेता येणार नाही. प्रत्येकजण चाकाच्या गतीवर स्वार आहे आणि चाक पुढे पुढेच जात आहे. अमेरिकेहून निवांतपणे जगता यावं, लिहिता यावं म्हणून हेमिंग्वे इथं आला होता. आज पॅरिस अमेरिकेला चाललं आहे.

माझ्या लक्षात येतं. आपल्याला तीन मिनिटं दिली आहेत अन् मी तर अजून काही बोललोच नाही. मी क्षमा मागतो. हवं तर मी थांबतो–म्हणतो. सारे चूप आहेत. साऱ्यांचे कान माझ्याकडे लागले आहेत.

प्लीज कंटीन्यू–मारीव्होन्न म्हणते. दुसरे काही तिची री ओढतात.

डोळ्यापुढे किती किती चेहरे एकदमच येतात. आधीचा मुक्काम मेझचा, तिथला क्लॉद, त्याची बायको लिलिया, घर कसं त्याचं सुबक, सजवलेलं, पण वरून शांत वाटणाऱ्या पातळीखाली प्रवाहाला खूप वेग आहे. इरीन–आता चाळीसची झालीय्. लग्नाकरिता आसुसलीय्. आधी टाळत आली. मारी–जो म्हणायची, 'तो माझा मित्र आहे. बॉयफ्रेंड. माझ्याहून लहान. त्याला मी सगळंच देते. शरीरही. पण लग्न नको. लग्नाशिवायही राहता येतंच की?' एक आहे कॅथलीन कुक. ही फ्रेंच नाही. पण तिला फ्रेंच येतं म्हणून फ्रान्समध्ये नोकरी मिळाली. ती अमेरिकन आहे. आपल्या देशात नोकरी नाही म्हणून इथं आली. इंग्रजी शिकवते. मरियन जदी वीस वर्षांची मनमोकळी. तिचा शिक्षण संस्थेवरच विश्वास नाही. काहीतरी वेगळं करता यावं, शिक्षणाला अधिक जीवनाभिमुख करता यावं म्हणून ती धडपडते. एज्युकेटिव्ह फिल्मस् तयार करते. फिलीप कार्मिनाटी मायग्रेटेड एमिग्रंटस्करिता, त्यांचं जीवनमान सुधारता यावं, त्यांना ह्या देशात मानानं जगता यावं म्हणून धडपडतो. मिस्टर आणि मिसेस ग्रनवाल. भारतीय मित्रांना जास्तीत जास्त मजेत कसं ठेवता येईल एवढ्याकरिता उठबस करतात. ह्या वयात. म्हातारा सत्तरीचा आहे. पण त्याचा उत्साह दांडगा. तरुणालाही लाजवील असा. दीर्घायुष्याचं रहस्य विचारलं तर म्हणतो, 'मी शहद पीतो.' नावं तरी किती द्यावीत? खूप माणसं भेटलीत. प्रत्येकाची गोष्ट वेगळी, छंद वेगळे, विचार वेगळे, जीवन वेगळे. एकाचा दुसऱ्याशी मेळ नाही. फिलीप कार्मिनारीच्या 'अॅकडेमी ऑफ मायग्रेटेड एमिग्रंटस्'च्या भिंतीवरची कविता तर मी विसरणार नाही. अल्जेरिअन मजूर कामगारानं लिहिलेली. मी ती भारतात आणली. मित्रांना दाखवली. दुसऱ्यासाठी राबणाऱ्या परकीय मजुराची वेदना त्यात व्यक्त आहे.

I would like to explain to you
Face to face
I am imprisioned in my skin
Rooted in my being
Sidetracked by the present
And because of this
I fell into Anonymity.

कवीचं नाव जामील खारची. त्याला प्रत्यक्ष भेटता आलं नाही ह्याची खंत मनात आहेच.

पुनः कुणीतरी म्हणतं–मिस्टर शांताराम, प्लीज कंटीन्यू. यू कॅन टेक युवर ओन टाईम.

मी एक ग्लास पाणी पितो. परत बोलायला लागतो–मित्रांचा आग्रहच झालाय् म्हणून आधी 'थिंग्ज दॅट शॉक्ड मी' कोणत्या आहेत सांगतो.

सगळ्यात आधी मला इथं काही दिसलं असेल, तर खालचा वर्ग आणि वरचा वर्ग ह्यांच्या सोशियो–एकॉनॉमिक अवस्थात फारच विसंगती आहे. एखाद्याला महिन्याला सोळाशे फ्रँक मिळतात, तर दुसऱ्याला चाळीस हजार फ्रँक. जीवन सगळ्यांचं तसंच. पेट्रोलची किंमत, वस्तूचे भाव, मटनाचे भाव, मद्य,

सारं दोघांनाही एकाच किमतीत मिळतं. मग एकाला इतकं कमी अन दुसऱ्याला इतकं जास्त का? वेज रेशियोत जितकी जास्त तफावत असेल, तितकाच माणूस असमाधानी राहील. मी इथल्या बऱ्याच वर्कर्संना भेटलोय्. मिळकतीत महिना काढणे खरंच कठीण आहे. मागे शिल्लक कुणालाही टाकता येत नाही. एव्हढं बरंय् इथं प्रत्येक मुलामागे अलाऊन्स आहे. बायको नोकरी करीत नसेल; हाऊस वाईफ असेल, तर तिलाही अलाऊन्स मिळतो. त्यामुळं चणचण जाणवत नाही. समाजवादी राष्ट्रात हा वेजरेशिओ वन् टू टेन असा आहे. आणि तो आयडिअल आहे. तसं नसेल तर, क्रांतीला पाचारण होत असतं.

दुसरी गोष्ट जी मला प्रकर्षानं जाणवली ती म्हणजे, मायग्रेटेड एमिग्रंटस्चे प्रमाण. ते साधारण एकूण जनसंख्येच्या ४०% आहे. अल्जेरिया, पोर्तुगाल, स्पेन–देशातील माणसं, साधारणतः जी कामं फ्रेंच माणूस करत नाही त्यासाठी, आणली जातात. कामं अशी–सफाई, बांधकाम, रस्त्यांचं किंवा रुळांचं काम, रंगाई, पुताई, खोदकाम आदी. जन्मताच फ्रेंच माणूस ऐदी प्रकृतीचा आहे. हा जनसंख्येचा ओघ फ्रान्समध्ये आल्यामुळं प्रश्न दोघांकरिताही उपस्थित झाले आहेत. नेटिव्हज्साठी आणि मायग्रेटेडसाठीपण मायग्रेटेड बाहेरच्या देशातील माणसं लक्षाधीश ठेकेदार टेंपररी कामाकरिता आणतात. जन्मभर त्यांना टेंपररी जॉब करावा लागतो. त्यांना नागरिकत्व मिळत नाही. मतदानाचे हक्क मिळत नाहीत. ठेकेदार त्यांच्या श्रमावर गबर होतात. ही माणसं साधारण जीवनमान रेषेवर लोंबकळत राहतात. फ्रान्सकरिता श्रम देतो. घाम देतो. पण तो अनामिकच राहतो. जामील खास्तीच्या कवितेत ही वेदना आहे.

इथे कुटुंबसंस्था दिवसेदिवस ऱ्हासाकडे वळत आहे. कुटुंबात एक माणूस दुसऱ्याच्या स्वातंत्र्याची इतकी काळजी घेतो की, स्वातंत्र्य म्हणजे वेगळं राहणं असा त्याचा शब्दशः अर्थ होवून राहिला. उदाहरणच द्यायचं झालं तर, मुलगा किंवा मुलगी १८ किंवा २० ची झाली, कमवायला लागलीत की, विभक्त राहायला लागतात. स्वतंत्र फ्लॅटस्, मोटार वगैरे घेतात. एकदा वेगळं राहायला लागले की, आई वडिलांना मित्रांना महिन्या महिन्यातून भेटायला जावं तशी ती जातात. कित्येक म्हाताऱ्यांचे काळजीत जीर्ण चेहरे मी पाहिलेत. म्हाताऱ्या आईबापांना कुणी भेटायला येणे हा सोहळा असतो. ज्या म्हाताऱ्यांनी आपल्या हयातीत म्हातारपणची तरतूद करून ठेवली. त्यांच्यासाठी बरं आहे पण ज्यांना हे जमलं नाही त्यांचं काय? हाऊस, फॉर एजेड अ‍ॅण्ड ओल्ड आहेत. पण त्यांच्या चेहऱ्यावर लिहलेली काळजी, विवंचना, अनिश्चितता पाहून मन अस्वस्थ होतं.

घरं ही सुंदर, सजवलेली, आहेत. पण प्रत्येक घरात वास्तवात असल्यापेक्षा भिंती जास्त आहेत. काही कुटुंबातील इवली लहान मुलं मुली माझ्यात खूप रमल्या होत्या. इतक्या की, त्या माझ्याच पलंगावर येवून मला गच्च बिलगून झोपायच्या. ते पाहून त्यांच्या आई वडिलांना आश्चर्य वाटलं आणि मला त्या आईवडीलांची कीव आली. मूल जन्माला आलं की आई त्याला स्तनाला लावीत नाही; तर दुधाची बाटली देते. मूल आईच्या अंगावर वाढत नाही. अंगाई, थपथपणे, अंगाची ऊब ह्या गोष्टी फ्रेंच मुलांच्या नशिबात नाहीत. त्यामुळं होतं काय? मुलं शरीरानं वाढतात. मनानं पंगूच असतात. फ्रान्समधल्या कोणत्याही शाळेत जा, शाळेतील शिक्षिका तुम्हाला सांगेल–दहा मुलामागे एक विद्यार्थी हा प्रॉब्लेमचाईल्ड आहे. तो साधारण मुलं वागतात तसा वागत नाही. आईबाप मुलाला मनोवैज्ञानिकाच्या हाती सुपूर्त करून मोकळे होतात. हा त्याचा उपाय नाही. एका फ्रेंच डॉक्टरनं दोन पुस्तकं लिहिली आहेत. डॉक्टरचं नाव आहे फ्रेडरिक् लेबॉय्. पहिलं पुस्तक 'बर्थ विदाऊट व्हॉयलन्स' आणि दुसरं 'शांतला–ओरियेंट वे ऑफ मसाज'. दोन्ही पुस्तकं फ्रान्समध्ये खूप खपत आहेत. डॉ. फ्रेडरिक लेबॉय् भारतात येवून गेले आहेत आणि भारतीय पद्धतीनी भारले गेले आहेत. भारतात मुलाचा जन्म एक आनंद सोहळा असतो. मसाज, एक टच थेरपी आहे. मुलाच्या सर्वांगीण वाढीसाठी आवश्यक. फ्रान्समध्ये प्रत्येक मुलाची, तो वर्षाचा होत नाही की, वेगळी बेडरूम असते. आईवडीलाचं मुलाच्या सर्वांगीण वाढीत योगदान अत्यल्प असतं. इन्टलजन्स कमी असतं. मुलाबरोबर मूल होवून आईबापांना खेळता आलं पाहिजे. पण त्यांना एव्हढा वेळ कुठाय्? बाप नोकरीला, आई नोकरीला, आणि मुलं त्यांच्या नशीबाधीन.

मुलांची मानसिक वाढ खुंटायला एक कारण आणखी आहे. आई-वडिलांचा आपसातील बेबनाव. पुष्कळसे आई-वडील मुलांच्या पुढे भांडतात. हे सारं पाहून त्याचा मनोगंड तयार होत जातो. आश्चर्य नाही की, थोडा वयात आला की, तो नकाराचं तत्त्वज्ञान घेऊन उभा राहतो. आई-बाप, कुटुंब, धर्म, शिक्षणसंस्था–सारं सारं तो नाकारतो.

फ्रान्समधे विवाहसंस्था नामशेष होत आहे. मी बोलताच मिस मारीव्होन्न म्हणाली, 'गुडथिंग. वुई हॅव वन इन्स्टिट्यूशन लेस. प्लीज स्पोक ऑन.' काही म्हाताऱ्या माझ्याकडे डोळे रोखून पाहत आहेत. माझं बोलणं सुरूच आहे–आज फक्त पन्नास टक्के लोक लग्न करतात. तीस टक्के अजिबात करीत नाहीत आणि उरलेले वीस टक्के–त्यांना काय करावं कळत नाही. ह्या पन्नास टक्क्यांतही सतरा टक्के डायव्होर्स घेतात. सहा कुटुंबांत साधारणतः एक कुटुंब तुटलेलं असतं. मला वाटते, आणखी दहा वर्षांनंतर मी इथं आलो तर, इथं लग्न करणारा माणूस हातात दिवा घेऊन शोधावा लागेल. जुन्या जीवनमूल्यांची कास धरल्याशिवाय स्थिती सुधारणार नाही. (रेनेसान्स ऑफ ओल्ड व्हॅल्यूज). दूर गेलेल्या पती पत्नीमधील अंतर कमी करायला झटणाऱ्या सामाजिक संस्था हव्यात. त्यांचे प्रश्न समजून त्यांना हाताळणारे समाजसुधारक हवेत.

समाज स्थायी रूपात टिकायचा असेल, तर काही संस्था टिकणे आवश्यक आहे. कुटुंबसंस्था, विवाहसंस्था आणि धर्मसस्था. आजचा तरुण मनानं धार्मिक असला तरी, रिच्युअल अन् ट्रॅडिशन पाळत नाही. मला तरी चर्चेसमधे म्हातारी बायामाणसं आणि मुलं दिसलीत. आताशी लग्नही फारशी चर्चेसमधे होत नाहीत. ट्रॅडिशनल धर्मसंस्था फ्रान्समधे राहील की नाही, ह्याविषयी मला शंकाच आहे. व्यक्ती स्वतः प्रबुद्ध झाली की, दुसऱ्या बाहेरच्या धर्माची जरूरी नसते. पण सारेच प्रबुद्ध आहेत ह्याची खात्री काय? जे प्रबुद्ध आहेत त्यांना एक धर्म मानवजातीस पुरेसा वाटत नाही. 'वन वर्ल्ड : वन रिलीजन' अशी त्यांची धारणा आहे. धर्म कोणताच असा पूर्णत्वाकडे पोचवणारा नाही. प्रत्येकात काही चांगले, काही वाईट आहे.

अर्थात चांगलं प्रत्येकातलंच घ्यावं ह्या मताचे मस्य डलरी मला भेटले. ते एकेकाळी कॅथॉलिक प्रीस्ट होते. आता ते फादर नाहीत. त्यांनी प्रीस्टहूडची वसनं केव्हाच अंगावेगळी केलीत.

शिक्षणावर कुणाचाच विश्वास नाही. परंपरागत चालत आलेली पद्धती अजूनही चालूच आहे. शिक्षण जीवनाभिमुख करणारं नाही. ते जीवनाला जवळचं आणि उन्नत करणारं हवं. शिक्षण जॉब-ओरिएंटेड नाही. ही पद्धत बदलावी असे सर्वांना तीव्रतेने वाटते. पण त्यादृष्टीने पावलं पडत नाहीत. शिक्षण संपवूत नोकऱ्या नाहीत म्हणून बरीच मंडळी कामाशिवाय आहेत.अंदाजे हा आकडा दहा लाखाचा आहे. बेकारीचा प्रश्न मायग्रेटेड वर्कर्समुळं आणखीच चिघळलाय्. परदेशी वर्कर्सची आवक थांबवून त्यांची कामं स्थानिक नेटिव्ह लोकांना दिलीत, तर स्थितीत सुधारणा व्हायची शक्यता आहे. पण नेटिव्ह फ्रेंच माणूस ही कामं करू शकत नाही. देशप्रेमापोटी कोणतंही काम करायला तो तयार पाहिजे. त्याला तयार केलं पाहिजे. कामाची आणि श्रमाची लाज नको. बसून खाणं हे खरं तर लाजिरवाणं. 'अमूक काम करणार नाही' ही प्रवृत्ती नष्ट व्हायला हवी. हवं तर खालच्या हीन लेखल्या गेलेल्या कामांना मोबदला जास्त देण्यात यावा. त्यामुळं तरी फ्रेंच माणूस ही कामं करायला धजावेल.

विद्यार्थी इथला संतप्त आहे.राजकारणात आघाडीवर आहे. राजकारण हे खरं तर सुजाण (Mature) आणि जबाबदार (Responsible) व्यक्तींचं क्षेत्र. ह्या क्षेत्रात उगाच अल्पवयात अन् अवेळी लुडबुड केल्यामुळे विद्यार्थ्यांचं अभ्यासात लक्ष केंद्रित होत नाही. इंजिनिअर्स, डॉक्टर्स आदींचं शिक्षण मेहनतीचं आहे. त्यांना खरं तर राजकारण करायला एवढी उसंतच मिळू नये. आर्थिक स्थैर्य आल्यानंतर राजकारण करावे हे बरे. विद्यार्थ्यांना इथं स्वातंत्र्यही बरंच दिलेलं असतं. स्वातंत्र्याचा अर्थ जबाबदारी ओळखून वागणे–असे दिसत नाही. विद्यार्थी वयाच्या बारा-तेराव्या वर्षी सिगरेट ओढायला लागतो. चवदा-पंधरात मैथुन करायला लागतो. अन् काही तर वयाच्या अठरा-वीसमधेच उद्ध्वस्त झालेले असतात. गांजा, चरस, एल् एस् डीचं सेवन करतात.

मी पुन्हा क्षमा मागतो. अजूनही मला काय सांगायचं ते संपलेलं नसतं. कुणाचा विरोध (Objection) असल्यास मी थांबायला तयार असतो. पण मित्रांची चिकाटी जबरदस्त दिसते. ते ऐकायला तयार असतात. मला पुढे सुरू ठेवायची सूचना मिळते. मी सुरू करतो, आताशी योगविद्येचा इकडे खूप प्रसार होत आहे. बहुतेकांत एक फॅशन म्हणून ही आवड बळावली आहे. काहींना वाटतं, शरीर सुडौल ठेवायचं म्हणून योग करायचे. योगाचा त्यांनी बराच मर्यादित अर्थ घेतलाय्. इट इज सिंक्रोनायझेशन ऑफ बॉडी अँड माईंड. इट इज नॉट जिम्नॅस्टिक अॅज मेनी फ्रेंच फ्रेंडस् टेक इट फॉर ग्रँटेड. अँड इट इज नॉट लर्निंग. इट इज प्रॅक्टिस. योगाचा पुन्हा नव्या दृष्टीनं विचार व्हायला हवा. समाधानाची गोष्ट आहे की, योगाचा प्रचार शास्त्रीय दृष्टिकोनातून होत आहे. येहुदी मेनूहीनसारख्यांनी त्याची निकड पटवून दिली आहे. पॅरिससारख्या अत्याधुनिक शहरात 'नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ योग' आहे.

काही फ्रेंच मित्रांनी 'कामसूत्राचा' उल्लेख 'ओह! दॅट इरोटिक बुक' असा केला. ते मला खटकलं. त्यांनी खोलात जावून विचार केलाच नाही. इट इज ए बुक ऑन आर्ट ऑफ लव्ह. ज्यांनी उल्लेख केलाय् त्यांना मी ते पुस्तक पुनः सुरुवातीपासून समजून उमजून वाचायची विनंती करतो.

आतापर्यंत मी मला फ्रान्समधल्या शॉकिंग गोष्टी कोणत्या आहेत तेच सांगत राहिलो. जितकं शॉकिंग गोष्टीसंबंधी बोललो त्याच्या दुप्पट इथल्या चांगल्या गोष्टीसंबंधी बोलता येईल. काही गोष्टी ज्यांचा उल्लेख मला टाळताच येत नाही त्या अशा–

फादर मिचेल डलाहूथसारखी चांगली माणसं इथं आहेत. इथं ते चर्चमध्ये नुसतेच फादर नाहीत; तर त्यांनी संस्कृत, पाली भाषांचा अभ्यास केलाय्. हिंदुइझम आणि बुद्धीझम ते कॉलेजात शिकवतात.

लेफ्कविच क्लॉदसारखा तरुण इथं आहे जो योगाचे वर्ग विनावेतन घेतो.

मस्य डलरी आहेत. ज्यांनी मराठीचा अभ्यास जाणकार मराठी माणसापेक्षा जास्त केलाय्. तुकारामाचे अभंग त्यांनी फ्रेंच भाषेत नेलेत. ते पुस्तक सोनोपंत दांडेकरांना अर्पण केलंय्. हा माणूस देहूला गेलाय्. आळंदीला गेला. पंढरीचा वारकरी झाला. आता ज्ञानेश्वरीच्या अनुवादासाठी प्रयत्नात आहे.

एक चित्रकार आहे, मरोल. मोमात्रला राहतो. त्याचं नाव ज्यॉ क्लॉद अन् बायकोचं फ्रांकॉईस. दोघंही दहा वर्षांपूर्वी भारतात येवून गेलेत अन् आता अगदी भारतीयासारखे राहतात. मा आनंदमयीच्या सान्निध्यात आलेत अन् त्यांच्यात क्रांतीच झाली. गेली दहा वर्षं झालीत त्यांनी मटनबीफ पोर्क सोडलंय. साध्या राहणीची दीक्षा घेतली.

अशी नावं तरी किती द्यायचीत. खूप चांगली माणसं आहेत.

माणसाच्या शोधात इथवर आलो. अन् माणूस हर रंगात पाहिला. ठिकाणं खूप पाहिलीत. खूप आवडलीत. त्यांच्यासंबंधी सांगत बसलो तर दिवस पुरायचा नाही.

आवडलेल्या वस्तूत–शॅम्पेन आहे, सीडार आहे, कॉनॅक आहे. इटालियन पीझा आवडला, अल्जेरियन खुसखुस आवडला. त्यापेक्षा खुसखुससोबत दिली जाणारी चटणी आवडली. लाल मिरच्यांची.

मारीजोनं गायलेलं गाणं, मारी नोएलनं वाजवलेली गिटार अन् क्लॉडीननं म्हटलेलं हिंदी गाणं 'सुहाना सफर है सुहाना सफर' ह्या साऱ्या आवडीच्या गोष्टी. मारी थेरेसनं दिलेली शिवी 'स्टुपिड मॅन' आवडली आणि फ्रेंच नाईटच्या दिवशी मैत्रिणींनी मित्रांनी सादर केलेलं लोकनृत्य. पोल्का. त्याचा उल्लेख टाळून चालणार नाही. मेर्सी.

बोलत गेलो. बोलतच गेलो. थांबलो तेव्हाही वाटतच राहिलं. अजून खूप सांगायचं राहून गेलं. हिमखंडासारखं, सांगायचं होतं ते सगळं अजून हृदयातच साचलेलं आहे. तळाच्या खाली.

कधी वेळ मिळालाच तर निवांतपणे लिहून काढायचं आहे. तोपर्यंत मी गप्प बसेन. आठवणीत हरवण्यासारखं सुख नाही.

I have learned the Past is never coming back.

It is always there to remind me.

Memories don't leave like people do.

They alway stay with you.

निग्रो गायक, जॉनी ब्रिस्टल वाटतं, माझ्याच भावनेला शब्द देतोय्. माझंच हृद्‌गत तो मोकळं करतोय्. [क्रमशः]

तिसऱ्या शतकात होऊन गेलेल्या एका जगन्मान्य भारतीय कामसूत्रकाराच्या जीवनावर आधारलेली एक ललितरम्य कादंबरी ( भाग ६ )

# वात्स्यायन

दि. बा. मोकाशी

## वेसाधिकाऱ्याचे दुःख

भल्या पहाटे उठून, दोघांची स्नानसंध्या आटोपून सोमलाने वात्स्यायनाला पाटलिपुत्रातील अवंती वेसेशी नेले.

मार्गात जागोजागी त्यांचा खोळंबा झाला. नगरीतील सुसंस्कृत, प्रतिष्ठित नागरिक सारखे भेटत होते. कधी ते सोमलाला थांबवीत होते, कधी सोमल त्यांना थांबवीत होता. त्यांच्याशी बोलून पुढे जाताच सोमल त्यांचा परिचय सांगण्यापलीकडे एकही शब्द बोलत नव्हता. तो परिचयही त्या नागरिकांत जे उत्तम होते तेवढ्याचाच. हा सुसंस्कृतपणा वात्स्यायनास आवडला. प्रत्येक नागरिकाशी बोलताना सोमलाने आपली एक तरी कथा त्याला ऐकवली होती. ती त्याच्या म्हणींप्रमाणे स्वरचित असेल, नसेलही.

इतक्या कथा त्यानं कुठून गोळा केल्या? इतके अनुभव कुठे घेतले? त्या 'इतक्या' नसतीलही. त्याच व्यक्तींना त्याने त्याच त्याच कथा ऐकवल्या असतील. सांगताना सारे अंग हलवीत तो हसला असेल. ऐकणारे सभ्यतेसाठी हसले असतील. महेश्वरदत्ताहून हा अगदी वेगळा आहे. शरीराच्या मानाने याचे डोके फार लहान वाटते. डोके लहान नसेल. अवाढव्य पोटामुळे वाटत असेल. याचे केस काळे असताना सुंदर दिसत असतील. महेश्वरदत्त कधीच लठ्ठ झाला नाही. त्याच्या लगबगीनं त्याला सडपातळ ठेवला. वेशेत त्याच्या रोज आठ खेपा होत असाव्यात. उपासमारीनंही.

वात्स्यायनाच्या मनात आलं, दोघे कामशास्त्रात निपुण आहेत, पण तंत्रे वेगळी आहेत. नागरिक कसा नसावा याचे महेश्वरदत्त हे एक उदाहरण आहे, तर आदर्श नागरिक कसा असावा हे सोमलावरून पाहावे. महेश्वरदत्ताने स्वतः कामोपभोग किती व कसा घेतला कुणास ठाऊक? त्याला दुसरे कामसुख घेत असता बघताना आनंद होतो. त्याने जुळवून दिले असेल, तर अधिक आनंद. सुरतश्रमानंतरचे तांबूलसेनेचे सौंदर्य पाहून त्याचे डोळे कसे आनंदाने फुलले होते! आपल्या पत्नीलाही हे सुख देता येईल याचा विचारही त्याच्या मनात आला नाही. हा विटव्यवसाय सोडावा, आपणही अन्य व्यवसायात धन मिळवावे, घर सुंदर करावे, उद्यान फुलवावे आणि कामशास्त्राला धरून सुखाने कामोपभोग घेत राहावे असे त्याच्या स्वप्नातही आले नसावे. कामशास्त्र माहीत असूनही. त्याचे सुख वेगळे आहे. जो तो आपल्या सुखाचे ते करतो.

याउलट सोमलाचे. तो जवळ आला तरी, अंगलेपांचे सुवास येतात. तो कोणते उटणे लावतो विचारले पाहिजे. त्याने काखेतले केस काढलेले आहेत. त्याचे धोतर आणि उत्तरीय स्वच्छ असते. डोळ्यांत काजळ असते. भुवया रेखीव ठेवलेल्या असतात. तो सकाळ-संध्याकाळ स्नान करतो. घर सुंदर ठेवले आहे. उद्यान सुंदर आहे. त्याचे सगळे नीट पाहून ठेवले पाहिजे. आपण हातातले काम आटोपून घरी गेलो की, घर असे सुशोभित ठेवू. केव्हा घरी जाऊ तेव्हा. आज तरी वासंतिका आणि अंगरिक्ष यांचाच विचार.

अंगरिक्षाने सोमलासारखे केले असते तर, किती बरे झाले असते! नागरिकाने सोमलासारखी आधी विद्या पुरी करावी. मग धन मिळवावे. नंतर आवडेल अशी स्त्री पाहून विवाह करावा व सुखाने कामोपभोग घ्यावेत. सोमल आदर्श वाटतो. पण धन मिळवण्याआधीच एखादी कन्या मनात भरली तर? सोमल काय उत्तर देईल? अर्थार्जनाआधी लग्न करावे काय? आपण काय सांगू? वात्स्यायनाला वाटले, आपण त्या कन्येशी लग्न करायला सांगू. धन मिळवीपर्यंत ती कन्या दुसऱ्याची होणार. आपले चित्त हरण करणारी कन्या दुसऱ्याची झाल्यावर धनाचे सुख लाभणार नाही. तेव्हा कन्या फारच मनात भरली असली तर, आधी लग्न करावे. तेच सुखाचे. आपण तसे कामसूत्रात लिहिले तर, महेश्वरदत्त हसून विचारील, 'अंगरिक्षाचे काय?'

दोघे सुखी आहेत का दुःखी आहेत कुणास ठाऊक? भीतीने त्यांच्या मनात आले, दोघे सुखी असली तर आपण खरे ठरू. सनातनी बाभ्रवीयांना ते आवडायचे नाही. धर्म, अर्थ, काम या पुरुषार्थांच्या त्रयीचा क्रमभंग झाला असे ते म्हणतील. परंपरागत क्रम आणि परंपरागत संख्या हेच त्यांचे कामशास्त्र आहे.

या अवांतर गोष्टी आपण उगीचच डोक्यात आणीत आहोत. त्यापेक्षा वेशीवर काय घडेल याची भीती मनातून काढून टाकावी. वासंतिका-अंगरिक्ष पाटलिपुत्रात असतील-नसतील. नसली तर पुढच्या प्रवासाची तयारी करावी. असतील तर कुठल्याही अवस्थेत ती दिसतील. मनाची तयारी ठेवावी. एकदम त्याला वाटू लागलं, हा शोध फोल आहे. तारुण्यात प्रवेश केलेले ते दोन जीव, व्याघ्र सिंहांनी भरलेल्या अरण्यात दोन हरीण-पाडसे सोडावी तसे आहेत. वेशींतून रोज शकडो प्रवासी येत असतील आणि शेकडो या वेशीतून बाहेर जात असतील. एक जोडपं कुणाच्या लक्षात राहणार?

ते वेशीत येताच सोमलाचे जे स्वागत झाले त्यावरून तो तेथे खरोखरी सुपरिचित आहे, हे पाहून वात्स्यायनाला बरे वाटले. वेशीचा अधिकारी सोमलहूनही वयाने वृद्ध होता. अभिवादने आदि झाल्यावर बैठक बसली. प्रथम परस्परांच्या कुटुंबियांबद्दल कुशल प्रश्न विचारणे झाले. नंतर परस्परांच्या वृद्ध शरीराच्या अवस्थेबद्दल देव-घेव झाली. पोट साफ ठेवायची औषधे एकमेकांना सांगून झाली. नंतर मित्र व परिचित यांच्या वार्ता सांगून झाल्या. मग हवापाणी, पशुपक्षी यांवरून पाटलिपुत्र आणि तिचे नागरिक यांच्या गोष्टी निघाल्या. वात्स्यायनाच्या लक्षात आलं की, रीतीला दोघे सोडणार नाहीत. दोन नागरिकांची भेट झाली की, एवढी प्रस्तावना हवीच. आपली तगमग–घाई कितीही असो.

वेशीच्या अधिकाऱ्याचे डोळे लाल झालेले होते–फारच लाल. तो म्हणत होता,

'प्रकृतीचे म्हणतोस ! पाटिलीपुत्राच्या रस्त्यांतून अपरात्री हिंडणाऱ्या स्त्रियांचा पाठलाग करिता करिता डोळ्याला डोळा नाही बाबा ! रात्रभर तुला शिव्या देत हिंडत होतो. मनात येत होतं तो साला मित्र सोमल स्त्रीसुख घेत घरात आरामात शय्येत असेल. गेल्या जन्मी आपण असे काय पाप केले आणि सोमलानं असं काय पुण्य केलं ?'

सोमल हसत म्हणाला,

'सांगतो. गेल्या जन्मी द्रव्यलोभानं तू पत्नीला विरहाग्नीत ठेऊन देशोदेशी हिंडत राहिला असशील. आताही केवळ वय झालं म्हणून तुझं गाऱ्हाणं आहे. तरुण होतास तेव्हा हिंडणारी स्त्री पकडता आली नाही की तू कष्टी होत होतास, संतापत होतास. कारण अशी स्त्री सहजसाध्य असते. परदेशांतून नगरीत येणाऱ्या सुंदर स्त्रिया टेहळण्याचे काम वेसेच्या अधिकाऱ्यांच्या साहाय्याने पाटलिपुत्रांतल्या अनेक राजे, प्रधान, सेनापती, सामंत, यांनी आणि त्यांच्या चंट पुत्रांनी केले नाही काय ? तुझ्या वाटणीला त्यांतल्या किती आल्या याची संख्या तरी तुला सांगता येईल का ? परस्त्रिया भोगण्यासाठी तुम्ही योजलेल्या युक्त्यांनी ग्रंथ भरतील. परस्त्रीचा भोग केवळ स्वतःच्या कामतृप्तीसाठी करण्याचं पाप तू फेडीत आहेस. बाभ्रव्य काय सांगतो लक्षात ठेव. जर प्राणच जात असेल, किंवा शत्रूचा नाश साधत असेल तरच परस्त्री वश करून घेण्याच्या मागे लागावं. त्यात दोष नाही. पण परस्त्रीला अडचणीत आणून भोग द्यायला भाग पाडणं यासारखं पाप नाही. त्याची एक कथा सांगतो.'

वेसेचा अधिकारी दोन्ही तळहात जोरजोरानं हलवीत म्हणाला,

'नको नको ! तुझी कथा दर्पणासमोर उभं राहून स्वतःला सांग. तेव्हा तरी आपण कथा सांगून दुसऱ्याचा किती छळ करतो हे तुला कळेल.'

सोमल खोट्या रागाने म्हणाला,

'वेशीवरच्या मूर्खा ! माझ्या ऐकलेल्या कथा सांगून तू कितीएक स्त्रियांना भूल घातली आहेस. त्या स्वतःच्या म्हणून तू त्यांना सांगतोस. ही एक ऐकलीस तर ती सांगून आणखी एक स्त्री तुला जाळ्यात पकडता येईल.'

वेशाधिकारी हताशपणे म्हणाला,

'कथा कुणाला सांगू ? काल रात्री आणून ठेवलेल्या त्या हडळीला सांगू. रात्री पकडून आणून ठेवल्यापासून ती उन्मत्त झाली आहे. तिला पकडताना किती कुंपणांवरून उड्या मारून मला जावे लागले आणि किती काट्यांतून पळावे लागले, माझे मला ठाऊक. आता हे ओरखाडे बायकोने पाहिले की ती म्हणणार, 'ही नखक्षते कुणा बयेची ? कुठे गेला होता शेण खायला ?' मित्रा माझे दिवस फिरले आहेत.'

सोमल म्हणाला,

'म्हणजे तुझे खरे दुःख हे आहे–जेव्हा तू काही करीत होतास तेव्हा तुझ्यावर आरोप येत नव्हते. आता न करता येणार आहेत.'

इतक्यात आतून जोरजोराने किंकाळ्या ऐकू आल्या. वेशाधिकारी म्हणाला,

'बघ ! अजून ती शांत नाही. हिला मी सातव्यांदा पकडली. या नगरीला काय झाले आहे कळत नाही. येथील कामतत्त्वात दोष उत्पन्न झाला आहे. तो कशाने झाला असेल ? अर्थतत्त्व बिघडले म्हणून ? अर्थतत्त्व का बिघडावे ? धर्मतत्त्व बिघडले म्हणून ? मला कळतच नाही. आपल्या लहानपणी स्त्रिया कशा होत्या आठव. सायंकाळपूर्वीच त्या घरात असत. ही बया नवरा झोपला की बाहेर पडते. आत्ता पहाशील, नवरा धावत येईल आणि वेताच्या छडीने मारत घरी नेईल. तुझ्या बाभ्रव्याने अशा स्त्रीबद्दल सांगितले आहे का ?'

सोमल म्हणाला,

'बाभ्रव्याने खूप सांगून ठेवलंय. पण तो ग्रंथ वाचण्याचे कष्ट तुझ्यासारखे घेतील तर ? आपल्या लहानपणी तो ग्रंथ जागोजागी होता. आता तो दिसतो तरी का ? काही दिवसांनी तो नामशेष होईल. तू पूर्वीच बाभ्रव्य वाचला असतास तर, ही अवस्था आली नसती.'

आत ठेवलेली स्त्री पुन्हा किंकाळ्या फोडू लागली. वेसाधिकारी कपाळावर हात मारून म्हणाला,

'नवरा येऊन मारू लागला की गुरासारखी ओरडेल. मग हळूहळू इतकी शांत होईल की, पतीच्या खांद्यावर भार टाकून घरी जाईल. पण तो आल्यावर ती त्याला ज्या शिव्या देते त्या ऐकवत नाहीत. त्याला दूर पाहताच ती ओरडते–'मेल्या झोप संपली का तुझी ?' आणि मग अर्वाच्य बोलते. तिचा नवरा वडिलार्जित संपत्तीत लोळत आहे. भयंकर आळशी. जिथे बसेल तिथे झोपतो. क्षणात घोरू लागतो. सूर्य मावळताच याचे डोळेही मालवतात. झोप आवरत नाही. मग ती त्याला जागं करण्यासाठी ओरडते, चापट्या मारते, तरी त्याचे डोळे उघडत नाहीत. मग ही घराबाहेर पडते. या झाडाखाली अंधारात उभी रहा–त्या झाडाखाली उभी रहा, करीत नगरभर हिंडते. तरुण पुरुषांकडे पाहत राहते. तिची दृष्टी पाहून एखादा तिच्याकडे येऊ लागला की, ती धावत सुटते. शपथेवर सांगतो सोमल ! हिने परपुरुषाला एकदाही स्पर्श करू दिला नाही. अरे ! हिच्या नवऱ्याने स्वतःच्या निद्रेवर आणि मदिरापानावर नियंत्रण ठेवले तर, या म्हाताऱ्या वेसअधिकाऱ्याला तिला पकडण्यासाठी रात्र रात्र जागून धावण्याची वेळ येणार नाही. पत्नीची कामेच्छा अतृप्त ठेवण्यासारखी संसारात दुःखाला कारणीभूत अन्य गोष्ट नाही. तिचा नवरा निद्रामोहानं ते करतोय आणि मी इथे रात्र रात्र वेस सांभाळीत तेच कर-

तोय. वाटतं उठावे, घरी जावे. बायकोला आलिंगन देऊन सुखी करावे.'

'मग ऊठ ! मी घरापर्यंत येतो.'

'येथून सुटका नाही अजून. ती काही सर्वसाधारण स्त्री नाही. तिचा सासरा सम्राटांचा एक प्रधान होता. आता तिचा नवरा येई-पर्यंत थांबावे लागेल. तोपर्यंत सूर्य इतका वर येईल की, घरी गेल्यावर माझे आलिंगन माझ्या पत्नीला अमान्य होईल. त्यातूनही तिला मान्य झाले तर, माझे मन बदलेल. मला ते निरर्थक वाटू लागेल. पत्नी जवळ असूनही या वेशीमधून आलेल्या सुंदर स्त्रिया मला दिसू लागतील. सोमला ! वासना फार वाईट. प्रत्येक स्त्री भोगतेवेळी, मी पाप करतो पण ती मात्र पापांतून सुटते. कारण प्रत्येक वेळी मी वासनापूर्तीसाठी तिला जवळ घेतो. तर ती अन्य हेतुसाठी मला वश होते. प्रथम तिला पाटलीपुत्रात प्रवेश हवा असतो. मग राजगृहात प्रवेश हवा असतो. व्यभिचार करूनही त्या स्त्रिया निष्पाप असतात. मला मात्र माझ्या पत्नीपुढे अपराध्यासारखे होते.'

सोमल खदखदून हसत म्हणाला,

'आज तुला फारच पश्चात्ताप झालेला दिसतो. दुसरी स्त्री भोगा-यला मिळण्याच्या मध्यंतरातला तो न ठरो. कारण तुझा पश्चात्ताप शास्त्रशुद्ध नाही.'

'का ? मी तुझ्या त्या बाभ्रव्याचे कामशास्त्र वाचले नाही म्हणून ?

'होय ! गोष्टींचे कार्यकारण शास्त्रातूनच शिकावे लागते. आम्ही बाभ्रवीय शास्त्र सोडून काही करीत नाही. माझेच उदाहरण घे. शास्त्र कसे वाचवते ते कळेल. लठ्ठ झाल्यापासून मी कामसुखाला मुकलो होतो. पण बाभ्रव्याच्या पुरुषायतिक आसनाने मला पत्नीच्या कोपा-पासून वाचवले. हा सोमल आणि त्याची पत्नी दोघे बाभ्रव्याची सदैव ऋणी राहतील. त्यांचे संभोगसुख बाभ्रव्याने अखंड राखले.'

इतक्यात वात्स्यायनाची अस्वस्थता सोमलच्या ध्यानात आली. तो वेसाधिकाऱ्याला त्याची ओळख करून देत म्हणाला,

'हे अवंतीचे मल्लनाग वात्स्यायन. त्यांच्याच कामासाठी आलो आहे ते सांगून टाकतो. नाही तर पाटलीपुत्राचे नागरिक बडबडे आहेत म्हणून अवंतीला कीर्ती जाईल. आणि वात्स्यायन ! पाटलि-पुत्रातील सर्वांत जुन्या वेसाधिकाऱ्यापुढे आपण बसलो आहोत. इतका बुद्धिवान वेसाधिकारी पूर्वी झाला नाही. यापुढे होणार नाही. वेसेतून मुंगी आत आली आणि तिचा पाय लंगडा असला तरी तो सांगेल.'

मग वेसाधिकाऱ्याला तो म्हणाला,

'गेल्या दोन चार दिवसांत या वेसींतून एक तरुण जोडपं गेलं. मुलाचे नाव अंगरिक्ष आणि मुलीचे वासंतिका. मुलगा वीस, मुलगी सोळा.'

वात्स्यायन म्हणाला, 'मुलाच्या भुवया जाड आहेत. मुलीचे मुख उभे, केस अतिशय लांब, मुलाच्या कमरेला वेणू खोवलेली. तो वेणू फार उत्तम वाजवतो. मुलीच्या गळ्यात एक लखलखीत हिरा अस-लेला पाचूंचा हार आहे.'

डोळे मिटून वेसाधिकारी ऐकत होता. एकदम डोळे उघडून तो म्हणाला,

'आठवली. दोघांच्या भोवती घोडेस्वारांचं कोंडाळं होतं. वेसेतून आत आल्यावर समोरच त्या झाडाखाली सारेजण थांबले होते. घोडेस्वार राकट होते. त्यात ती दोन कोवळी मुलं उठून दिसत होती. म्हणूनच माझे लक्ष गेले. स्वारांचा प्रमुख मुलाशी बोलू लागला. त्याने मुलीच्या गळ्याकडे बोट केले. मुलीने गळ्यातील हार काढून त्याला दिला. तुम्ही वर्णन केलात तसाच तो हार होता. मला प्रथम वाटले होते की, एखाद्या देशाच्या राजाची मुलं आहेत ती. पण हार घेऊन स्वार निघून गेले. दोघे काही वेळ वृक्षाखाली बसून होती. त्यांच्याजवळ प्रवासाची कसली सामग्री नव्हती. मला तेव्हाच संशय यायला हवा होता. जरा वेळाने मी पाहिलं तर, दोघे उठून नगरात निघाली होती.'

वात्स्यायन उठत म्हणाला,

'नगरीत कुठं गेली असतील ?'

'परमेश्वराला ठाऊक. पण प्रयत्न केला तर कळेल. चाणक्यानं नगरीत येणाऱ्या प्रत्येक प्रवाशाची नोंद करायला आम्हाला शिकवलं. त्याचे उपकार. दोघे उजव्या हाताच्या मार्गानं नगरीत शिरलो. बहुधा यात्रिकनिवासात गेली असावीत. उद्या सांगतो.'

वेसीतून बाहेर पडल्यावर सोमलला त्याच्या कामासाठी मोकळा करून वात्स्यायन अंगरिक्ष-वासंतिका गेली त्या उजव्या हाताच्या रस्त्याने निघाला. सैनिक दोघांना नगरीत सोडून निघून गेले. पाटलिपुत्रात आणून सुरक्षित सोडण्यासाठी वासंतिकेचा एक अलंकार गेला. तेवढाच तिच्या गळ्यात दिसत असे. अंगरिक्षाच्या अंगावर एखादा सोन्याचा हार किंवा अंगठी असेल ती प्रवासात अन्नासाठी वगैरे गेली असेल. अलंकार गेल्याचे काही नाही. वात्स्यायनाचे मनात आले. त्या दोघांचे काय होईल हे महत्त्वाचे. त्यांना कुठे आश्रय मिळतो हे महत्त्वाचे. जर सोमलासारखा कुणी त्यांना भेटला तर उत्तम. पण त्या विकृत वेसअधिकाऱ्यासारखा भेटला तर ?

चालता चालता बऱ्यावाईट कल्पना त्याच्या मनात येऊ लागल्या. वसंत फुलण्याआधीची पडलेली उरली सुरली शुष्कपाने मार्गांच्या दोन्ही बाजूने धावत होती. वृक्षलता हिरव्यागार झाल्या होत्या. मध्येच मोगऱ्याची सुवासिक झुळूक येत होती. आम्रवृक्षांवर शेंदरी कैऱ्या लोंबत होत्या. वात्स्यायनाचे कुठेच लक्ष नव्हते. परक्या नगरीत चालताना येणारी अनोळखीपणाची एकाकी भावना त्याच्या मनात उचंबळून येत होती. पत्नी गावी नगराला परत गेली असेल. तिथे असतो तर चंदनाची उटी लावीत पत्नीशी हास्यविनोद करीत बसलो असतो.

दुसऱ्या क्षणी या विचाराची त्याला लाज वाटली. लाज वाटण्याचे कारण काय ? कामविचार वक्र नसतो का ? मनात त्याचा केव्हा उद्भव होईल हे सांगता येणार नाही. मोठमोठे तपस्वी तप सोडून त्याच्यामुळे लोकांत परत आले आहेत. हे कळतंय म्हणूनच आपण शोध सोडून परत जाणार नाही. वात्स्यायन निश्चयाने स्वतःशी म्हणाला. अंगरिक्ष वासंतिका दोघांना घेऊनच परत जाऊ. पाटलि-पुत्रातील प्रत्येक यात्रिक निवास, प्रत्येक देवालय, प्रत्येक धर्मशाळा, प्रत्येक उद्यान शोधू.

भोजनाच्या वेळेला वात्स्यायन घरी परतला. त्याची वणवण व्यर्थ ठरली होती. त्याचे मुख उतरले होते. सोमलाच्या ते ध्यानात आले.

भोजनोत्तर सोमल म्हणाला,

'वात्स्यायन ! प्रत्यक्ष जे प्रसंगातून जातात त्यांच्या यातनांपेक्षा त्याच्याविषयी जे चिंता करितात त्यांच्या यातना जास्त असतात.'

त्याचा अभिप्राय जाणून नकळतच वात्स्यायन हसला. मग सोमलही हसत म्हणाला,

'म्हणून चिंता करू नका. त्याची एक कथा आहे. सामंतिनी नगरीत सोमदत्त नावाचा एक तरुण व्यापारी होता. त्याचे आपल्या पत्नीवर इतके प्रेम होते की, ती त्याला किंचितही दृष्टीआड चालत नसे. पत्नीचेही त्याच्यावर तितकेच प्रेम होते. वर्षाकाळ संपल्यावर नगरीतील व्यापारी दूर दूरच्या देशास व्यापारासाठी जात. सोमदत्तही प्रत्येक वर्षी त्या व्यापारांबरोबर जात असे, पण लग्न झाल्यावर पत्नीला सोडून दूरदेशी जाणे मोठे संकट वाटू लागले. धन मिळवायचे म्हणजे जायलाच हवे. तेव्हा प्रवासाची त्याने सर्व तयारी केली. नगरीबाहेरच्या आंबराईत सर्व व्यापाऱ्यांच्या गाड्या एकत्र येऊन निघावयाच्या होत्या. रात्रभर सोमदत्त पत्नीशी बोलत राहिला. पहाटे निघायची वेळ झाली तरी दोघांना विलग व्हावेसे वाटेना. सोमदत्त महालाच्या दाराशी जाई आणि परत येऊन पत्नीला आलिंगन देई. पुन्हा तो दाराकडे गेला की पत्नी धावत पुढे येऊन त्याच्या गळ्यांत पडे. शेवटी कसे तरी धीराने सोमदत्ताने दार उघडले आणि मागे न पाहता धावत घराबाहेर येऊन रस्त्यांतूनही धावत, व्यापारी जमले होते त्या आंबराईकडे गेला.

इकडे तो दाराबाहेर पडताच वियोगाच्या दुःखानं त्याची पत्नी बेशुद्ध पडली. दासीने तिला सावध केले. सावध होताच ती बराच काळ अश्रू ढाळीत बसली. अश्रू सुकल्यावर गवाक्षाबाहेर टक लावून गप्प बसून राहू लागली. आणि मनात नवऱ्याची चिंता करू लागली. मार्गात अनेक कांतार आहेत. वन्य पशू त्याला खाणार तर नाहीत ? चोरांनी येऊन त्याला ठार तर केले नसेल ? कड्यावरून त्याची गाडी खाली तर कोसळणार नाही ? अशा चिंतेने तिने अन्न वर्ज्य केले.

इकडे सोमदत्तही प्रवासात तिच्या चिंतेने बुडून गेला. ती विहिरीवर किंवा तळ्यावर गेल्यावर बुडाली तर नसेल ना ? घराच्या वाटिकेत हिंडताना तिला साप चावला नसेल ना ? सोमदत्तानेही चिंतेनं अन्न सोडले. काही दिवसांनी त्याला प्रवास करणं अशक्य झालं, इतका तो अशक्त झाला. तेव्हा त्याच्या व्यापारी मित्रांनी डोली करून, चार माणसे देऊन त्याला परत धाडला.

'त्याची डोली घरी येऊन पोहोचली तोपर्यंत त्याची पत्नी अन्नपाणी सोडल्यानं मरणोन्मुख होऊन पडली होती. सोमदत्तही त्याच अवस्थेत होता. लोकांनी त्याला उचलून पत्नीशेजारी निजविला. पण मान वळवून परस्परांना पाहण्याचीही शक्ती दोघांत उरली नव्हती. मग आलिंगन देण्याची कुठली ! आपण एकमेकांजवळ आलो हे मात्र दोघांना कळले आणि त्या आनंदाच्या हर्षाने दोघांचे प्राण गेले.

'तेव्हा वात्स्यायना ! अकारण चिंता करणं हे अनिष्ट असतं. जे जोडपं पळून जातं त्यांच्याबद्दल तर कधी चिंता करू नये. कामदेवानं ज्यांना एकत्र केले त्यांना कुणाला वेगळे करता येत नाही. चिंता सोडून आपण वामकुक्षी करू या. तिसऱ्या प्रहरानंतर इथे गोष्ठीसमुदाय आहे. माझी मित्रमंडळी येणार आहेत. त्या बुद्धिवानांशी चर्चा करायला आपण टवटवीत राहू. तुमचा मेहुणा आणि त्याची प्रेयसी यांच्याबद्दल ज्ञाते काय म्हणतात ते पाहू.'

आपल्या घरचा प्रश्न असा चर्चिला जावा हे अनुचित वाटून वात्स्यायन एकदम म्हणाला,

'नको, नको.'

सोमल हसला. तो म्हणाला,

'शास्त्राचा अभ्यास करणाऱ्यांना घरचे नि दारचे असे प्रश्न नसतात. कुठल्याही प्रश्नाच्या वेळी ते त्रयस्थ आणि शांतचित्त राहतात.'

□

## न कामांश्चरेत

सोमलाने समजावूनही वात्स्यायनाची वामकुक्षी अस्वस्थ झाली. पडलेल्या स्वप्नाचा भास पुन्हा घेण्याचा यत्न करीत तो वामकुक्षीतून जागा झाला होता. दोन्ही हातांचे तळवे उशाखाली घेऊन तो उताणा झोपला होता आणि न्हालेली पत्नी, तिचा मोकळा सुगंधित केशभार, आपल्या डोक्याभोवती पसरून आपले चुंबन घेऊन आपल्याला जागे करीत आहे असे स्वप्न त्याला पडले होते. तक्तपोशीकडे डोळे लावून, मधेच डोळे मिटून स्वप्नातला भास वस्तुस्थितीत आणण्याचे त्याचे यत्न चालू असता, त्याच्या मनात येत होते, त्या दिवशी अवंतीत निषिद्ध धरले जाणारे, तिने आपण होऊन घेतलेले ते चुंबन, त्याचा हा परिणाम आहे. या परिस्थितीतही आपले मन तो सुखानुभव सोडायला तयार नाही. तिच्या भावाचा शोध घ्यायला निघालो असता, असले स्वप्न पडले हे तिला सांगायलाही विचित्र वाटेल. तिला क्रोधही येईल ऐकून. मनातून आवडेलही. मात्र सगळे संकट निवारल्यावर स्वप्नासारखे चुंबन घेऊन आपल्याला प्रमुदित करील. त्यासाठी तरी ती दोघे सापडोत. पत्नी आणखीही काही तऱ्हेची चुंबने घेईल—जी बाभ्रव्याने सांगितली नसतील. ग्रंथ मनातून जात नाही हे वाईट आहे.

पुन्हा वात्स्यायनाने डोळे मिटले. सोमलानं हाक मारली नसती, तर तो बराच वेळ उठलाही नसता. सोमलाची हाक येताच तो झटकन उठला. मुखप्रक्षालन करीत असता आज सोमलाकडे गोष्ठीसमवाय आहे आणि मित्रमंडळी येणार आहेत हे आठवले.

केसांवरून फणी फिरवून, मुखलेप लावून, धूतवस्त्रे नेसून नंतर सोमलाशेजारी दाराशी उभं राहून दासीनं आणलेले मधुपेय घेत असता, गोष्ठीसमवायाचा पहिला सभासद दूर बागेच्या दारात शिरताना दिसला. सोमल म्हणाला,

'महदाश्चर्य ! आज कर्मठ ब्रह्मदत्त आमच्या गोष्ठीसमवायाला येतोय ! हा कर्मठ केव्हा तरी आमच्याशी वाद घालायला येणार हे मला ठाऊक होतं. पाटलिपुत्रातील प्रत्येक गोष्ठीसमवायाला तो अनाहूत जातो आणि वादाच्या प्रारंभीच ओरडतो 'न कामांश्चरेत ! न कामांश्चरेत !' कामाचे आचरण करू नये. कारण निसर्गतःच तो असतो.

'परमेश्वराचे नाव इतक्या वेळा तो घेता, तर सदेह स्वर्गाला

जाता. कामशास्त्राची आवश्यकताच नाही असे म्हणणारा एक सनातनीवर्ग पाटलिपुत्रात उत्पन्न होतोय. मला त्याची चिंता वाटते. बाभ्रव्याची कामसूत्रे आधीच कुणी वाचत नाहीसे झाले आहे. आता तर तो ग्रंथ दुर्मिळ होईल. माझ्या तरुणपणी, कामसूत्रे उतरवून घेण्यास देशोदेशीचे विद्वान येत. त्यांच्यासाठी घरात मी एक खोली ठेवली होती. आता चार-सहा महिन्यांतून एखादा येतो. तो ग्रंथ फार विस्तृत आहे असे लोक म्हणू लागले आहेत.'

ब्रह्मदत्त दहा पावलांवर येताच सोमलने पुढे होऊन त्याचा हात धरून त्याला आत घेतले आणि दासीच्या स्वाधीन केले., दासीने त्याला दगडीकडे नेऊन त्याचे पादप्रक्षालन केले. मग सोमलनं त्याला हातानं धरून सभास्थानी नेले. तिथल्या दासीने त्याला चौरंगावर बसवून त्याच्या हातांना व कपडयांना सुवास लावला. फुलांचा गुच्छ दिला.

सभागृहाची खोली लहानशीच पण सहज सुंदर सजवली होती. कोवळ्या पानांच्या माळा जागजागी टांगल्या होत्या. फुलांचे हार वरून टांगते सोडले होते. त्यांच्या सुगंधाने खोली दरवळली होती. आधी लावलेल्या धुपाच्या धुराचा किंचित निळसरपणा आणि रेंगाळणारा सुवास खोलीभर पसरला होता. भिंतींना धरून चौफेर चौरंग ठेवले होते. प्रत्येक चौरंगाचा रंग निराळा होता. चौरंगाच्याभोवती पाय झाकतील अशा फुलांच्या माळा लोंबत होत्या. मऊ गवताच्या चटयांची रंगीत आसने चौरंगावर ठेवली होती. तशीच जाड रंगीत चटई जमिनीला सुशोभित करीत होती. मधे एक मोठा चौरंग होता. त्यावर पेयें व खाद्यपदार्थ ठेवले होते. रंगावरून कळत होते की, तिन्ही तऱ्हेची मद्ये सोमलाने ठेवली आहेत. त्यांतील मधू, मैरेय ठीक. पण आपल्याला आसव जास्त आवडते. वात्स्यायनाच्या मनात आले आणि मद्याबरोबर खाण्यासाठी ठेवलेल्या भाज्या व फळे इकडे त्याची दृष्टी गेली.

तेवढयात सोमलाने त्याचा हात ओढला आणि परत त्याला दाराशी नेले. दुसरा सभासद येत होता. सोमल म्हणाला,

'हा येत असलेला नृत्य, नाटच विशारद रविशर्मा. हा भरताचा शत्रू आहे. भरताचे नाटचशास्त्र तो एक क्षुद्र ग्रंथ मानतो. नाटचशास्त्रावर ग्रंथ रचण्याचा तो अनेक वर्षे यत्न करीत आहे. स्वतः तो उत्तम अभिनय करतो. पाच पांडव आणि द्रौपदी यांच्यातला, अज्ञातवासात असताना घडलेला काल्पनिक संवाद आधुनिक करून, तो एकटा धर्मादि पांडव व द्रौपदी आपणच होऊन म्हणून दाखवतो. तो ऐकताना हसता हसता पोट दुखते.'

नाटच विशारद रविशर्म्याला दासीच्या स्वाधीन करीपर्यंत तिसरा सभासद आला. सोमल म्हणाला,

'व्याख्यासम्राट इंद्रजित येत आहे. हा नेहमी 'कामा'ची नवी नवी व्याख्या करीत असतो. आज दहा वर्षे तो नेमकी–सर्वार्थवाहक अशी व्याख्या शोधतोय. दरवेळी नवी व्याख्या तो करतो आणि त्याचीच त्याला शंका येऊ लागते. कुणीतरी योग्य व्याख्या करून त्याचे समाधान केले, तर आमच्या गोष्ठीसमवायावर महद उपकार होतील.'

वात्स्यायन झटदिशी म्हणाला,

'आमच्या गुरूनं केलेली व्याख्या सांगतो हवी तर?'

सोमल आश्चर्यानं म्हणाला,

'आपण कामशास्त्र जाणता? आपण बाभ्रव्यीय आहात?'

तेवढ्यात व्याख्यासम्राट इंद्रजित दाराशी आला व त्याला घेऊन सोमल आत गेला. वात्स्यायनाला वाटले आपण कामशास्त्रासंबंधी काही बोलायला नको होते. आपण बाभ्रव्यीय नाही. कुणी नाही. आपण बाभ्रव्याचा ग्रंथ बरोबर आणला ते चुकले. आणि त्या आधी गुरूने ग्रंथ दिला, तो घेतला हे चुकले. कामसूत्रे लिहिण्याचे मनांत गंमत म्हणून आणले तेही चुकले. वासंतिका आणि अंगरिक्ष यांना घरी न्यावयाचे हे मुख्य. दोन जीवांच्या आयुष्यापुढे ग्रंथाचे काय? शोधून घरी गेलो की पूर्ववत सुखवस्तु नागरिकासारखे आयुष्य घालवावयाचे. एखादी मोठी वाटिका तयार करावयाची. फार तर गोष्ठी–समवाय भरवून नाना विषयावर चर्चा करावयाच्या

आणखी एक सभासद आला आणि सोमल त्याला आंत घेऊन गेला. वात्स्यायन आपल्याच विचारांत होता. तो स्वतःशी म्हणत होता–आणखी काही आपल्याला करावयाचे नाही. यापुढे पत्नीला सुख कसे देता येईल हे पहावयाचे. आपल्या चुकीमुळे हा विरह घडलाय. अशा कष्टी भार्येला कसे सुखी करावयाचे याबद्दल कुणी काही वेगळे सांगितले तर फार तर ऐकून घेऊ.

सोमलानं मागून त्याला हळूच डिवचून म्हटले, 'समोर पहा! हा खरा बाभ्रव्यीय आहे. बाभ्रव्याचा एवढा प्रचंड कामशास्त्राचा ग्रंथ त्याला पाठ आहे. त्यांतले काही तरी लहान भेद तो काढीत असतो. बाभ्रव्यांत भर घालायची त्याची महत्त्वाकांक्षा आहे. त्याच्या मागे जे दोघे येत आहेत त्यांनी लग्ने केलेली नाहीत. मैत्रीआड लग्न येईल असे त्यांना वाटते.'

आलेल्या तिघांना स्वागताचे उपचार करून आंत नेऊन बसवून बाहेर आल्यावर सोमल म्हणाला,

'आज गोष्टी रंगणार. पहा, कोण येतायतो!'

वाटिकेतून एक गोरापान, रेखीव, सुंदर बांध्याचा तरुण येत होता. केस काळेभोर होते. भुवया आखलेल्या होता. डोळे मादक होते. त्याची चालण्याची ऐट सिंहासारखी होती. सोमल म्हणाला,

'हा चंद्रराग येतोय. याला नवीनवी संभोगासने शोधायचे वेड आहे. त्यांनी काढलेली काही संभोगासने खरोखर स्त्रीपुरुषांना आनंददायक होतील अशी आहेत. पूर्वाचार्यांवर त्याने ताण केली आहे असेच म्हणावे लागेल. माझ्या लठ्ठपणामुळे ती करता येत नसल्याने मी आनंदाला मुकलो आहे. तरी माझ्यासाठी डोके चालविण्याचे वचन त्याने दिले आहे.'

सोमल ज्या उत्साहानं आणि प्रेमानं सर्व मित्रांबद्दल बोलत होता. त्यावरून समवायमधील सभासदांबद्दल त्याला असलेले प्रेम आणि आदर कळत होता. सोमल सर्वांत वयोवृद्ध होता. पण सर्वांशी त्याचे समवयस्कासारखे वागणे, त्याचे अगत्य, उपचार आणि त्याने निर्माण केलेले सुंदर वातावरण पाहून वात्स्यायनाला त्याच्याबद्दल धन्यता वाटली. वासंतिकेच्या घरची बाग पाहून आल्यावर त्याचे ऊर भरून आले होते. नागरिकाचे हा गृहस्थ उत्कृष्ट उदाहरण आहे. कोणत्याही नगरीला असा एक नागरिक लाभला तरी ती धन्य होय.

सर्व सभासद आल्यावर सोमल आपल्या प्रशस्त चौरंगावर प्रस्थापित झाला. वात्स्यायनास त्याने आपल्या उजव्या हाताच्या चौरंगावर

बसविले होते. आणि सर्वांचे डोळे आपल्याकडे लागलेले पाहून वात्स्यायन संकोचत होता. सोमलाच्या डोळ्यांत दिसणारा उत्साही आदर पाहून आपण अति उत्साहाने कामाच्या व्याख्येबद्दल बोललो याचा वात्स्यायनाला पश्चात्ताप होऊ लागला. हौशी नागरिक गोष्ठी समवाय भरवतो. समवायची रंगत वाढवण्यास, त्यांत नावीन्य आणण्यासाठी त्याला कांही तरी नवी वस्तू हवी असते. ती मिळताच त्याचा आनंद परमावधीला जातो. आज आपण ती वस्तू झालो आहोत. आपण अति उत्साहाने बोलतो व असे काही तरी होऊन बसते. आपण अशाच उत्साहाच्या भरांत अंगरिक्षाला सल्ला दिला आणि काय झाले ?

एकीकडे असे विचार मनात येत असता हा गोष्ठीसमवाय आपणास प्रिय होत चालला आहे हेही वात्स्यायनाच्या ध्यानात आले. सर्व सभासद आसनांवर स्थिरस्थावर झाले नाहीत तोच हात वर करून कर्मठ ब्रह्मदत्त ओरडला,

'न कामांश्चरेत। न कामांश्चरेत.'

ब्रह्मदत्त आला आहे तेव्हा असे काही तरी होणार हे ठाऊक असून सुद्धा सर्व क्षणभर स्तंभित झाले. रोजच्या सरळ होणाऱ्या चर्चेत खणाखणी होणार हे प्रत्येकाच्या मनात आले. सभा स्तब्ध पाहून सोमल म्हणाला,

'महाराज ! आपण कामाचे आचरण करीत नाही काय ?'

वात्स्यायनाला हा प्रश्न खटकला. समवायात वैयक्तिक प्रश्न विचारले जाऊ नयेत. ब्रह्मदत्त काय उत्तर देतो पाहू. ब्रह्मदत्त म्हणाला,

'ते सहजकृत्य आहे. पशूही ते करतात. त्याला शास्त्राची आवश्यकता नाही. धर्म, अर्थ हेच दोन पुरुषार्थ. कामाने त्यात विकृती मात्र येईल.'

कुणी तरी सभासद हसला. ब्रह्मदत्त सोमलाकडे आवेशानं बोट करीत म्हणाला,

'सोमल ! तुमच्या समवायात 'कामा'ला महत्त्व देऊन तुम्ही तरुणांना कामासक्त करीत आहात. त्यांची स्थिती भोजकुलातील दांडक्यासारखी होईल. भार्गव ऋषीच्या कन्येचे त्याने कामासक्तीनं अपहरण केले आणि त्या ऋषीच्या शापाने परिवारासह तो नष्ट झाला. त्याचे राष्ट्रही धुळीस मिळून तेथे अरण्य झाले. पाटलीपुत्राचे तुम्ही अरण्य करीत आहात.'

सोमलने ब्रह्मदत्ताला हाताने आवरीत म्हटले,

'ब्रह्मदत्ता ! शांत हो ! शांत हो ! पाटलीपुत्राची चिंता तुझ्याप्रमाणे आम्हालाही आहे. येथे बसलेली मंडळी तरुण असली तरी ज्ञानी आहेत. ही सारी त्या महान बाभ्रव्याची शिष्य आहेत आणि येथे अवंतीचे एक विद्वान पाहुणेही आहेत. तुझे म्हणणे त्यांनी ऐकले आहे. ह्यावर ते काय म्हणतात पाहू.'

मग वात्स्यायनाकडे वळून तो म्हणाला,

'आम्ही इथली मंडळी या विषयात काय बोलू ते जुने झाले आहे. आपण आपले ज्ञान ऐकवले तर, काहीतरी निराळे ऐकायला मिळाल्याचा आनंद होईल व ज्ञानातही भर पडेल.'

हा आदर्श यजमान आहे. वात्स्यायनाला वाटले. सभेला आनंद मिळावा ही त्याची इच्छा ठीकच आहे, पण आपल्याला किती संकोच वाटतोय हे त्याला कळत नाही. माझ्यामुळे इथे नवी चर्चा झाली तर त्याचा आनंद त्याला कितीतरी दिवस पुरेल. छे छे ! आपल्याला या माणसाबद्दल भलतेच प्रेम वाटू लागले आहे. आपण काहीतरी बोलले पाहिजे. चांगले बोलता आले तर उत्तमच. नागरिकांच्या सभेत चांगले बोलण्याने मान्यताही लाभते. गुरूंची कृपा असेल तर आपण चांगले बोलू.

मनातल्या मनात गुरूंचे ध्यान करून तो म्हणाला,

'ब्रह्मदत्त म्हणतात, 'कामाची चर्चा केल्याने कामासक्ती वाढेल ते सत्य नाही. स्वयंपाकाची चर्चा केल्याने आधाशीपणा वाढेल असे म्हणण्यासारखे आहे. माझ्या अल्पमतीप्रमाणे मी कामशास्त्र का हवे सांगतो. काम हा पुरुषार्थ स्त्रीपुरुषाने एकत्रित येण्याचा–म्हणजे संप्रयोगाधिन असल्याने त्या संप्रयोगाच्या उपायांचे ज्ञान आवश्यक आहे. या उपायांचे ज्ञान हेच कामशास्त्र. पशुपक्षादिक प्राण्यांमध्ये कोणताही प्रतिबंध नसल्याने, ऋतुकाली तृप्ती होईपर्यंत समागम घडत असल्यानं व विशिष्ट बुद्धिपूर्वक समागमाची प्रवृत्ती नसल्यानं संप्रयोगांच्या उपायाची आवश्यकता त्यांना नाही.'

वात्स्यायन आपल्या बोलण्याचा परिणाम पाहण्याकरिता थांबला. सोमलाने उत्साहानं टाळ्या वाजवीत म्हटले,

'साधु ! साधु ! वात्स्यायन ! कामाचे सेवन करू नये असे ब्रह्मदत्त म्हणतो त्याचे उत्तर काय ?'

क्षणभर वात्स्यायन स्तब्ध राहिला. समर्पक उदाहरण मिळाले तर, श्रोत्यांना आपले म्हणणे पटविणे सोपे जाते. तसे उदाहरण तो शोधीत होता. गृह्यसूत्रे, चाणक्याचे अर्थशास्त्र यांतील उपमा भराभर आठवीत तो म्हणाला,

'शरीरस्थितीला कामसेवन हे अन्नासारखेच आवश्यक आहे.'

'साधु–साधु ! काय वचन–काय वचन !' सगळे ओरडले.

ब्रह्मदत्त त्या सर्वांवर आवाज चढवून म्हणाला,

'अमान्य ! धर्म आणि अर्थ एवढे शरीरस्थितीला पुरेसे आहेत.'

वात्स्यायन म्हणाला,

'धर्म आणि अर्थ यांचे काम हे फल आहे. ते फल नाकारणे म्हणजे धर्म–अर्थ या पुरुषांचे फल नाकारणे होय. म्हणजेच धर्म–अर्थ दोन्ही पुरुषार्थ नाकारणे आहे. म्हणून अन्नसेवनानं अजिर्णादि दोष जरी उत्पन्न होतात, तरी त्यांचा प्रतिकार करून जसे आपण अन्नाचे सेवन करतो तसेच दोषांचे निर्मूलन करून कामसेवन करावे.'

एकदम गृह्यसूत्रातल्या दोन समर्पक उपमा त्याला आठवल्या. तो म्हणाला,

'भिक्षेकरी आहेत म्हणून कुणी थाली चुलीवर चढविण्याचे थांबवत नाहीत किंवा जनावरे खातात म्हणून कुणी धान्य पेरण्याचे थांबवत नाही.'

सोमलच नव्हे तर ब्रह्मदत्त सोडून बाकीचे सभासद 'साधु साधु' ओरडून टाळ्या वाजवू लागले. तेव्हा जरा थांबून त्याच आवेशात वात्स्यायन पुढे म्हणाला,

'धर्म, अर्थ, काम, तीहींचे योग्य आचरण करणारा मनुष्यच इहपरलोकी दीर्घकाळ निर्भेळ सुख अनुभवतो.'

एवढे बोलून वात्स्यायन स्तब्ध राहिला. शेवटच्या वाक्याचे त्याचे त्यालाच नवल वाटले. ते वाक्य ब्रह्मदत्ताच्या भाषेत ब्रह्मदत्तासाठी

आपण बोललो. इहलोक आपल्याला मान्य आहे. पण परलोकाबद्दल आपण लोकायतिकांसारखे साशंक आहोत. धर्म, अर्थ, काम आपण मानतो पण चाणक्याच्या अर्थशास्त्राप्रमाणेच मोक्ष पुरुषार्थ आपण मानीत नाही. सोमलाला हे मत आवडेल की नाही कुणास ठाऊक ? पण इहपरलोकाचे वाक्य महेश्वरदत्तानं ऐकलं असते तर, तो पोट धरून हसला असता. परलोकींच्या सुखाचे आपण कोण सांगणार आणि त्याच्या दीर्घत्वाबद्दलचे अनुमान तरी कोण करणार ? पण धर्मदत्ताला द्यायला हवे तसे ते उत्तर आहे. तो बोलत नाही. त्याचं चेहरा क्रोधानं लाल झालाय.

वात्स्यायनाचे मनात हे येत असता ब्रह्मदत्त आसनावरून ताडकन् उभा राहत ओरडला,

'न कामांश्चरेत ! सोमला ! मी तुझा आणि तुझ्या विकृत समवायाचा धिक्कार करतो.'

एवढे ओरडून तुच्छतेने सर्वांकडे दृष्टी फेकून तो पाय आपटीत बाहेर निघून गेला.

सोमलाने दीर्घ श्वास सोडला. तो म्हणाला,

'वात्स्यायन ! तुमची धन्य आहे. तुम्ही त्याला गप्प केलेत. आता ही पीडा पुन्हा इथे येणार नाही. हट्टी, दुर्मुख, कर्मठ असा याचा पंथ आहे. आणि पाटलीपुत्राला तो वेढतो आहे. कामशास्त्राच्याच नव्हे तर कोणत्याही शास्त्राच्या मोकळ्या विचारांना, बांधून ठेवलेला अवयव हळूहळू सुकत जावा, तसा हा पंथ सुकविणार आहे. हळूहळू नागरिकांना या कर्मठांच्या म्हणण्यात तथ्य वाटू लागेल. नागरिक कामाचरण करीतच राहतील पण त्याबद्दल बोलणे अशिष्ट मानू लागतील. हळूहळू आमच्यासारखे गोष्ठी समवाय रोडावतील. कामविषयक अज्ञानाने नागरिकांत अनेक दुःखे पसरतील. त्यावेळी मी नसेन. आणि कामाची चर्चा होत नसलेल्या अंध पाटलीपुत्रात मी पुनर्जन्म घेणार नाही. तेव्हा आज मिळणारा गोष्ठी समवायामधील आनंद कमी करायला मी सिद्ध नाही. तेव्हा बोला सारंगपाणी ! तुम्ही काहीतरी नवे तत्त्व सांगणार होता. ऐकूया ते.' ◻

## स्त्री-पुरुषाचे सुख

वात्स्यायनाने सारंगपाणीकडे पाहिले. इतका वेळ झालेल्या बोलण्यात तोच एकटा बोलला नव्हता. सोमल म्हणाला त्याप्रमाणे बाभ्रव्याच्या ग्रंथातले कुठलेतरी सूत्र घेऊन मनातल्या मनात त्याचा कीस काढीत असावा. त्याचे वय चाळीशीतले होते. देह किडकिडीत, उंची मध्यम. एक पाय चौरंगावर दुमडून दुसरा खाली सोडून बसल्याने त्याचे किडकिडीत पाय आणखीनच बारीक वाटत होते. त्याच्या मुखावर दीन भाव होता. मधूनच तो डोळे मिटीत होता. मधूनच वर पाहत होता. मधूनच बोटांची हालचाल करीत होता. जे सांगायचाय त्यासाठी तो धैर्य गोळा करीत असावा. सभेत बोलण्याची त्याला सवय नसावी. बोटांची आणखी चाळवाचाळव करून सारंगपाणी म्हणाला,

'आपण सर्व ज्ञाते आहात आणि बाभ्रव्याचे कामशास्त्र वाचलेले आहात. मीही कामशास्त्राचा किंचित अभ्यासक आहे. पूर्वाचार्यांचे अनेक ग्रंथ वाचूनही स्त्री व पुरुष यांचे संभोगसुख सारखे असते की, निराळे याचा उलगडा मला झालेला नाही.'

त्याची शंका ऐकून सर्व सभा स्तब्ध झाली. जो तो किती झटकन अंतर्मुख झालाय, वात्स्यायनाचे मनात आले. आपल्या विषयावर यांचे खरे प्रेम आहे. वात्स्यायनाने सारंगपाणीकडे पाहिले. त्याचे मुख निस्तेज झाले होते. सर्वांना एकदम स्तब्ध झालेले पाहून आपण अप्रस्तुत प्रश्न तर विचारला नाही, असे त्याच्या मुखावर दिसत होते. प्रश्नकर्ता गोंधळला की, स्पष्टीकरण देऊ लागतो तसेच त्याने केले. तो पुढे म्हणाला,

'माझ्या पत्नीला हा प्रश्न विचारला तर ती लाजते आणि माझ्या गणिकेला हा प्रश्न विचारला, तर ती अर्थानुकूल असल्याने मला प्रसन्न करण्यास उत्तर देते.'

सोमल म्हणाला,

'तीस वर्षे आमच्या विवाहास होऊनही हा प्रश्न माझ्या मनात आला नाही. हा प्रश्न मोठा गहन आहे. बाभ्रव्याने संभोगात स्त्री-पुरुषांचे सुख निरनिराळे असते असे म्हटले आहे. तेच मी सत्य धरून चाललो होतो. त्याहून काही निराळा विचार असेल, असे कधी मनात आले नाही.

एक सभासद म्हणाला,

'स्त्रीचे सुख पुरुषाप्रमाणे नसते असे एक मत मलाही वाचल्याचे स्मरते.'

सारंगपाणी म्हणाला,

'समागमाचे सुख स्त्रीला सांगता येत नाही. आणि पुरुषालाही कळत नाही असा माझा अनुभव आहे. सुख हा चित्ताचा भाव असल्यामुळे, तुला कसे सुख होते हे परस्परांना विचारूनही उपयोग नाही.'

गोरा, काळेभोर केसाचा, मादक डोळ्याचा चंद्रराग म्हणाला,

'स्त्रीचे सुख हे कंडूच्या उपशमनात असते. असा उपशम होताच तिचे डोळे मिटतात. ती विकलगात्र होते. मला कुठलीही स्त्री याला अपवाद आढळली नाही.'

वात्स्यायनाच्या मनात आले, 'स्वानुभवा'चे सांगून आपण अनेक स्त्रिया भोगल्याचे तो सुचवीत आहे. याचे रूप, थाट, बोलणे सर्वच कुणाही स्त्रीला मोह घालील असेच आहे यात संशय नाही. या विषयाच्या चर्चेत आता प्रत्येकजण स्वानुभवाचे सांगणार. चर्चेत हे ठीक नाही. चर्चा त्रयस्थपणे हवी.

सोमल म्हणाला,

'मग आलिंगन चुंबन इत्यादी अभिमानिक सुखाचे काय ? त्यानेही स्त्रीला सुख होते. किंबहुना त्यामुळेच स्त्रीची खरी सुखवृद्धी होते.'

सारंगपाणी म्हणाला,

'आद्यालिकाचे मत असे आहे की, पुरुष वीर्यपात झाल्यावर विराम पावतो, पण स्त्रीची गोष्ट मात्र तशी नसते. दोघांच्या रतिसुखात हा फरक आहे.'

सोमल म्हणाला,

'तुम्ही बाभ्रव्य विसरलात. बाभ्रव्य म्हणतो, संभोग व्यापाराला आरंभ झाल्यापासून स्त्री सारखा सुखाचा अनुभव घेते. पुरुषास मात्र शुक्र विसर्जनाचे वेळीच सुख मिळते.

सारंगपाणी म्हणाला,

'संभोगारंभापासून स्त्रीला सुख होते हे पटत नाही. कुलाल चक्राची गती आरंभी मंद असून पुढे वाढत जाऊन अखेर पुरी होते. स्त्रीच्या रतिसुखाचे तसेच आहे, तुम्हीच सांगा, दंतक्षते, नखक्षते, यांचे स्त्री शरीरावर केलेले प्रयोग, स्त्रीला प्रारंभी दुःखकारक होतात, पण जसा आवेग वाढत जातो तसा पुरुषाकडून होणारा कुठलाही प्रकार तिला सहज सह्य होतो. म्हणून स्त्रीच्या सुखाची तऱ्हा पुरुषासारखी नसून, प्रारंभी मंद व पुढे वृद्धी पावणारी असते असेच म्हणावे लागेल.'

चंद्रराग मध्ये म्हणाला,

'चिरवेगी अशा जास्त काल टिकणाऱ्या पुरुषावर स्त्रिया नेहमी अनुरक्त असतात ते त्यामुळे. पण शिघ्रवेगी पुरुषांवर, इच्छातृप्ती न झाल्याने त्या विरक्त होतात. माझा अनुभव म्हणतो की, संभोगक्रियेनंतरची अनुराग आणि विरक्ती यावरून स्त्रीचे सुख कळते. पुरुषाचे सुख तसे कळत नाही.'

वात्स्यायनाच्या लक्षात आले की, चुकलेला प्रवासी वाटोळा फिरू लागतो तसा हा विषय फिरू लागला आहे. जो तो पुन्हा स्वानुभवावर येत आहे आणि प्रत्येकाला आपला अनुभव वेगळा वाटत असल्याने वाद मात्र वाढत आहे. पण सोमल त्यावर उपाय काढील. शब्दांची गुंतागुंत तो होऊ देणार नाही. स्त्री-पुरुषांच्या सर्वसामान्य समागम सुखाबद्दलचा हा प्रश्न आहे. पहा ! सोमल बोलू लागला. ऐकू या.

सोमल म्हणत होता,

'सभासदहो ! निघालेल्या शंकांमुळे आणखी विचार येऊ लागले आहेत. जर स्त्रीला प्रारंभापासून सुख होत असेल तर चिरवेगी आणि शीघ्रवेगी अशा दोन्ही पुरुषांकडून तिचे सारखे समाधान झाले पाहिजे असे तुम्हास वाटत नाही का ? शिवाय अनुराग हा संदिग्ध आहे. आलिंगन चुंबनादीत कुशल असलेला पुरुषही केवळ त्यानेच स्त्रीच्या मनात अनुराग उत्पन्न करू शकतो. कंडूशमनामुळे अनुराग उत्पन्न होत असेल तर, कृत्रिम उपायांनी संभोगसुख घेणाऱ्या दोन स्त्रियांत हा अनुराग उत्पन्न झाला पाहिजे. तसा होतो का ?'

'तसा होतो ' चंद्रराग आवेशात म्हणाला, 'अशा दोन स्त्रियांना दूर करणे अशक्य होते.'

सारंगपाणी म्हणाला,

'पण अशा दोन स्त्रियांत जे काही होते तो अनुराग नव्हे हे निश्चित. समागमात स्वतःला पुरुष करून पुरुषायतिक करणारी स्त्री स्वतःला पुरुष समजली तरी, ती पुरुष होत नाही. जेव्हा पुरुष स्त्रीला पुरुषायतिक करायला सांगतो किंवा ती आपण होऊन पुरुषायतिक करते तेव्हा परस्परांचे सुख जाणण्याचा तो खेळ असतो आणि हा खेळ व्यर्थ ठरतो हे मी सांगायला नकोच.'

एवढे बोलून सारंगपाणीने श्वास सोडला. आपला प्रश्न सुटत नाही याचे त्याला खरे दुःख होत होते. सोमलही अस्वस्थ आहे. वात्स्यायनाच्या ध्यानात आले. समागमातले स्त्री-पुरुषांचे सुख वेगळे असते हे आपल्यालाही कधी पटले नाही. पण त्यावर इतका विचार आपण कधी केला नव्हता. हा प्रश्न इतका मूलगामी असेल असे कधी मनातही आले नव्हते. स्त्री-पुरुषांचे समागमातले सुख केवळ निराळे नसेल, तर विरोधीही असेल. तसे वाटूनच सुरतकर्माला लढाई म्हटले आहे. अशा अर्थाच्या पुष्कळ उपमा त्या क्रियेला दिल्या गेल्या आहेत. उपमा गोड असल्यानं फसव्याही असतात. त्या विचाराला थबकवून ठेवतात. काही असले तरी, केवळ आपल्या पत्नीशी घेतलेल्या अनुभवावरून याचा निर्णय होणार नाही.

तोच दत्तकाची कथा आठवून वात्स्यायन स्वतःशी हसला. हा प्रश्न दत्तकाला विचारायला हवा होता. कामशास्त्रातील वेश्यासंबंधी प्रकरण लिहिलेल्या दत्तकाला. शापामुळे तो एकदा स्त्री झाला. मग उःशाप मिळून पुन्हा पुरुष झाला असे म्हणतात. त्याने पुरुष व स्त्री दोन्ही अवस्थेतील समागमसुख भोगले. त्याच्या या दोन्ही अनुभवांमुळेच वेश्यांनी त्याला वेश्यांसाठी कामशास्त्रातील एक प्रकरण लिहिण्याची विनंती केली. पण त्याच्या त्या प्रकरणात स्त्री-पुरुषाच्या समागमसुखाच्या स्वरूपाबद्दल कुठेच उल्लेख नाही आणि तो केव्हाच मृत झाला असल्याने त्याला विचारणेही शक्य नाही. पण समागमातील स्त्री-पुरुष यांच्या सुखाच्या स्वरूपाचे कोडे पूर्वकालीही सर्वांना सतावीत असावे. एकच मनुष्य एकाच जन्मात स्त्री व पुरुष दोन्ही झाला तर, हे कोडे उलगडेल असे वाटून ही दंतकथा निघाली असावी. पण दंतकथा करूनही निष्पन्न काहीच झाले नाही. वात्स्यायनाला वाटले, संथपणे या कोड्याचा विचार करायला हवा. मागचे विचार बाजूला ठेवून. समागमकाळी मिळालेले सुख कितीतरी बिंदूंतून श्रवत गोळा झालेले असते. समागमाचे स्थळ, काळ, ऋतू, समागमपूर्व मनःस्थिती. संसारातील त्यावेळची सुखदुःखे, शरीरावस्था—परस्परांतील संवादादि लहानसहान व्यापार व हालचाली व स्पर्श. मग समागम. ही सुखे आणि समागमाचे सुख ही निराळी करता येणार नाहीत. कित्येकदा, या प्रवासात, पत्नीशी केलेले समागमपूर्व व्यवहार मनात येऊन आपला काम जागृत झाला आहे. पुन्हा इतरांप्रमाणेच आपण स्वतःच्या स्त्रीच्या अनुभवावर आलो. त्याचा उपयोग नाही.

इतक्यात पेये घेऊन सोमलाची दासी सभागृहात आली. वात्स्यायनाप्रमाणेच सर्वांच्या दृष्टी तिच्यावर खिळल्या. वात्स्यायनाला वाटले, जो विषय चर्चेला आहे त्याचेच प्रत्यक्ष रूप म्हणून ही दासी अवतीर्ण झाली आहे. दासी संकोचून किंचित कमर मोडून उभी होती. वात्स्यायनाला त्या क्षणी ती सर्व स्त्री-जातीची प्रतिमाच बनली आहे असे वाटले. ही आता दासी नाही. हिची रतावस्था कुणाला ठाऊक नाही. जणू अशी उभी राहून ती सर्वांना विचारते आहे— सुज्ञहो ! बोलो ! मी स्त्री आहे. माझे समागम सुख पुरुषांप्रमाणेच की वेगळे ?

वात्स्यायनाच्या मनात कल्पना आली की, या प्रश्नाचा हिच्याकडे निरपेक्ष, त्रयस्थ असे पाहून विचार करता येईल. हिची संभोगक्रिया आपण कल्पनेनं पाहू. समजा, एक तरुण दास हिला एकांतात मांडीवर घेऊन बसला आहे, तो तिच्या अंगोपांगांना नाना स्पर्श करतो आहे, मांडीवर बसण्याचे नि बसवून घेण्याचे नि स्पर्शाचे परस्पर सुख दोघांना होताना दिसत आहे, ती अंग मुरडीत आहे, चोरीत आहे, कधी स्पर्शातील अतीव सुखाने स्थिर होत डोळे मिटत आहेत, तो तिला आलिंगन देत आहे आणि ती हळूहळू धीट होऊन आलिंगनानी प्रत्युत्तरे देत आहे. दोघांना त्या क्रिया प्रमुदित करीत आहेत. हळूहळू तो तिला समागमाला उद्युक्त करीत आहे. त्यातही दोघांना सुख

दिसत आहे. ती दिसायला स्थिर व तो क्रियाशील आहे. पण दोघांच्या मुखावरील सुखात अभिन्नताच दिसत आहे. पण आपल्या सुखातील अभिन्नता त्या दोघांना दिसणार नाही. उलट समागमाच्या वेळी होणाऱ्या परस्परांच्या क्रिया भिन्न होत असल्याने, आपल्या दोघांना होणाऱ्या सुखात भिन्नता असावी, असे वाटून, ती दोघे परस्परांस–तुझे सुख काय आहे ? तुझे सुख काय आहे ? असे विचारीत राहतील. दोघांना एकमेकांना उत्तर देता येणार नाहीत.

हे विचार सुचताच वात्स्यायनाला आनंद झाला. आपल्याला येथे यावेळी हा विचार सुचावा हे भाग्यच. त्या आनंदात हात वर करून तो म्हणाला, 'मी सांगतो, समागमातले स्त्री-पुरुषांचे सुख एकच असते. एकसारख्याच सुखाचा अनुभव ते घेत असतात.'

दोन-तीन सभासद ओरडले,

'कसे ? कसे ?'

वात्स्यायन म्हणाला,

'ऐका ! स्त्री आणि पुरुष दोघे एकाच मनुष्यजातीची असल्याने आणि समागमप्रसंगी दोघे एकाच कार्याला प्रवृत्त होत असल्यामुळे त्या कार्यापासून उत्पन्न होणाऱ्या सुखरूपी फलात भेद करता येणार नाही.'

सारंगपाणी म्हणाला,

'उपायभेदाने आणि संभोगकालातील मनोवृत्तीतील भेदांनी दोघांच्या सुखरूप फलात भिन्नता होईल. उपायभेद होण्याचे कारण पुरुष हा कर्ता व स्त्री ही करवून घेणारी म्हणजे अधिकरण आहे.

वात्स्यायन म्हणाला,

'तुम्ही म्हणता तसा कर्ता व अधिकरणामधे भेद असणारच. कारण मी संभोग करणारा आहे या अभिमानाने पुरुष संभोग व्यापारात आसक्त होतो आणि स्त्री ही, मी उपभोगली जात आहे या भावनेने आसक्त होते. संभोगसुख अनुभवण्यास पुरुषाशी मी संगत होते असे स्त्रीला वाटते. तरीही दोघांचे सुख एकच असते.

सोमल म्हणाला,

'जर उपायभेद तुम्ही मान्य करता तर मग संभोगसुखातील भेद तुम्ही मान्य का करीत नाही ?'

वात्स्यायन म्हणाला,

'उपायांचे भेद स्त्री पुरुषांतील शारीरिक भेदांमुळे अटळ आणि सकारण आहेत. संभोग व्यापारात पुरुष हा कर्ता व स्त्री ही अधिष्ठान असल्याने कर्ता व करून घेणारी यात उपायभेद असणारच. पण उभयता मिळून एकाच हेतुसाठी केल्या जाणाऱ्या क्रियेत असा शारीरिक क्रियेतला भेद दिसला तरी, त्यामुळे निष्पन्न होणाऱ्या परिणामात भेद मानण्याचे काहीच कारण नाही. मी सांगितले त्याप्रमाणे स्त्री आणि पुरुष यांची मनुष्य ही एकच जात आहे आणि परस्परांच्या साहाय्याने एकच कार्य करायला ती प्रवृत्त झाली आहेत हे विसरता कामा नये.'

सारंगपाणी म्हणाला,

'भिन्न भिन्न दोन कारके एकत्र होऊन एकच कार्य निष्पन्न करतात. याविषयी तुमचे आमचे एकमत आहे. मात्र भिन्नार्थ साधण्यास दोघे संभोगप्रवृत्त झाली असली तर, त्यांच्या सुखरूप फलातही भिन्नता हवी हे स्पष्ट आहे.'

सारंगपाणीचा युक्तिवाद ऐकता ऐकता वात्स्यायनाला मनोमन वाटले की, आपले म्हणणे निश्चयपूर्वक बरोबर आहे. पण असे असूनही आपणास उत्तरपक्ष करता आला नाही तर हा वाद हरू. आपण वाद खेळलो आहोत. पण फार पूर्वी. गुरूच्या आश्रमात असताना. ती दासी येऊन उभी राहिली आणि तिचा प्रियकर व ती दोघांची रती आपण कल्पनेनं पाहिली आणि आपल्याला पटले की, स्त्री व पुरुष यांचे रतीसुख एकच असते. का पटले ? या वेळी एखादे योग्य असे उदाहरण सुचले तर बरे होईल. पण आपल्याला उदाहरणे थोडी सुचतात हे वाईट आहे.

एकदम त्याला आपल्या म्हणण्याला अनुकूल अशी टकरीची उपमा सुचली. तो म्हणाला,

'दोन मेंढ्यांच्या टकरीत किंवा दोन कवठे एकमेकांवर आपटल्यावर किंवा मल्लांच्या कुस्तीत एकाच वेळी अनेक सदृश्य अर्थांची सिद्धी झाल्याचे दिसून येते. त्याप्रमाणे येथे मानता येईल.'

सारंगपाणी आवेशाने म्हणाला,

'नाही. नाही. मेंढादि उदाहरणात कारक भेद नसल्याने एकसारखे फल प्राप्त होते.'

कारकभेद हा शब्दप्रयोग ऐकताच वात्स्यायनाच्या ध्यानात आले की आपण जिंकलो. हा वाद आपण जिंकलो. तो हसून म्हणाला,

'मग स्त्री आणि पुरुषांतही वस्तुतः कारक भेद नाही.'

सारंगपाणीने विचारले,

'ते कसे ?'

वात्स्यायनाचे मनात आले, उपमांनी घोटाळा होतो तसा जयही मिळतो. वेड्यांसारखे कारकभेदांतच आपण अडकलो होतो. या मेंढावगैरेंच्या उपमांनी आपणास वाचवले. तो म्हणाला,

'पुरुष कर्ता आणि स्त्री अधिष्ठान आहे हा कारकभेद मानण्यातच चूक होते. हा कारकभेदच मुळांत असत्य आहे. संभोग व्यापारात स्त्री आणि पुरुष दोघांचे कर्तृत्व नसेल तर, संभोग व्यापारच होणार नाही. संभोग क्रियेकडे आपण एक तर पुरुष किंवा एक तर स्त्री या नात्याने पाहतो. आणि त्यामुळे आपणास कारक भेद वाटू लागतो. आपण पुरुष आहोत. आपणास संभोगात भाग घेतो का असे विचारले तर अर्थातच 'भाग घेतो' म्हणू. तसेच जर स्त्रीला विचारले की तू संभोगात भाग घेतेस का ?' तर तीही म्हणेल मी पुरुषाएवढाच संभोगात भाग घेते. त्याचा अर्थ पुरुष कर्ता व स्त्री अधिष्ठान ही कल्पनाच मुळात सदोष आहे. भासमान आहे. संभोग क्रियेत दोघेही सारखेच भागीदार असल्यानं संभोग व्यापारापासून स्त्री आणि पुरुष दोघांना एकच सुख प्राप्त होते असे म्हटले पाहिजे.'

भोवताली, सभासद 'साधु साधु' करीत आनंदाने ओरडत असता वात्स्यायन थांबला. मनामध्ये तो त्या दासीला धन्यवाद देत होता. ती तेव्हा मद्य घेऊन आली नसती किंवा ती आल्यावर आपल्याला आपले पुरुषत्व विसरून, तिच्या व तिच्या प्रियकरांच्या काल्पनिक संभोग व्यापाराकडे लक्ष केंद्रीत करण्याचे सुचले नसते, तर हा 'साधु–साधु' गजर आपल्यासाठी नसता.

◻

# कामशास्त्रावर आणखी चर्चा

या दिवशीचा गोष्ठीसमवाय तेवढचा दोन तीन वादांवरच थांबला नाही. दुसरे अनेक लहान–सहान विषय निघाले. पण वात्स्यायनाने कशातही भाग घेतला नाही. एका वादात जय मिळाला तेव्हां त्या आनंदातच तो दंग असावा. नंतरचे विषय तो केवळ ऐकत राहिला. फार तर मनात स्वतःचे निर्णय घेत राहिला. आलिंगनाची शेवटची चर्चा निघेपर्यंत त्याची ही अवस्था होती.

नंतरच्या एका लहान चर्चेत, चुंबने, नखक्षते, दंतक्षते यांच्या क्रमाबद्दल वाद निघाला. कुणीतरी, प्रहणन व सीत्कारही त्यांत घालावे असे सुचविले. वात्स्यायनाला वाटले–खरे पाहता प्रहणन व सीत्कार हे संभोगकालीच संभवतात. मग त्याला वाटले आपण चूक करीत आहोत. स्त्रीपुरुष संयोगात कोणत्यावेळी कोणते संभवते हे कोण सांगणार ? एका सभासदाने सुचवले हे चुंबनादि पाच प्रकार स्त्रीपुरुषांनी एकदम करू नयेत. मग त्यांपैकी कोणकोणते कसे कसे करावे याची चर्चा सुरू झाली. कुणी चुंबन, नखक्षते, दंतक्षते, प्रहणन आणि सीत्कार यांच्या सहा प्रकारे जोडचा केल्या. कुणी आठ प्रकारे केल्या, कुणी दहा प्रकारे केल्या. वात्स्यायन स्वतःशी म्हणाला, कितीही आणि कशाही जोडचा केल्या तरी बिघडले नाही. माणसांत अनेक स्वभाव असतात. कुठल्या तरी जोडचा कुठल्या तरी स्वभावात बसतील. आणि नाहीच बसल्या तर करणारा त्यावेळी त्याला सुचेल तशा करील. कामवृद्धिला त्या पोषक असाव्यात म्हणजे झाले.

चुंबनांच्या स्थानांबद्दल मात्र चर्चा झाली नाही. पूर्वसंमत आठ-स्थाने सर्वांनी मान्य केली. मात्र काही स्थानांबद्दल तिटकारा दाखविला गेला. हा तिटकारा वात्स्यायनाला शास्त्रशुद्ध वाटला नाही. शास्त्राने तिटकारा दाखवू नये तसाच लोभही दाखवू नये. फार फार तर योग्यायोग्य सांगावे आणि देशमानाप्रमाणे चुंबने घेण्याच्या आणखी जागा निघाल्या तर त्या मान्य कराव्यात. रूढी व आचार यामुळे त्या त्या देशांत त्या त्या चुंबनांनी स्त्रीची कामेच्छा प्रबल होत असली, तर त्या त्या देशाला ती ती चुंबने उपयोगीच धरावी.

चंद्रागाने स्वतः काढलेली 'द्यूतक्रीडा' ही चुंबनाची नवी तऱ्हा सांगितली. वात्स्यायनाला ती अभिनव वाटली. या द्यूतक्रीडा चुंबन-प्रसंगी चुंबन घेता घेता आपल्या ओठाच्या पकडीत जो दुसऱ्याचे ओठ प्रथम धरील तो जिंकला असे होते. ही तऱ्हा ऐकता ऐकता सोमलाने टाकलेला निःश्वास त्याला मजेदार वाटला. निश्वास टाकून सोमल म्हणाला, 'माझ्यासारख्या मंद पुरुषास या चुंबनाचा उपयोग नाही. आमची यात नेहमीच हार होणार.' त्याचा हताश सूर ऐकून सारे हसू लागले.

नंतर दंतक्षताचे प्रकार चर्चेस, निघाले. वात्स्यायनाला एक गम्मत वाटली. सर्वसाधारपणे चर्चा मोकळेपणानं व स्वतंत्र विचारानं होत होत्या. पण इतरत्र मोकळेपणा दाखवणारा मधेच एखाद्या बाबतीत अट्टाहासी होत होता, कामशास्त्र लिहिणाऱ्या पूर्वाचार्यांनी दंतक्षताचे आठ प्रकार केले होते तसेच नखक्षतांचे आठ व विरूताचेही आठ केले होते. आणि कला चौसष्ट होत्या. कामशास्त्राला संख्येत अडकवणारा हा पूर्वाचार्यांचा हट्ट खरा गुदमरवणारा होता. इतरांचे तेच मत होते. पण इतर बाबतीत स्वतंत्रपणे विचार करणारा सारंगपाणी या आठ वगैरे आकड्यांच्या प्रेमांत गुंतून पडत होता. त्या बाबतीत तो जुनाटाहून जुनाट बोलत होता. कोणतीही कुणी नववी तऱ्हा काढली तर तो मान्य करायला तयार नव्हता. ती या आठांतच कशी बसते हे पटवून देत होता. त्यावेळी त्याच्या शब्दांत येणारा आवेश आणि तोंडावर येणारी लाली पाहून वात्स्यायनास कसेसेच होत होते.

या वादात आपण काही बोलायचे नाही. काय सांगावं आपणही कुठल्या तरी विषयात असे पुरातन हट्टी असू. आपण कधी काळी कामसूत्रे लिहिलीच तर, आपला हट्टाचा विषय उघड होईल. पण चुंबनाच्या वगैरे तऱ्हा करण्याबाबत आपले मत उदार आहे. आपण पत्नीचे नववा प्रकार काढून चुंबन घेतले तर त्यातून आम्हाला सुख होताय का एढंच पाहू आणि झाले तर नववा प्रकार मान्य करू.

पत्नीचे चुंबन ! ही दूरची गोष्ट आहे. अजून हातातले काम पुरे झाले नाही. त्याला सुरवातही नाही. हा शोध चालू असता पत्नीची आठवणसुद्धा शुद्धपणे काढता यावयाची नाहीं. मग इतर कल्पना सोडाच. मन चिंतेत नसेल तरच शुद्ध कामसेवन होते. शुद्धाशुद्ध कामसेवनाचा आणखी विचार केला पाहिजे. उदाहरणार्थ भोजनोत्तर काम शुद्ध नसतो. अतिश्रमानंतरचे कामसेवन शुद्ध नसते. संभोगकाली परपुरुष किंवा परस्त्री मनांत असता कामसेवन शुद्ध नसते. शुद्ध काम सेवनच खरे सुखदायी होते. जाऊं द्या. त्यापेक्षा समोर चाललाय त्यांत मन रमवू. सोमल चांगला आहे. बाकीची मंडळीही चांगली आहेत. कामशास्त्रावर त्यांचे प्रेम आहे. कामशास्त्रकारांवरही. बाभ्रव्याला ते मानतात. काही फारच मानतात. पण कुणी चिकित्साही करतो. अशी चिकित्सा राहिली तर कामशास्त्र जीवंत राहील. ग्रंथ खुंटीवर बसणार नाहीं.

आपण आज कामशास्त्रातले नवीन तत्त्व सुचवले. पण अर्थशास्त्र आपल्याला सर्वांत प्रिय आहे. हे त्यांना पटणार नाही. नंतर धर्मशास्त्रांत आपले मन रमते. अर्थशास्त्रावर लिहिले तर आपल्याला आनंद होईल. पण साधणार नाही ते. कौटिल्याचे अर्थशास्त्र वाचू लागताच आपण पार बुडून जातो. 'जोपर्यंत एखादा ग्रंथ झपाटचांत तुम्हाला वाहून नेत आहे तोपर्यंत स्वतःचा ग्रंथ लिहू नका.' गुरूने म्हटलेले त्याला आठवले. हताश होऊन त्याच्या मनांत आले. चाणक्याच्या अर्थशास्त्राने आपणास पुरतेपणी जखडून ठेवले आहे. आग्रही बाप असावा, किंवा कठोर राजाज्ञेखाली असावं, तशी तो आपली स्थिती करून टाकतो. आपण स्वतंत्र ग्रंथ लिहिणार नाही असे ज्योतिषी म्हणाला. पण आपण ग्रंथच लिहिणार नाहीं. ती विलक्षण ऊर्मी आपणास कधी येणार नाही. आपण जे इंथे सुचवले ते केवळ सारासार विचाराने. महेश्वरदत्त तर यांना चकित करील.

कामशास्त्र प्रचंड आहे. त्याचा एकेक भाग एकेक जन्माला अभ्यासाला पुरेल. म्हणूनच नंदीच्या कामशास्त्राचे भाग झाले. ते एकेका आचार्यांनी वेगवेगळे लिहिले. ते कुणी वाचीना तेव्हा सर्व भाग थोडक्यात एकत्र आणून बाभ्रव्याने एक ग्रंथ रचिला. तोही लोकांना फार मोठा वाटू लागला आहे. महेश्वरदत्त फक्त गणिकांसाठी लिहिलेला 'वेश्याधिकरण' भाग वाचतो. चंद्रराजाला परस्त्री प्रकरणच ठाऊक आहे. सोमल नागरिकवृत्त या अधिकरणातच रस

घेतो. तुकडे होऊन बाभ्रव्याचा ग्रंथ नाहीसा होत आहे. मग तो ग्रंथ लहान करून हा वात्स्यायन लिहील ? नाही.

गुरूने तशी आपल्याला आज्ञा केली आणि महेश्वरदत्त आपण तो लिहिणार असे धरूनच चालतो. पण या वात्स्यायनाला मुळीच आत्मविश्वास नाही, हे दोघांना ठाऊक नाही.

वात्स्यायनाच्या रिकाम्या झालेल्या फुलपात्रात मद्याची धार पडली. त्या आवाजानं तो विचारांतून बाहेर आला. त्याने वर पाहिले. दासी वाकून मद्य ओतीत होती. वाकल्यामुळे तिचे मुख जवळ आले होते. हिच्या मुखाचे सहज चुंबन घेता येईल. हिच्या स्तनांवरची नखक्षते हिचा कामोपभोगातला अनुभव सांगत आहेत. तिच्या प्रियकरांच्या नखांची ही चिन्हे असतील किंवा सोमलाच्या.

आपल्या मनात या वेळी हे यावे ! कामविचार मनात केव्हा घुसेल सांगता येत नाही. त्याला काळ वेळ नाही. आपल्या घरच्या दासीबद्दल आपल्या मनात असे कधी आले नाही. ही दासी आपल्याला सेवावृत्तीमुळे अनुकूल होईल. जशी प्रवासात गणिका भीतीमुळे आपल्या कुशीत आली.

काहीतरीच विचार डोक्यात येत आहेत. पत्नीपासून गेले चार महिने दूर आहोत त्याचा परिणाम. कामसेवन हे अन्नाइतकेच शरीराला आवश्यक आहे एवढा त्याचा अर्थ.

सभासदांत स्पर्शालिंगनांचा विषय निघाला होता. स्पृष्टक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या तऱ्हेच्या आलिंगनाची व्याख्या चर्चेला येताच अंगरिक्ष आणि वासंतिकेची पुन्हा आवेगानं आठवण आली. अविवाहित पण प्रेमात असलेल्या नायक-नायिकेनं परस्परांना दिलेले स्पर्श ! किती जुळते आहे ही व्याख्या अंगरिक्षानं वासंतिकेच्या काढलेल्या खोड्यांशी ! यज्ञोत्सवात वासंतिका पायावर पाणी घालीत असता अंगरिक्षाने तिचा अंगठा पायानं दाबला होता. आपला दाबलेला अंगठा तिनं 'स्' म्हणत काढून घेण्याचा यत्न केला. नंतर त्यानं तिच्या तोंडावर पाणी उडवलं. ते तिच्या कपाळावरून, गालावरून, ओठावरून, हनुवटीवरून थेंबानं ओघळत असता तिचे तोंड लाल पडले. मग आम्रवृक्षाखाली त्याने तिची बोटे दाबली. तिचे सारे शरीर कंपांनी थरारले आणि निःशक्त झाल्याप्रमाणे आपली बोटे तिला सोडवून घेता आली नाहीत. त्याच्या प्रत्येक स्पर्शाला ती त्याला अनुकूल होत होती. त्याच वेळी आपणास त्यांच्यात पुढे असे असे होणार ही कल्पना यायला हवी होती. खरे, पाणी उडवणे हेही स्पृष्टक धरले पाहिजे. तोही स्पर्शच. स्पर्शालिंगनांना दिलेली नावे किती अन्वर्थक आहेत ! स्पृष्टक, विद्धक नावावरून प्रकार कळतो. पण पुन्हा इथेही बाभ्रव्य पूर्वाचार्यांची चार आलिंगने देऊन थांबतो. आणि सारंगपाणीलाही ती चाराच्यावर असावी असं वाटत नाही.

चालू द्या चर्चा ! आलिंगनांबद्दल काही बोलावयाचे नाही. आलिंगन हे प्रेम असलेल्या स्त्री–पुरुषांतच संभवते इतकेच. हे सर्वांना मान्य व्हावे, या दोन्ही–स्पृष्टक आणि विद्धक आलिंगनांचा विशेष म्हणजे त्यात संभाषण घडत नाही. हा विशेष कुणी सांगितला नाही. समोरून येणाऱ्या आपल्या प्रेमाच्या स्त्रीला पुरुषाने जाणून स्पर्श करून तो सहज झाला असे दाखविणे किंवा देवळात बाजूला बसलेल्या प्रियकराला स्त्रीने निमित्त करून जवळ जाऊन स्तनाने धक्का देणे. ही आलिंगनेच, न बोलता केली जाणारी.

'यांना आलिंगनेच का म्हणावयाचे ?' सारंगपाणी विचारतो आहे. तो फारच शंका काढतो आहे. पण या बाबतीत कुणी त्याचे ऐकणार नाही. पाहणे हा स्पर्शाचा आरंभ आहे. स्पर्श हा आलिंगनाचा आरंभ आहे आणि आलिंगन हे संभोगाचा आरंभ आहे. तसे म्हटले तर–परस्परांना अनुकूल असलेल्या स्त्री–पुरुषामधील प्रत्येक क्रिया संभोगमय आहे. हा विचार फारच झाला. विश्वोत्पत्तीस संभोग मानण्यासारखा. तसेही महाभाग आहेत. त्यांना सर्वत्र संभोगक्रिया दिसते. एका बाजूला हे महाभाग, दुसऱ्या बाजूला ब्रह्मदत्तासारखे 'न कामांश्चरेत' म्हणणारे. या दोहोंत सोमलासारखे हे मूठभर कामशास्त्री नामशेष होणार. हा इथं एक बाभ्रव्याचा ग्रंथ आहे. एक गुरूने दिलेला आपल्याजवळ आहे. हे जाडजूड ग्रंथ कोण वाचणार ? शास्त्राने जाणे कठीण असते. भावनेने सोपे असते.

वात्स्यायन हे विचार करीत असता सभासदांनी सारंगपाणीला खोडून स्पर्श हे आलिंगन ठरवले होते. मग पुढचा 'उद्धृष्टक' प्रकार वाचण्यास आरंभ झाला. वात्स्यायनाला वाटले, तो ऐकतानाच प्रत्येकाला त्याची अनुभूती येईल. उद्यानयात्रेहून येताना किंवा वसंतोत्सवाच्या गर्दीत कोण स्त्री–पुरुष बुद्ध्या घसटून चालला नसेल ? किंवा देवळात, यज्ञोत्सवाच्या मांडवात भिंतीच्या किंवा खांबाच्या आधाराने कोणा स्त्री–पुरुषानं आलिंगनसुख घेतले नसेल ? त्यावेळी कुणी बघत नाही असे वाटते. पण तेव्हा अंगरिक्षाच्या खोड्या आपणास कळल्याच की नाही ? आणि विवाहानंतरच्या पहिल्या वर्षांत आपण पत्नीच्या याहूनही खोड्या काढल्या आहेत. पण 'विवाहानंतर' म्हणून तो एक निराळा प्रकार होईल.

उज्जयनीतील उत्सव, देवळातली आणि यज्ञोत्सवातील गर्दी त्याच्या डोळ्यापुढे आली. नागरिक स्त्री–पुरुष पिढ्यान् पिढ्या अशा उत्सवांच्या गर्दीत एकमेकांच्या खोड्या काढीत आले असतील. उत्सव, देवळे ही प्रेमीजनांसाठी संकेतस्थळे धरली पाहिजेत. परलोकी पुण्यसंचय होत असेल तरी शास्त्रदृष्टया संकेत स्थळेच ही लोकायतिकांसारखी नास्तिक कल्पना झाली. महेश्वरदत्ता ! तुझा विजय असो !

वात्स्यायन स्वतःशी हसला. या विशाल अशा पाटलिपुत्रातील, एका घरातील चार भिंतींमधे कामशास्त्राचा विचार चालू आहे. याचवेळी बाहेर नागरिकांचे व्यवहार चालू आहेत. कुठे वसंतोत्सवाचा विचार चालू असेल, कुठे यज्ञोत्सवाला आरंभ असेल, कुठे विवाहसमारंभ होत असेल, कुणा नागरिकाचा आपल्या नगरीकडे अरण्यातून प्रवास चालू असेल, कुणी गणिका नाना कला शिकत असेल, कुणी व्यापारी वस्तू देऊन धन जमा करीत असेल. काम कुणाला सोडीत नाही. इथे शास्त्रीय चर्चेतही काम प्रभावी होत आहे. चर्चा करणाऱ्यांचे ध्वनी घोगरे झाले आहेत. वात्स्यायनाच्या ध्यानात आले. संभोगावेळच्या आसनांची चर्चा चालू होती. वात्स्यायन ऐकू लागला. लतावेष्टिक आलिंगन हे उंचीने कमी असलेल्या स्त्रीच्याचबाबतीत संभवते की कसे ? त्यातूनही कृश शरीराच्या. हे सर्व स्त्रियांना उपयुक्त मानू नये. हे आलिंगन घेताना नायिकेने लतेप्रमाणे नायकाच्या अंगावर चढून व त्याचे डोके वाकवून चुंबन घेण्याची क्रिया विशिष्ट शरीराकृतीतच संभवते.

मग शरीराकृतीप्रमाणे आणखी पोटभेद पाडावेत. ग्रंथात संभोगा-

लिंगने व तद्संबंधी दिलेल्या क्रिया या चित्रांतल्या स्त्री-पुरुषांच्या आकारबद्ध रेखाकृतींना धरून सांगितल्या असाव्यात. प्रत्यक्षात असे रेखीव स्त्री-पुरुष अत्यल्प. तेव्हा त्या मानू नयेत असे सारंगपाणीने सुचविले. तो मुद्दा डोक्याचा होता. बाभ्रव्यापेक्षा सुवर्णनाभ आचार्यांनी दिलेली चार संभोगासने त्याला अधिक मान्य दिसली. त्यासंबंधी आवेशानं बोलू लागला. तो म्हणाला,

'सुवर्णनाभांनी वर्णन केलेले जघनोपगूहन आलिंगन पाहा. या आलिंगनात जिचा केशपाश विसकटला आहे अशी नायिका, नायकाला नखक्षते, दंतक्षते करावीत, त्याचे चुंबन घ्यावे म्हणून जघनभागाने नायकाचा जघनभाग दाबून धरून त्याच्या अंगावर चढू पाहते. बाभ्रव्याच्या क्षीरजालक आलिंगनाहून मी हे श्रेष्ठ मानतो. क्षीरजालक हे केवळ अंध आलिंगन आहे. त्यात कुठल्याही एका स्पर्शाचा उपयोग करून घेतलेला नाही पीडेची पर्वा न करता दिलेले हे आलिंगन केवळ रानटी आहे.'

हा म्हणतो ते सत्य आहे—वात्स्यायनाला वाटले. कामांधतेमुळे होणारे हे आलिंगन नायक-नायिकांचे धडही मोडील किंवा मुरगळून टाकील. असे अनेकदा होते यात संशय नाही. पण हा प्रकार नाही हे म्हणणे अशास्त्र आहे. एखाद्या आलिंगनात क्रौर्य असेल, तर त्याची चिंता ज्याची त्याने घ्यावी. ती घेता येईल की नाही कुणास ठाऊक? कारण कामवासना उत्कट नाही तोपर्यंत काम हा शास्त्राचा विषय असतो. पण एकदा कामवासना उत्कट झाली की, शास्त्र कसले, तऱ्हा कसल्या नि क्रम कसला? ग्रंथ बाजूला पडतो.

शब्द जास्त घोगरे झाले आहेत का? स्तनालिंगनाची चर्चा सुरू झाली. पण बाभ्रव्याला हा प्रकार कसा सुचला नाही? शब्द आणखीनच घोगरे आणि विकृत येत आहेत. 'उरूपगूह आलिंगन हे मांसल स्त्री-पुरुषांना जास्त सुखावह होते' सोमल म्हणत आहे. नंतर त्याने दासीला मद्य वाढायला न बोलावता स्वतः वाढायला घेतले आहे. वात्स्यायनाला वाटले, उरूपगूह आलिंगनाहूनही जघनोपगूहन आलिंगन जास्त उत्तेजित करील.

वात्स्यायनाच्या लक्षात आलं की, आपण कामोत्तेजित होत आहोत. आपला ही स्वर घोगरा झाला आहे. आपले अंग जड होत आहे आणि श्वास उष्ण येत आहेत.

नाही, नाही! हे उपयोगाचे नाही. शास्त्र वाचताना विकार उत्पन्न होता कामा नयेत. तसे झाले तर, तो दोष शास्त्र वाचणाऱ्याचा. शास्त्र व्यापक असते. त्यात विविध व उत्तेजित करणारा भागही येतो. मात्र नंतर त्यातले योग्यायोग्यही शास्त्र सांगत असते, हे विसरता कामा नये.

आपल्या मनात कामवासना उत्पन्न झाली. याचा अर्थ या क्षणी आपण ग्रंथ सोडला आहे. याचा अर्थ अजून आपण कामसूत्रे लिहायच्या योग्यतेचे झालो नाही. पत्नी म्हणाली तेच खरे, 'आणखी थांबा. अवकाशाने लिहा.'

[क्रमशः]

## अण्णा दाते – एक स्वातंत्र्यसैनिक : पृष्ठ ८ वरून

पृष्ठ ८ वरून

वर टीका करीत, त्यांच्या समन्वयवादी वागण्याला शासनाची मिंधेगिरी ठरवीत. सत्तास्थानावरील व्यक्तीवर टीका न करण्याच्या वृत्तीला नावे ठेवीत. अण्णा सारे सांगत. म्हणत, 'भिंतीवर डोके न आपटता, शिरसलामत राखले तर, काही कार्य करता येते हे या मंडळींना उमजत नाही.' अण्णांचे म्हणणे एकाअर्थी खरेही असे. या त्यांच्या वृत्तीमुळेच हजारो गोरगरिबांचे कल्याण ते करू शकले होते.

अण्णांची राजकीय मते काहीही असोत. त्यांची सद्‌गृहस्थी माझ्या परिचयाची झाल्यामुळे, पेणेत चार-दोन तास मुक्काम असला तरी, त्यातला अर्धा एक तास मी अण्णांच्या सहवासात घालवीत असे. निघताना नेहमी म्हणे,

'अण्णा, तुम्ही एकदा महाडला माझ्या घरी या. चार दिवस मजेत राहा. खूप गप्पा मारू. या तुटक्या भेटीने समाधान होत नाही'.

ते म्हणत, 'अहो महाड का मला परके आहे. जरूर येईन मी, पण हे बेटे शरीर आता थकलंय ना? त्याला प्रवासाचा शीण झेपत नाही. म्हणून टंगळमंगळ करतो—पण एकदा जरूर येणाराय् मी तुमच्याकडे'.

पण अण्णा महाडला आले नाहीत. परवा २० मेला अचानक बातमी आली, पुण्याच्या डॉ. प्रयागांच्या रुग्णालयातून अण्णांनी परस्पर परंधामाची वाट धरली होती! अण्णा गेले! खरे वाटेना. चौकशी करता कळले की, सूनबाईंच्या वडिलांच्या आग्रहावरून ते पुण्याला त्यांच्याकडे गेले होते. चक्क एस. टी. ने. आपली पडशी पाठीवर टाकून तिथे गेल्यावर जुन्या मित्रांच्या भेटी-गाठी. भारत इतिहास संशोधक मंडळात डोकावणे, कागदपत्रे पाहणे, टिपणे करणे चालू होते. अगदी २० मे ला सकाळी 'घारापुरीची लेणी' या नव्या मुद्रणावस्थेतील पुस्तकाची प्रस्तावना हातावेगळी करून त्यांनी ती चिरंजीवांकडे पोचती करण्याकरता पोस्टाच्या पेटीच्या स्वाधीन केली होती! दुपारी घरी येताना रिक्षातच गलबलले. घाम फुटला. अण्णांना डॉ. प्रयागांकडे नेले गेले. उपचार झाले. अण्णा शुद्धीवर आले.

मला बराय् आता. चालतसुद्धा घरी जाईन असे डॉक्टरांना म्हणाले, पण दोन मिनिटांत त्यांनी मान टाकली! डॉक्टरी उपाय थिटे पडले होते!

पेणला टेलिफोन गेला. मोरेश्वर गाडी घेऊन धावला. रातोरात प्रेत पेणेत आणले गेले. अण्णा गेल्याची बातमी वाऱ्यासारखी आसमंतात पोचली. अंत्यदर्शनाला गर्दी केली होती ती दुबळी, कातकरी, धनगर, शेतकरी, कुणबी मंडळींनी. पेणेतला आपला आधार तुटला म्हणून धाय मोकलून रडत होती ती मंडळी.

२१ मेला दुपारी—नदीकाठच्या कैलासधामी मंत्रसिद्ध ज्वालांनी, जन्मभर गोरगरिबांची कणव करून थकलेला तो कृश देह आपल्या स्वाधीन करून घेतला. हजारो माणसे हळहळली. आपल्या दुःखात सारा कुलाबा जिल्हा सामील आहे हे पाहून मोरेश्वर पर्शरामांना धीर आला असेल. अभिमान वाटला असेल!

□

पुस्तके

# असे समारंभ.......

## सगळे गुण घेऊन फुलणारं साहित्य चिरंतन होत असतं....

लता भिसे

गेल्या काही वर्षांत साहित्यविषयक उपक्रम बरेच वाढले आहेत. नवी नियतकालिके, अनियतकालिके यांच्या संख्येत थोडी वाढ होत आहे. नव्या साहित्यिक व सामाजिक जाणीवा असणारे लेखक वाचायला मिळत आहेत. सरकारी पातळीवरूनही मराठी पुस्तकांना बक्षिसे दिली जात आहेत. मॅजेस्टिक प्रकाशन, वसंत व्याख्यानमालेप्रमाणे दरवर्षी उन्हाळ्यात साहित्यिक गप्पा मोठ्या प्रमाणात आयोजित करीत आहे. लेखकांच्या जाहीर मुलाखती होत आहेत. मॅजेस्टिकतर्फेही पुस्तकांना पारितोषिके दिली जात आहेत. एकंदरीत चर्चा, बक्षिसे, वाचक, लेखक, सुसंवाद वगैरे वगैरे बरेच काही घडत आहे.

तर...

विषय आहे कै. कॅ. गो. गं. लिमये पारितोषिक वितरण समारंभाचा. नुकताच हा समारंभ दि. २५ जुलै रोजी पार पडला. स्वागत...प्रास्ताविक...पारितोषिक वितरण, सत्कार वगैरे नेहमीचेच असले तरी, या कार्यक्रमाचे महत्त्व मोठे आहे.

गेली ३ वर्षे (म्हणजे हे आताचे वर्ष धरून) कै. कॅ. लिमये स्मारक समिती वर्षभरातील सर्वश्रेष्ठ लघुकथेला पारितोषिक देत असते. यावर्षी १९७२ या वर्षातील सर्वश्रेष्ठ लघुकथेला पारितोषिक देण्याचा समारंभ झाला. या वर्षीच्या मानकरी सौ. सुधा नरवणे, तर १९७०, ७१ सालासाठी अनुक्रमे श्री. विद्याधर पुंडलीक आणि श्री. चारुता सागर यांना हे पारितोषिक मिळाले होते.

मराठी कथेच्या प्रकारात आणि संख्येत भर पडत आहे. दरवर्षी विविध नियतकालिकांतून सुमारे ३००० ते ४००० कथा प्रसिद्ध होत असतात. या कथांचे संकलन करणे आणि दर्जा ठरवणे हे वाङमयाच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाचे आहे. १०।१५ वर्षांपूर्वी श्री. राम कोलारकर यांनी कथांच्या वाचनाला सुरुवात केली. या कथांचा अभ्यास करून सर्वोत्कृष्ट मराठी कथांचे संग्रह प्रसिद्ध झाले. कै. कॅ. गो. गं. लिमये हे मराठी लघुकथांचे जनक म्हणून मानले जातात. गेली तीन वर्षे लिमये पारितोषिक समिती सर्वोत्कृष्ट मराठी लघुकथेला रु. १००० चे पारितोषिक देते. आपल्याला आनंद देणाऱ्या लेखक-लेखिकांबद्दलची कृतज्ञतेची भावना या बक्षिसामागे आहे.

पारितोषिक समितीची गेल्या दोन वर्षांची प्रथा अशी की, प्रमुख पाहुणे म्हणून अमराठी साहित्यिक बोलवायचे. पहिल्या वर्षी श्री. धर्मवीर भारती, दुसऱ्या वर्षी श्री. कमलेश्वर आणि तिसऱ्या म्हणजे यावर्षी विख्यात गुजराती साहित्यिक सुरेश जोशी प्रमुख पाहुणे म्हणून होते.

या समारंभाचा उद्देश जरी पारितोषिक वितरण असला तरी, असे समारंभ–अन्य भाषिक साहित्यिक येण्याचे समारंभ–सतत होणे आवश्यक आहे. गुजराती मराठीला जवळ आहे. अन्य दाक्षिणात्य भाषांपेक्षाही मराठी माणूस गुजराती लवकर शिकू शकतो. शेजारच्या साहित्यिकाचं सतत येणं, चर्चा होणं, एकमेकांच्या भाषेत अनुवाद होणं ही साहित्यविषयक जाणीव वाढायला अत्यंत महत्त्वाची गोष्ट ठरते. सुप्रसिद्ध समीक्षक माधव आचवल यांची काही पुस्तके प्रथम गुजरातीत प्रसिद्ध झाली आहेत. तेव्हा विविध भाषिक साहित्यकारांनी एकत्र येणे आणि साहित्यविषयक चर्चा, अनुवाद रूपातून देवघेव हे कुठल्याही भाषेच्या साहित्याच्या विकासाला पोषक ठरणारे आहे. असे प्रयत्न श्री. कमलेश्वर यांच्या संपादनाखाली निघणाऱ्या 'सारिका' या हिंदी मासिकातून होत असतात. स्त्री, हंस, सत्यकथा यांमध्येही कथांची भाषांतरे प्रसिद्ध झाली आहेत.

आज एक नवा वाचकवर्ग असा निर्माण झाला, जो एखाद्या कथेत जेवढा रस घेईल तेवढी उत्सुकता पाटणकरांच्या सौंदर्यमीमांसेत दाखवेल, चित्र्यांच्या टीकात्मक लेखनात दाखवेल. समीक्षा पद्धती जर एकाच साहित्यापुरती मर्यादित राहिली तर ती खुरटेल. म्हणून विविध भाषांतून आलेले वाङमय हे वाचकांच्या नव्या जाणीवा वाढायला जेवढे उपयुक्त ठरते तेवढेच समीक्षा पद्धतीलाही पोषक ठरते.

प्रत्येक भाषेत–साहित्याच्या वेगवेगळ्या क्षेत्रात–कथेच्या, कादंबरीच्या, कवितेच्या क्षेत्रात नवे प्रवाह येतात आणि हे नवे प्रवाह इतर भाषिकांना तर कळत नाहीत. ते कळण्यासाठी नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, जसे बंगाली लोकांना माहीत व्हायला पाहिजेत, तसेच कमला दास, सुभाष मुखोपाध्याय, रावजी पटेल आम्हाला कळायला पाहिजेत. म्हणून साहित्याची देवघेव होण्याच्या दृष्टीने असे परभाषिक साहित्यिक प्रमुख पाहुणे म्हणून बोलावून साहित्यिक संबंध प्रस्थापित करायला असे कार्यक्रम उपयुक्त ठरतील.

आता थोडं समारंभाबद्दल. साहित्यविषयक कार्यक्रमात आबालवृद्ध पुणेकरांची नेहमीच गर्दी असते. समारंभाचे ठिकाण मध्यवस्तीत नसतानाही (पद्मजी हॉल, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, टिळक रोड) बरीच गर्दी होती.

पारितोषिक मिळवणाऱ्या सुधा नरवणे मूळच्या पुण्याच्या. प्रादेशिक बातम्या देणाऱ्या सुधा नरवणे त्या ह्याच. 'धरतो' १९७२ च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेल्या 'विरत गेलेलं धुकं' या कथेसाठी त्यांना हे पारितोषिक दिले गेले. तशी कथा अगदी सरळ. कसलंही गूढ नाही, अपेक्षाभंग नाही, धक्के नाहीत. एक तरुणी–अँन तिचं नाव–तिच्या आईचा मित्र तिचा नवरा. कथा घडलेलं स्थळ फ्रान्समधलं. आपली आई आणि नवरा यांच्यात 'काही' आहे का या शंकेनं व्याकुळलेली कथेची ती तरुण नायिका. सुधाताई कथा फुलवत नेतात. कुठेही कसलाही कृत्रिमपणा नाही. आतापर्यंत सत्यकथा, हंस, स्त्रीमधून त्यांचं लिखाण प्रसिद्ध झालेलं आहे. मरालिका आणि दोलाचल हे दोन संग्रह त्यांच्या नावावर जमा आहेत. संसार करून फावल्या वेळात, छंद म्हणून लिहिणाऱ्या सुधाताईंची कथा स्त्रीच्या अनुभवाभोवती फिरणारी आहे. सत्काराला उत्तर देताना

त्यांनी सत्यकथेचे ऋण सांगितले.

एकंदर कार्यक्रम अतिशय नीटनेटका झाला. प्रमुख पाहुणे गुजराती साहित्यिक श्री. सुरेश जोशी होते. गुजराती कथेचा, कादंबरीचा, काव्याचा आणि टीकेचा इतिहास यांच्या नावाशिवाय पूर्ण होऊ शकणार नाही इतकं यांचं मोठेपण. ते बोलले गुजरातीतून. कथाकाराची Commitment मानवाशी असते. कथेतून जेव्हा मानवाचे प्रश्न व्यक्त होतात तेव्हा ते साहित्य सर्वव्यापी व वैश्विक होतं असं त्यांनी सांगितले. कथेतून माणसाचा शोध सुरेश जोशींना अतिशय महत्त्वाचा वाटतो. साहित्यकाराने सतत नवा शोध घ्यायचा असतो. कमी शब्दांत बरेच काही लिहिणे कठीण असते. केवळ अनुकरण म्हणजे मरण होय. सगळे गुण घेऊन फुलणारं साहित्य चिरंतन होतं. नाही तर तो फक्त शैलीचा खेळ होतो असे त्यांनी आपल्या मोजक्या शब्दांत सांगितले.

पु. ल. देशपांडे असले की समारंभ नेहमीच रंगतो. कार्यक्रम रंगला. बक्षीसपात्र कथेच्या वाचनाचा उपक्रमही योग्य वाटला.

तर... असे बक्षीससमारंभ दरवर्षीच घडणार आहेत. पण फक्त पाहुणे साहित्यिक येणं आणि जाणं एवढंच न राहता त्यांचा घरोबा वाढला पाहिजे हीच अपेक्षा. □

## Our Films, Their Films

By Satyajit Ray
Orient Longman Limited
Pages 219, Rs. 60/-

सत्यजीत रे हे बावीस वर्षांपासून दिग्दर्शक आहेत. त्याच्या आधी तेवढीच वर्षे ते इतर दिग्दर्शकांचे सिनेमा बघत होते. यांत बहुतेक परदेशातील चित्रपटच ते जास्त पाहत. कलात्मक चित्रपटाच्या निर्मितीसाठी 'डायरेक्टर' हाच जबाबदार असतो. स्टोरी, स्टार्स वगैरेंना गौण महत्त्व असते.

तरुण असतानाच त्यांना चित्रपटाविषयी जबरदस्त ओढ होती. त्यावेळेला त्यांनी इंग्रजीतील मिळतील तेवढी चित्रपटाची नियतकालिके वाचून काढली व त्याच विषयावरील बऱ्याच पुस्तकांचे वाचन केले. दिग्दर्शक होण्याच्या आधी ते पुस्तकांच्या जॅकेट्स् डिझाईनचे काम करीत होते. ते ३ वर्षे शांतीनिकेतनला होते. तेथेच त्यांना भारतीय शास्त्रोक्त संगीताची गोडी लागली. पुढे त्यांनी लंडन येथे 'बायसिकल थीव्हज्' हा सिनेमा पाहिला. तो त्यांना इतका आवडला की, आपण 'पथेर पंचली' ह्याच धर्तीवर बनवू असा निर्धार त्यांनी केला. 'पथेर पंचली' हा त्यांनी रु. ८०००/- च्या बजेटमध्ये बनविला. दोन मुलं आपल्या गावाच्या बाहेर भटकत भटकत एका शेतात येतात. ते शेत पांढऱ्याशुभ्र 'काश' फुलांनी भरून गेलेले असते. त्या मुलांना आगगाडीचे प्रथमच दर्शन घडते. काही कारणांमुळे शूटिंग इथेच अर्धे राहिलेले असते. पुढच्या रविवारी परत त्याच लोकेशनवर शूटिंगसाठी मंडळी येतात. तेव्हा शेतातील सर्व 'काश' फुलांची झाडे गाई म्हशींनी खाऊन टाकली होती! म्हणजे आता 'सीन' पुरा कसा करायचा? दोन वर्षांनंतर पश्चिम बंगाल सरकारने श्री. सत्यजीत रेंना पुरेसे पैसे उपलब्ध करून दिले व त्याच ठिकाणी तोच सीन पुरा केला गेला. 'पथेर पंचली' पुरे करताना त्यांना Pleasure व Pain दोन्ही मिळाली. त्यांना पैशाची सारखी चणचण होती त्यामुळे मध्ये कित्येक महिने बसून राहवे लागत असे.

स्त्री-पुरुषांच्या शारीरिक भुकेचे चित्रण करताना ते तसल्या 'सीन्स'ना फुल ट्रीटमेंट का देत नाहीत याचे कारण ऐकून पुष्कळच amuse झालो. त्यांच्या 'देवी' नावाच्या चित्रपटात मच्छरदाणीच्या मागे Silhouette मध्ये स्त्री-पुरुष चुंबन घेताना दाखविले आहेत. त्यांचे म्हणणे असे की, त्यांनी जास्त close-up घेऊन जास्त लाईट दिला असता तर, lower class मधल्या प्रेक्षकांनी शिट्या वाजवून catcalls दिले असते. त्यामुळे बॅकग्राऊंडमधला रातकिड्याचा व कोल्ह्याच्या रडण्याचा आवाज इतर संवेदनाशील प्रेक्षकांना ऐकू आला नसता!

त्यांच्या मते Advice and Consent Judgment at Nurenberg यासारखे epics आपण भारतात कधीच बनवू शकणार नाही. त्यामुळे भारतीय दिग्दर्शकांनी भावनाविश्व टिपणारे चित्रपटच जास्त काढले पाहिजेत. त्याशिवाय सेन्सॉरशिपचा जाचही दिग्दर्शकामागे फार असतो. समजा एखादा सामान्य बँक क्लार्क कुमार्गाने अचानक श्रीमंत होतो. नंतर तो पांढरी टोपी घालून समाजात ताठ मानेने वावरतो. याचे जर चित्रपट काढले तर सेन्सॉर म्हणतील की, त्या पांढऱ्या टोपीला काळा रंग लावा!




Extras आणि चांगले नट मिळवायला किती कठीण जाते या विषयावर त्यांनी म्हटले आहे की, talented लोक जाहिरातीला उत्तरच देत नाहीत. कारण आपण निवडले जाणार नाही अशी धास्ती त्यांच्या मनात असते. मग त्यांना लग्नात, कॉकटेल पार्टीज्‌मध्ये व रेसमध्ये नवीन नवीन चेहरे हुडकून काढावे लागतात. कधी कधी तर ते पाश्चात्यांचे चेहरेसुद्धा बघत बसतात व यात कोणी talented actor सापडेल का त्याचा वेध घेत असतात.

परदेशात Extras व नवीन ॲक्टर्स शोधण्यासाठी talent scouts असतात, असे ते म्हणतात. त्यांच्याकडे व इतर agents कडे जाड फायली (dossiors) असतात व त्यातूनच सोयीस्कर नट नटी निवडता येतात.

श्री. रेंनी New ware Film वरती एक वाचनीय प्रकरण लिहीले आहे. त्यांच्या मते उत्कृष्ट नट हा ॲक्टींग संपल्यानंतरसुद्धा तेवढाच expressive व interesting असतो. 'भुवन शोम'मधील सुहासिनी मुळे, 'प्रतिद्वंदी'मधील धृतीमान चटर्जी आणि 'उसकी राटी'मधल्या दोन मुली हे सर्व त्यांच्या या उत्कृष्ट नटांच्या व्याख्येत मोडतात.

एका genius चे सहकार्य दुसऱ्याला मिळत नाही. श्री. सत्यजीत रे यांनी विलायत खान, रविशंकर व अलिअकबर यांच्याबरोबर थोडयाच वेळा काम केले. कारण या तीन कलाकारांना सत्यजीत रेंनी music composing मध्ये जास्त guide केलेले आवडत नसे. त्यानंतर श्री. रे स्वतःचे music स्वतःच compose करायला लागले.

बऱ्याच मासिकांचे संपादक व संस्थांचे चालक श्री. सत्यजीत रे यांना भाषण देण्याविषयी किंवा लेख लिहिण्याविषयी आग्रहाने विनंती करीत होते. त्या विनंत्यांना मान देऊन श्री. सत्यजीत यांनी वेळोवेळी भाषणे दिली व लेख लिहून दिले आणि हे पुस्तक म्हणजे त्या भाषणांचे व लेखांचे संकलन होय. ते स्वतःच म्हणतात की, त्यांना जर choice असता तर, या पुस्तकातले बरेचसे लेख लिहिले गेले नसते. आणि मग हे पुस्तकही प्रसिद्ध झाले नसते! माझ्या वाचनालयासाठी हे एवढया भारी किंमतीचे पुस्तक घेऊन अगदीच नाराज झालो. मला वाटले की, ज्या दिग्दर्शकाचे नाव जगभर मशहूर आहे, जो दिग्दर्शक इतका संवेदनाशील आहे, जो एक कलावंत आहे त्याचे पुस्तक निश्चितच वाचनीय असणार. पण माझा अंदाज सपशेल चुकला! हे 'जिनीयस' लोक बऱ्याच वेळा 'one track mind' वाले असतात. आता श्री. सत्यजीत रे यांचेच बघा. त्यांचे सिनेमा किती संयमी व कलात्मक असतात. पण ते कॅमेऱ्याने इतके obsess झाले आहेत की, भाषा वापरतानासुद्धा त्याच पद्धतीने वापरतात. म्हणजे संयमी, subtle अशी. कॅमेऱ्याने बऱ्याच गोष्टी न सांगता टिपता येतात. त्यांचे meetings with a Maharaja हे या पुस्तकातील प्रकरण व इतर बऱ्याच ठिकाणी हा संयम खटकेल. मला त्यांच्या कॅमेऱ्याच्या कलेविषयी काहीच टीका करायची नाही. त्यांच्या कलाकृती मला अत्यंत प्रिय आहेत. माझ्या आठवणीप्रमाणे मेरी सेटनने सत्यजीत रेंचे चरित्रही लिहीले आहे. बहुतेक त्यांच्या या पुस्तकापेक्षा तिचेच पुस्तक जास्त वाचनीय असेल. या पुस्तकात श्री. सत्यजीत रे कधी कधी निश्चितच चमकतात, पण कधी कधीच. जर ६० रु. मी त्यांचे चित्रपट पाहण्यात खर्च केले असते, तर ते निश्चितच वसूल झाले असते.

—जे. एन. पोंडा


**SOME NEW TITLES RECEIVED**

| | |
|---|---|
| 1. Helter Skelter : The True Story of the Manson Murders (Bestsellers–Non Fiction–Covering Sharon Tate's and other murders)–Vincent Bugliosi with Curt Gentry | Rs. 18·35 |
| 2. Life In The World Unseen–(The realm of the Spirit and life after death)–Anthony Borgia | Rs. 10·00 |
| 3. Nebula Award Stories 8–(Bestsellers–Science fiction Stories)–Edited by Issac Asimov | Rs. 12·00 |
| 4. Any Souvenirs ? Central Europe Rerisited–(Travelogue) George Mikes | Rs. 6·00 |
| 5. In Connection with Kishaw–(No. 1 Suspense Seller)–Peter Driscoll. | Rs 12·75 |
| 6. The Illiad–(Classic)–Homer–Translated by E. V. Rieu | Rs. 18·00 |

**मराठी**

| | |
|---|---|
| १. अखेर पडदा पडला! (विडंबन लेख) बाळ गाडगीळ | रु. १८·०० |
| २. मॅक्झिम गॉर्की (कादंबरी) सुमती देवस्थळे | रु. १०·०० |
| ३. शिशिरातले गुलाब (आत्मकथा) एम्. सी. छगला | रु. ३०·०० |
| ४. विख्यात क्रिकेटपटू विनू मनकड (चरित्र) अरविंद ताटके | रु. १०·०० |

दि फिनिक्स लायब्ररी
७२७ सदाशिव पेठ, पुणे ३०.

नव्या एकांकिकांमुळे प्रेक्षणीय ठरलेली

# आंतर–बँक एकांकिका स्पर्धा

शिरीष सहस्रबुद्धे

पुण्याच्या नाटयचित्रसृष्टीत गेला आठवडा शांततेचा गेला. अर्थातच तो भलत्याच भकास शांततेमध्ये गेला.

एखादं नवं नाटक तर सोडाच, पण दर शुक्रवारी नेमेचि प्रदर्शित होणाऱ्या हिंदी चित्रपटांपैकीही एखाद्यानंसुद्धा पुण्यात डोकवायची तसदी घेतली नाही. पुण्यासारख्या सांस्कृतिक शहरात एवढी सामसूम ही एरवी तशी न भूतो न भविष्यति अशा स्वरूपाचीच ठरली असती. पण या सध्याच्या शांततेमागची कारणं इतकी स्पष्ट आणि अपरिहार्य आहेत की निदान ती माहिती असणाऱ्यांना तरी या थंडपणाचे फार आश्चर्य वाटू नये.

नाटकाच्या आघाडीवर, बालगंधर्व रंगमंदिर बहिष्कार प्रकरणातले मानापमान आणि उभयपक्षी रुसवेफुगवे अजून संपलेले नाहीत, यामुळे दोन शत्रुसैन्यांच्या छावण्या परस्परांसमोर थंड पडून राहून 'जैसे थे' परिस्थिती निर्माण व्हावी तशी अवस्था झालेली आहे. भूतपूर्व स्थायी समितीचे अध्यक्ष श्री. हनुमान अमराळे यांचा बालगंधर्व भाडेवाढ हा वैयक्तिक दुराग्रह आहे आणि म्हणून जूनअखेर स्थायी समिती बदलल्यावर हा प्रश्न सुटेल, कोंडी फुटेल आणि हे थंड युद्ध मिटेल अशी भोळी आशा अनेकांना वाटत होती. मी स्वतःही याला फारसा अपवाद नव्हतो. तथापि नव्या स्थायी समितीचे अध्यक्ष श्री. देवीदास काटे यांनी आमराळ्यांची गादी चालवताना त्यांचा निरपवाद सर्वांगीण वसा आणि वारसा घेतलेला असल्याने की काय, नवी विटी घेऊनही जुनं राज्यच कायम राहिलेलं आहे. तात्पर्य एवढंच की, नटश्रेष्ठ बालगंधर्वांचं स्मारक असलेलं हे रंगमंदिर अजूनही नाटकांना बंद आहे. एक जुलैपासून महिनाभर तिथे के. लाल यांचे जादूचे प्रयोग झाले. तिसापेक्षा अधिक ही प्रयोगसंख्याच असल्याने महानगरपालिकेला आर्थिक झळ लागलेली नाही असं दिसतं. नाटयरसिकांना मात्र नवनव्या किंवा हव्याहव्याशा वाटणाऱ्या अनेक नाटकांची चणचण तीव्रतेनं जाणवली. भरत नाटयमंदिराचा 'डबलरोल' चालू असूनही जून अखेर संपलेल्या, नाटकांच्या ऐन हंगामात पुण्यात तीन/चारच नवी नाटके दाखल होऊ शकली, आणि तीही मुंबईतील शुभारंभाच्या प्रयोगानंतर प्रदीर्घ कालावधी लोटल्यावरच. 'हार जीत' हे 'नाटयप्रभा'चं नवं नाटक पुण्यात प्रथम येण्यापूर्वी मुंबईला त्याचे अठरावीस प्रयोग होऊनही गेले होते. तीच गोष्ट 'धाडिला राम तिने का वनी' संबंधी. याखेरीज, 'आधार', 'पिकली पाने,' 'फोन नं. ३३३३३,' 'आम्ही लटिके ना बोलू', 'झाला कृतार्थ पांडुरंग' अशी सुमारे अर्धा डझन नाटकं मुंबईला चालू आहेत आणि पुण्याच्या 'वेटिंग लिस्ट' वर अशी नाटकं मुंबईत दाखल होऊन बरेच आठवडे झाले आणि तरीही पुणेकरांना ती कधी पहायला मिळतील हे निश्चित नाही. याबरोबरच 'ती फुलराणी' सारख्या तुलनेनं आधीच्या पण लोकप्रिय नाटकाचा एकही प्रयोग माझ्या आठवणीप्रमाणे गेल्या तीन एक महिन्यात पुण्याला झालेला नाही. पी. डी. ए. चं 'कल्याणी' हा स्थानिक नाटयपातळीवरचा एकमेव लक्षणीय प्रयत्न एरवी निदान नाटयप्रेमी वर्तुळामध्ये नाटकाची हवा कायम ठेवणारा महाराष्ट्रीय कलोपासकाचा 'प्रयोग' उपक्रम; जून अखेर तिसऱ्या वर्षाची सांगता, 'मुकीचा मुका' या काहीशा मिळमिळीत पण रंगतदार वगाने केल्यानंतर दोन महिन्यांसाठी स्थगित ठेवण्यात आलेला आहे. 'प्रयोग'च्या स्वरूपात काही मूलभूत बदल करण्याचे घाटत असून सप्टेंबरच्या सुमारास त्याचे पुनरुज्जीवन होईल. तथापि त्याबद्दल पुढच्या एखाद्या अंकात. तूर्त तरी पुण्याच्या नाटयसृष्टीत अंधारापलिकडचं काही दिसत नाही.

चित्रपटसृष्टीतली शिथिलता हा मात्र स्थानिक कारणाचा परिणाम नव्हे. सेन्सॉरबोर्डाच्या नव्या कडक धोरणानुसार आणि परीक्षणविषयक नियमाच्या कठोर अंमलबजावणीमुळे सुमारे तीस चित्रपट अडकूनच पडलेले आहेत, अशी बातमी आहे. 'फकिरा', 'चरस', 'कोई जीता कोई हारा' 'गोल्ड मेडल', 'रंगीला रतन' वगैरे अनेक चित्रपटांना सेन्सॉरच्या कात्रीने दिलेल्या तडाख्यामुळे मुंबई–मद्रासच्याच चित्रसृष्टीत अक्षरशः स्मशानशांतता पसरली आहे आणि निर्माते–वितरकांची तर हवा तंग झालेली आहे. ज्या मुंबईत आठवड्याला तीन–तीन बडी पिक्चर्स सहज लागून जायची, तिथे आज महिन्याभरात 'मेहबुबा'सारखा एखादाच 'बिग शॉट' लागतो आणि 'बदनाम'सारख्या, एरवी ढुंकूनही पाहिलं नसतं अशा चित्रपटांवर मार्केटच्या उड्या पडतात. त्यामुळे एखाद्या आठवड्याच्या 'गॅप'चं पुणेकरांना फार दुःख होणार नाही. एवढं खरं की, या दोन्ही क्षेत्रांत, 'पुढं काय', या प्रश्नाचं उत्तर कुणालाही ठाऊक नाही.

गेली तीन वर्षे चालू असलेली आणि यंदाच्या पूर्ण निष्क्रीय शांततेमुळे विशेषत्वाने जाणवलेली आंतर बँक मराठी एकांकिका स्पर्धा ही एक लक्षणीय ताजी घटना. पुण्याच्या प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशनतर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या या स्पर्धेच्या चौथ्या वर्षी एकंदर पाच बँकांनी आपल्या सात एकांकिका सादर केल्या. भरत नाटयमंदिरात दि. २८, २९ व ३० जुलै रोजी पार पडलेल्या स्पर्धेला मुसळधार पावसातही प्रेक्षकांचा प्रतिसाद चांगला होता. भरपूर पारितोषिके व मानचिन्हे देणाऱ्या या स्पर्धेत परीक्षकांच्या भूमिका, श्री. विद्याधर पुंडलीक, श्री. वासुदेव पाळंदे आणि श्रीमती सुलोचना लिमये यांनी बजावल्या.

या स्पर्धेबद्दल अधिक काही लिहिण्यापूर्वी एक महत्त्वाचं वैशिष्टय नमूद केलं पाहिजे ते असं की, स्पर्धेतल्या बहुसंख्यांक– म्हणजे सातांपैकी चार– एकांकिका, या अगदी नव्या कोऱ्या होत्या, त्या त्या बँकांच्या कर्मचाऱ्यांनीच लिहिलेल्या होत्या. आंतरबँक स्पर्धांमुळे एकांकिका करण्याबरोबरच लिहिण्याचीही संधी आणि प्रेरणा बँक कर्मचाऱ्यांना मिळत असेल तर, ते या स्पर्धेचं फार मोठं श्रेय आणि

पी. डी. ए.चा बहुमान म्हटला पाहिजे. विशेषतः नव्या चांगल्या एकांकिकांच्या दुर्मिळतेच्या संदर्भात तर मी याचं अधिकच स्वागत करीन. पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेद्वारा 'एकांकिका' या form च्या वाढीच्या, लोकप्रियतेच्या संबंधात कलोपासकांनी महाविद्यालयीन पातळीवर जे साधलं तसंच काहीसं पी. डी. ए. बँक पातळीवर साधू शकली आहे असं म्हणायला हरकत नाही. या चार एकांकिका अशा : एकांकिकेचे नाव, लेखकाचे नाव व सादरकर्त्या बँकेचे नाव या क्रमाने, १ : सिग्नल श्रीनिवास भणगे– बँक ऑफ महाराष्ट्र, २ : पुनर्भेट– अजित सातभाई– बँक ऑफ इंडिया; ३ : संस्कार– बाळाजी देशपांडे– बँक ऑफ बरोडा; आणि ४ : इट्स् टू लेट ! श्रीनिवास भणगे– बँक ऑफ महाराष्ट्र. या चारांचा विचार एकत्रित आणि अग्रक्रमानं करायला हवा, कारण स्पर्धेतल्या उरलेल्या तीनही एकांकिका जुन्या होत्या, नावाजलेल्या लेखकांच्या होत्या आणि तरीही दर्जाच्या दृष्टीने सर्वसाधारणतः fresh एकांकिकांपेक्षा खालीच होत्या.

'सिग्नल' आणि 'इट्स् टू लेट्' या महाराष्ट्र बँकेने सादर केलेल्या दोनही एकांकिका बँकेचेच श्री. श्रीनिवास भणगे यांनी लिहिलेल्या होत्या. रहस्यमय, गूढ पार्श्वभूमी लाभलेली 'सिग्नल', लेखन आणि प्रयोग या दोन्ही अंगांनी इट्स् टू लेट् पेक्षा उजवी वाटली. एका अनामिक अस्तित्वाच्या भीतीनं धास्तावलेल्या एकांड्या सिग्नलमनची ही कहाणी. एका अनोळखी व्यक्तीनं त्याला भेटायला येणं या घटनेभोवती संशयाचं व भयाचं बेहतरीन जाळं लेखकानं ताकदीनं गुंफल्याचं जाणवतं. आपलं स्टेशन सोडल्यानंतरच्या घाटात दरड कोसळल्यामुळं गाडीला संभवणाऱ्या धोक्याची सिग्नलमनला आलेली अंधुक कल्पना आणि मग ड्रायव्हरला थांबवायच्या यशस्वी प्रयत्नात त्याचा बळी जाणं. या एकांकिकेतल्या खुबीच्या घटना (key–events) श्री. भणगे यांनी उत्सुकता भरपूर ताणून मगच, गाडीच्या गार्ड–ड्रायव्हरच्या संभाषणातून अस्फुट–अर्धस्फुट रीतीनं कळवून रहस्यमय वातावरणनिर्मिती करण्यात आणि ते टिकवून धरण्यात चांगलं यश मिळवलेलं आहे. श्री. भणगे हौशी नाट्यमंचाला नवीन नसले तरी, दरवर्षी ते नवनवी उंची गाठत असल्याचं दिसतं. दिग्दर्शक अविनाश देशमुख यांनी प्रयोगही ठाकठीक बेतला होता, अनोळखी गृहस्थाची गूढत्व परिपोषक भूमिकाही त्यांनी योग्य निभावली. अन्य दोन पात्रेही समाधानकारक. सिग्नलमनची मध्यवर्ती व्यक्तिरेखा श्री. किरण भोगले यांनी नेटकी उभी केली, मात्र ते कळत–नकळत करीत असलेले हिंदी 'हिरो'चे अनुकरण पटले नाही. प्रकाशयोजनेपैकी लाल–हिरवे सिग्नल आणि पार्श्वसंगीतातले रेल्वेचे येणे–जाणे उल्लेखनीय. 'इट्स् टू लेट' ही दुसरी एकांकिकाही श्री. भणगे यांचीच असली तरी लेखन व प्रयोग या दोन्ही दृष्टींनी सिग्नलपेक्षा कच्ची होती. एक तर, आभासमय प्रेमात प्रेयसीकडून नकार मिळाल्याबरोबर आत्महत्या करणारा प्रेमवीर हे काही प्रेक्षकांच्या मनाची पुरेशी पकड घेऊ शकणारं कथाबीज– नाट्यविषय नव्हे. उथळ प्रेमिक साहानुभूतीपेक्षा चेष्टेलाच अधिक पात्र ठरतात. दुसरं, या प्रेमिकाची निराशा एवढी तीव्र असेलच तर ती; आणि विषप्राशनानंतरची त्याची मरणाची तडफड या दोन्हींचं प्रभावी दर्शन घडविताना राजेन्द्र पोकळे दिग्दर्शक व अभिनेता या दोन्ही दृष्टींनी उणे पडले. मरणयातना convince करायचा जिवापाड प्रयत्न त्यांनी केला, पण तो झपाटून टाकणारा अनुभव– प्रदीर्घ असूनही– ठरू शकला नाही हेच खरे. स्टेजवरची नजरही त्यांनी सुधारायला हवी, भरकटू देऊ नये. मृदुला बेहेरे यांनी प्रेयसीची practical minded character चांगली उभी केली. विष घेतल्यानंतर तरुणाच्या डोळ्यांपुढे फिरणारे त्याच्या आयुष्याचे इतर पैलू– नाती– माणसं यांचे back–stage glances वेधक वाटले, फक्त ते अधिक वेगानं फ्लॅशगनच्या चकाकण्यासारखे, momentary glimpses सारखे नजरेसमोर फिरले असते तर, सविस्तर दर्शनापेक्षा ते अधिक हलवणारं झालं असतं असं वाटलं. साहाय्यक भूमिका ठीक होत्या.

'पुनर्भेट' ही बँक ऑफ बरोडाची एकांकिका श्री. अजित सातभाई यांनी लिहिली आणि दिग्दर्शित केली होती. लेखकाची प्रमुख भूमिकाही त्यांनी केली. लेखनातल्या उणीवांमुळे ही पुनर्भेट फारशी सुखद ठरू शकली नाही. लघुकथेला 'फिट्' असणाऱ्या कथाबीजाची केवळ ते नाट्यमय वाटल्यामुळे एकांकिका केली गेली असावी आणि तेच तिच्या अपयशाचं फार मोठं कारण असावंसं वाटलं. लेखक आणि त्याची कॉलेजमधली प्रेयसी–प्रारंभीच्या लेखनाची स्फूर्तिदायीयांची ही पुनर्भेट होऊन तिनं त्याच्या मनाचा कानाकोपराही असा झपाटावा हे पटवून घेणं कठीण आहे. पुन्हा तिचं हे झपाटणं लेखकाला physical, level वर अभिप्रेत आहे की Spiritual level वर, याचा नीटसा उलगडा होत नाही, यामुळे तिचं अस्तित्व physical

---

सेन्सॉरशिपच्या या नव्या धोरणाबाबत गेल्या काही दिवसात चित्रसृष्टीतून मोठ्या नामी प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहेत. आंतरराष्ट्रीय प्रतिमा असलेले भारतीय दिग्दर्शक सत्यजित राय यांनी या निर्बंधांमुळे बंगाली चित्रपटसृष्टीची काहीही हानी होण्यासारखी नसल्याचं मत व्यक्त केलं आणि हिंदी–बंगाली चित्रसृष्टीची अशी आडवळणानं तुलना करून एक झक्क झणझणीत टोला ठेवून दिला, तर दुसरे ख्यातनाम दिग्दर्शक हृषिकेश मुकर्जी यांनी 'माझ्या चित्रपटात सेक्स व व्हायोलन्स औषधालाही नसल्यानं मला त्यांचा काही अडथळा झाला नाही.' असं नमूद केलं, आणि 'माझे चित्रपट चालावेत म्हणून मीच इतरांना जाचक वाटणारे हे निर्बंध आणवले आहेत असं लोक म्हणतात' अशी पुस्तीही जोडली. अल्पावधीतच खलनायिका म्हणून प्रामुख्यानं प्रसिद्धीस आलेली अभिनेत्री बिंदू हिनं तर 'यामुळे बाह्य ग्लॅमर कमी होऊन खऱ्या अभिनयाचा कस लागेल आणि आमच्यावरची जबाबदारी वाढेल' असं स्वागत केलं आहे.

ग्लॅमर गर्ल्समध्ये आघाडीवर असणाऱ्या बिंदूची ही प्रतिक्रिया म्हणजे......कालाय तस्मै नमः असं तर नव्हे ?

worldly आणि spiritual या दोन पातळ्यांच्या किंवा अवस्थांच्या मध्येच कुठेतरी घुटमळत राहतं. त्यातून कंटाळा येईल इतका तोचतोचपणा एकांकिकेत आहे. लांबी पुरेशी वाढविण्यासाठीच मुद्दाम योजला असावा असा! या नायिकेनं नको तिथं लुडबुडणं—अडमडणं आणि अस्वस्थ लेखकाचा तोल सुटणं; अथवा तिनं, आपणहून—त्यानं हाकलल्यावर निघून जाणं आणि मग त्यानं तिच्यामागं धावणं ह्या निरर्थक—बेचव प्रकारची अनावश्यक पुनरावृत्ती टाळता आली असती. नायिकेची व्यक्तिरेखा त्यामुळे स्वत्वहीन आणि दिशाहीन झाली आहे. लेखनात रुळावरून घसरलेली ही एकांकिका अजित सातभाई आणि सुधीर मुंगी यांनी सादर करताना सावरली; अर्थात थोडीफारच. प्रतिभावंत पण आता संपलेल्या लेखकाचे बदलते मूडस्, त्याच्या व्यथा, 'Fits of depression, त्याचा chronic melancholia याचं दर्शन सातभाईंनी चांगलं घडवलं, पण लेखन—दिग्दर्शक—अभिनेता या तीनही नात्यांनी त्यांनी हा लेखक वाजवीपेक्षा अधिक दुबळा, हळवा, escapist रंगवला अशी माझी शंका आहे. प्रकाशक मित्राच्या रीॲक्शनरी रोलमध्ये मुंगी यांनी जीव ओतलेला जाणवत होता. अन्य पात्रे ठीक. नेपथ्य पटले नाही.

संस्कार ही बँक ऑफ बरोडाची बाळाजी देशपांडे लिखित एकांकिका, नवरा—बायको—छोटा मुलगा अशा त्रिकोणी संसारात नवऱ्याच्या वेडचा भावामुळे—वसंतामुळे—उठलेल्या वादळाची कथा सांगणारी आहे. श्री. देशपांडे यांनीच दिग्दर्शन आणि नवऱ्याची भूमिका पार पाडली. वेडचा वसंताचे monologues वगळता लेखक म्हणून ते यशस्वी झाल्याचे वाटले. हे monologues मात्र 'हे ह्या वेडयाचे मानसशास्त्रीय विश्लेषण' म्हणून समोर टाकावे इतके होतकरू लिहिले गेले आहेत. ते संवाद गाळून तोच सारा भाव मूकाभिनयातून सादर केला असता (आणि ते अशक्य नव्हते) तर कस लागून एकांकिकेची गुणवत्ता आणि रंगत दोन्ही वाढली असती. मात्र अस्सल घरगुती—संसारी कनिष्ठ मध्यमवर्गीय वातावरणनिर्मितीमध्ये देशपांडे यांनी लेखक—दिग्दर्शक—अभिनेता या तिहेरी नात्यांनी अजोड कामगिरी बजावली आहे. सौ. शुभा जोशी यांनी लक्ष्मीच्या भूमिकेत त्यांना उत्कृष्ट साथ दिली. उभयतांच्या अकृत्रिम अभिनयाबरोबरच विनायक दाते यांनी वेडयाच्या भूमिकेत दाखवलेल्या समजदारीची दाद दिली पाहिजे. 'सिग्नल' प्रमाणेच प्रेक्षकाला अखेरपर्यंत खुर्चीवर खिळवून ठेवणारी ही एकांकिका सिग्नलपेक्षाही अधिक खोलवर भिडणारी होती.

'मोनॅड', 'इन्व्हेस्टमेंट' आणि 'बंडू नाटक करतो' या तीन इतर एकांकिका नेहमीच्या वापरातल्याच होत्या. त्यातही 'बंडू नाटक करतो' ही गंगाधर गाडगिळांची युनायटेड वेस्टर्न बँकेनं उभी केलेली एकांकिका बऱ्यापैकी रंगली. इतर दोन्ही उथळ, पोरकट आणि म्हणून बोअर वाटल्या. 'बंडू नाटक करतो', ही प्रहसनात्मक एकांकिका नितीन पुराणिक (बंडू) आणि नूतन पुराणिक (मिस् गंगाणे) या उभयतांनी आपल्या सहज अभिनय—मोकळ्या हालचालीतून छान खुलवली. भारती पाटणकर यांनी स्नेहलची दुय्यम भूमिका बरी वठवली. तथापि एकांकिकेचा शेवट फारसा प्रभावी नाही. दिग्दर्शन श्री. पुराणिकांचं होतं.

'इन्व्हेस्टमेंट' (लेखक : वसंत सबनीस, दिग्दर्शक : श्री. पानसे) आणि 'मोनॅड' (दिलीप परदेशी, श्रीराम भिडे) या दोन्ही एकांकिका दि पूना को—ऑप. रुपी बँकेने सादर केल्या आणि दोन्ही चढत्या श्रेणीने बोगस ठरल्या. इन्व्हेस्टमेंटच्या लेखनातच फारसा जीव नव्हता. भरपूर पात्रांच्या अव्यवस्थित गोंधळाचं स्वरूप तिला लेखनातच आलं आहे आणि वैयक्तिक अभिनयावर प्रयोग तारून नेण्याइतका वावही कुणाला नव्हता, तशी कुणाची पात्रताही दिसली नाही. पात्रांची निवड त्यातल्या त्यात ठीक होती. विशेषत: बंडूदादा पहिलवानाच्या अचाट भूमिकेसाठी सुरेश काणे अगदी 'फिट्' होते. दिगंबराच्या प्रमुख भूमिकेतील अशोककुमार आधवडे यांच्या निवडीचा मात्र अपवाद ठरला. त्यांचं अनाकर्षक, निष्प्रभ व्यक्तिमत्त्व आणि अशुद्ध उच्चार खटकत होते.

'मोनॅड'चा प्रयोग मात्र सर्वार्थानं केविलवाणा ठरला. लेखनात कच्ची नसलेली ही एकांकिका सर्वस्वी गैर पात्रयोजनेपायी अपयश घेऊन गेली. तिघाही पात्रांच्या बोलण्या-वागण्यातून भूमिकेची आणि एकांकिकेची यत्किंचित समज न आल्याचं स्पष्ट जाणवत होतं. रंगनाथ कुलकर्णी, कोता, एकेरी आवाज, एकसुरी बोलणं आणि भावहीन चेहरा यांमुळे तरुणाच्या भूमिकेत अजिबात शोभले नाहीत. तीच गोष्ट वृद्धाच्या भूमिकेतल्या श्रीपाद दीक्षितांसंबंधी. बागेश्री जोशी या लेखकाला अभिप्रेत असणारी तरुणी वाटत आणि दिसतही नव्हत्या.

अभिनय किंवा बाकी सगळं एकवेळ सोडा हो, पण मोनॅडचा उच्चार 'मोन्याड' केलेलाही सहन करायचा? ☐

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

## ७।८।७६ ते १३।८।७६

**मेष : यशाची चढती कमान**

अंतरिक्षातील अनेक बलवान ग्रह सध्या तुमच्या राशीला सुखवू पाहत आहेत. त्यांना सामोरे जाऊन येणाऱ्या संधीचा भरपूर लाभ उठवा. अनेक क्षेत्रे तुमच्या कर्तबगारीने गजबजणार आहेत. नोकरीधंद्यात तुमची कर्तबगारी उठून दिसणार आहे. आर्थिक परिस्थितीत लक्षणीय सुधारणा होणार आहे. शनिवारी अनपेक्षित लाभाची एखादी घटना घडेल. रविवारी नोकरीत कार्यक्षमता दिसेल. सोमवार ते गुरुवार नोकरी व स्वतंत्र व्यवसाय यात प्रगतीच्या योजना कार्यान्वित होतील. अनेक लाभ दृष्टिपथात येतील. शुभ दिनांक ८–११.

**महिलांना :** मनाची अप्रसन्नता कमी होईल. धंद्यात लक्ष घालून काही नवे करावे असे वाटेल.

**विद्यार्थ्यांना :** काही मनासारखे घडेल. इच्छा-आकांक्षा पुऱ्या होऊ लागतील.

**वृषभ : महत्त्वाची समस्या सुटेल**

तृतीय सुखस्थानात बलवान ग्रहांची गर्दी झाली आहे. ती काही वेळा मानसिक अविचार प्रक्षोभ निर्माण करणार असली तरी, हा आठवडा एकूण सफलतेचा आहे. व्यवसायात महत्त्वपूर्ण असा बदल होऊ शकेल. योजनांची कार्यवाही होऊ शकेल. धंद्यातील तोटा भरून निघेल. नव्या उमेदीने कामाची सुरुवात होईल. आकांक्षांना प्रतिसाद मिळण्यास सुरुवात होईल. शनिवारी धंद्यासाठी भांडवलाचा प्रश्न सुटू शकेल. सोमवारी नोकरीत बढती, प्रमोशनचा योग येईल. पुढील दिवसांत काही महत्त्वाच्या घटना घडतील. शुभ दिनांक ९–१२.

**महिलांना :** सहकार्य मिळून लाभदायक घटना घडतील. व्यवसाय सुधारेल.

**विद्यार्थ्यांना :** विज्ञान व मेडिकलच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हा आठवडा प्रसन्नता आणणारा आहे.

**मिथुन : नव्या क्षेत्राची चाहूल**

गेल्या अनेक दिवसांच्या मानसिक अस्वस्थतेतून आता तुमची हळूहळू सुटका होत राहणार आहे. अनेक विवंचना कमी होत जातील. अडचणीतून प्रकाश दिसणारा मार्ग दिसणार आहे. तुमच्या मनात पश्चात्तापाची वृत्ती निर्माण होणार आहे व प्रगतीचे नवे पैलू दिसणार आहेत. आर्थिक बाजू दुबळी राहणार नाही. दुय्यम धंद्याची परिस्थिती सुधारेल. शनिवारी अपेक्षित माणसे भेटतील. रविवारी मन उत्साही राहील. सोमवारी नोकरीत मनासारखे घडेल. मंगळवारी व्यवसायात नव्या योजनांची चाहूल लागेल. बुधवारी पैशाची कामे पुरी होतील. गुरुवारी संसारात नावीन्य येईल, तर शुक्रवारी उच्चपदस्थ व्यक्तींची मदत मिळेल. शुभ दिनांक ११–१२.

**महिलांना :** वाङमयीन सहल घडेल. मानसन्मान होईल. आर्थिक परिस्थिती सुधारेल.

**विद्यार्थ्यांना :** मित्रांचे सहकार्य मिळेल. हुशारी प्रत्ययाला येईल.

**कर्क : मन मोकळे ठेवा**

मंगळ, रवी, दुसरे, शनी पहिला व गुरू अकरावा अशी ग्रहरचना आहे हा आठवडा अनुकूल आहे. मात्र मन मोकळे ठेवून येणाऱ्या संधीचा लाभ घेणे आवश्यक आहे. लेखनात मिळकत होईल. प्रतिष्ठा उंचावेल. लॉटरीच्या मार्गाने किंवा रेससारख्या माध्यमाने आर्थिक बाजू बळकट होईल. लेखकांना बक्षिसे मिळतील. पत्रकारांचा गौरव होईल. शनिवारी अपेक्षित गाठीभेटी होतील. रविवारी गुणगौरव होईल. सोमवारी नोकरीत लाभ. मंगळवारी आवडती वस्तू मिळेल. बुधवारी प्रतिभा जागी होईल. गुरुवारी मधुर स्वप्ने पडतील. शुक्रवारी लाभ होईल. शुभ दिनांक ८–१०.

**महिलांना :** नोकरीत वरिष्ठांच्या बाजूने उभे राहा. फायदा होईल. पैसा मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** लेखन, संशोधन यात लक्ष घाला. आठवडा अनुकूल आहे.

**सिंह : प्रतिष्ठा उंचावेल**

शनी–मंगळाच्या युतीमुळे तुमच्याभोवती अनिश्चितता व अप्रगतीचे धुके पसरले होते. काय होईल काय नाही हे समजणे कठीण झाले होते. पण मित्रहो, मला लिहायला आनंद वाटतो की, तुमच्याभोवती निर्माण झालेल्या अडचणी आता दूर होऊ लागणार आहेत. तुमची बौद्धिक उंची वाढणार आहे. सार्वजनिक जीवनात तुमची प्रतिष्ठा खूपच उंचावणार आहे. आर्थिक स्थिती समाधानकारक राहील. शनिवारी तुम्हाला मोठा मान मिळणार आहे. रविवार गमतीत जाईल. सोमवारी पाहुण्यासाठी खर्च होईल. मंगळवारी नोकरीत महत्त्व वाढेल. बुधवारी पैसा हाती येईल. गुरुवारी लेखनात प्रगती होईल. शुक्रवारी प्रवास होईल. शुभ दिनांक ८–१०.

**महिलांना :** शुभकारक दिवस सुरू झाले आहेत. त्याचा फायदा घ्या. आवडत्या वस्तू मिळतील.

**विद्यार्थ्यांना :** ऐतिहासिक सहलीचा योग येईल. पैसा हाती खेळेल.

**कन्या : नोकरीत अधिकारवाढ**

हा आठवडा तुम्हाला नेहमीसारखाच प्रगतीचा जाईल. नोकरीत जर विशेष काळजी घेऊन दक्ष राहिलात तर तुम्ही वरिष्ठांवर चांगलेच इम्प्रेशन मारू शकाल व तुमचा अधिकारदेखील वाढू शकेल. आर्थिक बाजू सुधारायला अजून काही काळ थांबायला हवे पण काळजी नको. दुय्यम व्यवसायाला गती द्या. तो तेजीत येईल. शनिवारी घरगुती व उद्योगी लोकांत तुमचा वेळ जाईल. रविवारी महत्त्व वाढेल. सोमवारी नोकरीत कामाचा ताण पडेल. मंगळवारी थोडे दमल्यासारखे वाटेल. बुधवारी आर्थिक बाजू सुधारेल. गुरुवारी घाईगर्दी वाढेल. शुक्रवारी अपेक्षित कामे होतील. शुभ दिनांक ९–१०

**महिलांना :** संसारात ताण पडला तरी, वातावरण अनुकूल व प्रसन्न राहील. परिस्थिती सुधारेल.

**विद्यार्थ्यांना :** अपेक्षित असेल तसे घडेल. बुद्धी चमकेल.

**तूळ : सावध राहणे आवश्यक**

तुम्हाला सध्या तसे प्रतिकूल ग्रहमान नाही. तरीपण हर्शल व राहू हे ग्रह तेवढेसे अनुकूल नसल्यामुळे काळजी घेणे आवश्यक आहे. अनपेक्षितपणे काहीही घडू शकेल. ते प्रत्येक वेळी वाईट असेल असे नाही. चांगलेही घडू शकेल. मानाचा योग येईल. परदेशी प्रवासाचे स्वप्न साकार होण्याचे चिन्ह दिसू लागेल. नोकरीत वरिष्ठांच्या अधिक जवळ जाल. शनिवारी तुमचे लेखन गाजेल. रविवारी रेस व लॉटरीच्या मार्गाची अनुकूलता दिसेल. सोमवारी व्यापार तेजीत येईल. मंगळवारी प्रवासात आनंद मिळेल. बुधवारी अनपेक्षित घटना घडेल. गुरुवारी हाती घेतलेले काम पूर्ण होईल. शुक्रवारी पैसा मिळेल. शुभ दिनांक १०–११.

**महिलांना :** कलाक्षेत्रात पाऊल पडेल. यश येईल.

**विद्यार्थ्यांना :** अनुभवाचे क्षेत्र विस्तारेल. काही भले घडेल.

**वृश्चिक : नोकरीत अनुकूलता**

मित्रांनो, तुमचा प्रतिकूल काल संपत आला आहे. तुम्ही धाडसी बनाल व येणाऱ्या संधीचा फायदा घेणार असाल, तर तुम्हाला नवी नवी क्षेत्रे उपलब्ध होऊ शकतील. नवे व्यवसाय स्थापन करू शकाल. जुन्या धंद्याला चालना देऊन, ते सुधारू शकाल. आर्थिक बाजू सुधारेल. व्यापार असेल तर त्याला प्रतिष्ठा येईल. शेतीबद्दलची काळजी दूर होईल. निसर्ग वरदान ठरला असे वाटेल. शनिवारी प्रवास करू नका. रविवारी नवा करार होऊ शकेल. सोमवारी जागा अगर शेतीचा प्रश्न सुटेल. मंगळवारी महत्त्वाची समस्या सुटेल. बुधवारी संसारात प्रसन्न वातावरण राहील.गुरुवारी नोकरीत महत्त्वाचे बदल घडतील. शुक्रवारी अचानक प्रवास


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढरे डाग बरे करण्यात आमच्या उपचाराने मोठी ख्याती मिळविली आहे. उपचार सुरू झाले की सुधारणा दिसून येईल. रोगाच्या तपशिलासह लिहा, प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

BHARAT AYURVEDASHRAM (M) P. O. KATRI SARAI ( GAYA )

घडेल. शुभ दिनांक १०–११.

**महिलांना** : व्रतवैकल्ये यथासांग पार पडतील. मात्र पैसा भरपूर मिळेल.

**विद्यार्थ्यांना** : नाटय-सिनेमात पदार्पण करा. अभिजात गुणांना वाव मिळेल.

**धनू : समस्या सुटेल**

मंगळाने तुमच्या मनात जे भीतीचे वातावरण निर्माण केले होते ते आता बरेच कमी होणार आहे. उलट हा मंगळ तुम्हाला अनेक बाजूने उपकारक ठरेल. आता रवीदेखील तुमचा मित्र बनला आहे. त्यामुळे अनेक बाजूने प्रगतीची चिन्हे दिसू लागणार आहेत. धार्मिक क्षेत्रात तुमचा मान वाढेल. तुमच्या मताला महत्त्व मिळेल. सार्वजनिक क्षेत्रात तुम्हाला मोठा मानाचा योग येणार आहे. एकूण आठवडा फार चांगला आहे. शनिवारी आर्थिकमान सुधारेल. रविवारी व्यापार सुधारेल. सोमवारी नोकरीत काम जास्त पडेल. मंगळवारी रेसमध्ये भाग घ्या. बुधवारी नवी वस्तू खरेदी करू शकाल. गुरुवारी नोकरीत कामाचा ताण वाढेल. शुक्रवारी महत्त्वाची समस्या सुटेल. शुभ दिनांक ११–१२.

**महिलांना** : नोकरीत वर्चस्व प्रस्थापित होईल. आर्थिक बाजू सुधारेल.

**विद्यार्थ्यांना** : प्रवासात काळजी घ्या. वाहन हाकताना नियंत्रण ठेवा.

**मकर : प्रगतीचा काळ**

आठवा मंगळ तुम्हाला वाईट नाही. व्यापार व्यवसाय, शेती कारखानदारी, वर्कशॉप अथवा खते शेती, असे सर्व व्यवसाय सुरू होतील. नोकरीत काळजी संपेल पण व्याप वाढेल. अनेक क्षेत्रांत तुमची गरज आवश्यक भासेल. पैसा कमी पडणार नाही. नवे नवे मार्ग शोधाल. उच्चपदस्थ व्यक्तीबरोबर जिव्हाळ्याचे संबंध जुळून येतील. शुभसूचक अनुभव येतील. शनिवारी नोकरीत प्रतिष्ठा उंचावेल. रविवारी विश्रांती मिळणे कठीण. सोमवारी व्यापार तेजीत चालेल. मंगळवारी व्यवसायात अनुकूल स्थित्यंतर घडेल. बुधवारी परदेशी प्रवासासाठी प्रयत्न करा. गुरुवारी अनपेक्षित लाभ, शुक्रवारी मन प्रसन्न राहील. शुभ दिनांक ७–९

**महिलांना** : संसारात जरी धावपळ राहिली तरी तब्येत सुधारेल. पैसा कमी नाही. अनुकूलता राहील.

**विद्यार्थ्यांना** : बरीच अनुकूलता आहे. मनोरथ पूर्ण होईल. स्वप्ने पुरी होतील.

**कुंभ : राजकीय उन्नती**

तुमच्याभोवती अनुकुलतेचे वातावरण निर्माण होऊ लागेल. तुमच्याभोवती शत्रूच्या क्षुद्र कारवाया चालू होत्या त्या आता हळूहळू कमी होऊ लागतील. विरोधकांना तुमच्याबद्दल जिव्हाळा निर्माण होईल. राजकारणात ज्या एका क्षणाची तुम्ही वाट पाहत होतात तो नजिक आल्याची चिन्हे दिसू लागणार आहेत. कदाचित तो क्षण तुम्हाला विलक्षण आनंद देऊन जाईल. नोकरीत महत्त्व वाढेल. अर्थिक बाजू सुधारेल. जिव्हाळ्याची माणसे भेटतील. शनिवारी राजकीय स्वप्न साकार होईल. रविवारी तुमचे महत्त्व वाढेल. सोमवारी व्यवसाय सुधारेल. मंगळवारी पैसा उत्तम मिळेल. बुधवारी लेखन होईल. गुरुवारी मान मिळेल. शुक्रवारी कर्तबगारी गाजेल. शुभ दिनांक ११–१३

**महिलांना** : मन प्रसन्न राहील. पैसा भरपूर खेळेल. नोकरीत वरदान.

**विद्यार्थ्यांना** : सोयीसवलती उपलब्ध होतील. नव्या क्षेत्राचा शोध लागेल.

**मीन : प्रसिद्धी मिळेल**

राशीस्वामी तिसरा आला आहे. त्याचा फायदा घ्यावा. तुम्ही जर लेखक, पत्रकार, संशोधक असाल, तर तुमचा मान वाढणार आहे. सत्तास्थानावरील अधिकारी व्यक्तीबरोबर ओळख होऊन प्रतिष्ठा उंचावेल. परदेशी जाण्याचे प्रयत्न सफल होतील. सार्वजनिक सेवेचा गौरव होईल. नोकरीत मान मिळेल. वरिष्ठांबरोबर चांगले संबंध राहतील. व्यापार सुधारेल. अनेक प्रकारे समाधान देणारा हा आठवडा आहे. शनिवारी उद्योगाला मदत मिळेल, रविवारी महत्त्वाचे काम होईल. मंगळवारी कर्तबगारी गाजेल, बुधवारी प्रकाशन व्यवसाय सुधारेल. गुरुवारी स्थावराची कामे होतील. शुक्रवारी साक्षात्कारी अनुभव येईल. शुभ दिनांक १०–१२.

**महिलांना** : स्वतंत्र व्यवसाय सुरू कराल. तशी संधी मिळेल. बरेच काही अनुकूल घडेल.

**विद्यार्थ्यांना** : लेखन-वाङमयात प्रसिद्धी मिळेल. हातात बरेच काही मिळेल. ☐

---


# पॅपिलॉन
# पॅपिलॉन

**लेखक : हेन्री शॅरीयर**
**अनुवाद : रवींद्र गुर्जर**

**किंमत : पंचवीस रुपये**
**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**